दैनिक
RNI NO. MAHMAR/2023/84162

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे



मूल्य
१००/-

## दिवाळी विशेषांक
## २०२३



देशपातळीवरील "सर्वोत्कृष्ट साखर कारखाना" म्हणून गौरविलेला व महाराष्ट्र शासनाचा " वनश्री व सहकार भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला
कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि; श्रीपूर
ता.माळशिरस, जि.सोलापूर
कारखान्याची वैशिष्ट्ये
सयुंक्त राष्ट्राकडून १० कोटी कार्बन क्रेडिट मिळवणारा भारतातील पहिला साखर कारखाना.
कारखाना गोडाऊनवर ८० के.व्ही. सोलर प्रोजेक्टची निर्मिती.
सुपंत माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळा
सुपंत जिवाणू खत प्रयोगशाळा.
मानव विरहीत ऊस वजन काटा.
वैद्यकीय सेवेसाठी ऑक्सिजन निर्मीती प्रकल्प
सुपंत पॅकेज्ड साखर १,२,५,१० किलो मध्ये उपलब्ध.
सपुंत ३०० एकर ऊस बेणे मळा.
जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर देणारा कारखाना.
जिल्ह्यात सर्वाधिक साखर विक्री दर.
पाणी बचतीसाठी रेन हार्वेस्टिंग प्रकल्प
पाणी पुर्नः वापरासाठी सी.पी.ओ. प्रणालीचा उपयोग
कारखाना परिसरामध्ये ५०००० वृक्ष लागवड.
शुभ दीपावली
देश व राज्य पातळीवरील पुरस्कार
भारतातील सर्वोत्कृष्ठ साखर कारखाना पुरस्कार प्राप्त
भारतीय शुगर यांचेकडून "सर्वोत्कृष्ठ कामगिरी" पुरस्कार प्राप्त.
नॅशनल फेडरेशन यांचेकडून "तांत्रिक कार्यक्षमता" पुरस्कार प्राप्त.
महाराष्ट्र शासनाचा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त
महाराष्ट्र शासनाचा "छत्रपती शिवाजी महाराज वनश्री" पुरस्कार प्राप्त.
महाराष्ट्र राज्य ऊर्जा महामंडळ यांचेकडून "उर्जा संवर्धन पुरस्कार" प्राप्त.
व्ही.एस.आय. पुणे यांचेकडून "बेस्ट मॅनेजींग डायरेक्टर" पुरस्कार प्राप्त
व्ही.एस.आय. यांचेकडून "उत्कृष्ठ ऊस विकास पुरस्कार" प्राप्त.
देश व राज्य पातळीवर विविध संस्थकडून एकूण ५१ पुरस्कार प्राप्त.
मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक, चेअरमन
श्री.कैलास खुळे
व्हा.चेअरमन
डॉ.यशवंत कुलकर्णी
कार्यकारी संचालक
सुपंत उत्पादने
सुपंत पॅकेज्ड साखर
सुपंत जैविक खते
सुपंत ऑक्सिजन
Supant SUGAR

LIVE A LUXURIOUS LIFE, OUTCLASSING OTHERS AT THE 7TH HEAVEN



BOOKINGS OPEN

7TH HEAVEN

The life of happiness

3 BHK PREMIUM APARTMENTS

MAHARERA REG. NO. : P52100047929

- A Project By

Swapnpurti ASSOCIATES BUILDERS & DEVELOPERS

॥ विश्वकर्मा ॥ बिल्डर्स

For Booking Contact

Madhukar Survase - 09823666040

Shamal Gaikwad - 08788822761

www.vishwakarmabuilders.com




* शुभेच्छुक * सौ.वनिता मधुकर सुरवसे

सरपंच, गोगांव ता.अक्कलकोट, जिल्हा समन्वयक सरपंच परिषद मुंबई-महाराष्ट्र


तालुक्यातील तमाम जनतेला
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
दीपावली शुभचिंतन
शावळ ग्रामपंचायत थेट जनतेतून
सरपंचपदी नितीन चव्हाण
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन..!!
शुभेच्छुक : नितीन चव्हाण मित्र परिवार शावळ ता.अक्कलकोट


शहराच्या
मध्यवर्ती ठिकाणी
पद्मजा टाकी समोर,
कन्ना चौक येथे
3BHK
बुकिंग चालू
शुभ दीपावली
GGD
गणेश गौरी
डेव्हलपर्स
संपर्क
बसवणप्पा सोनकांबळे
९१११९४४७७१
शशिकांत सोनकांबळे
९०११२७८४४६



सोलापूर जिल्ह्यातील
तमाम जनतेला
दिवाळीच्या
लाख लाख शुभेच्छा..!!
मा.आ.सचिन कल्याणशेट्टी
आमदार अक्कलकोट
मा.सागर दादा कत्ते
मॅनेजिंग डायरेक्टर
* शुभेच्छुक *
जे. डी. के.इंटरप्रायजेस, सोलापूर

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

किंमत १००/- रुपये

www.yashsiddhinews.com email : yashsiddhinews@gmail.com



संपादक
**कमलाकर सोनकांबळे**

कार्यकारी संपादक
**बसवराज सोनकांबळे**

व्यवस्थापक संपादक
**प्रा.राहुल रुही**

विभागीय संपादक मुंबई
**विजय घनघाव**

उपसंपादक
**प्रा.गौतम बाळशंकर**

व्यवस्थापक/ जाहिरात विभाग
**निजप्पा गायकवाड**

मुद्रक प्रकाशक
**सम्यक पब्लिकेशन्स् ॲन्ड प्रिंटर्स**

कायदेशीर सल्लागार
**ॲड.विजय हर्डीकर**
**ॲड.अमोल बनसोडे**

डिझाईन
**अमर ऑफसेट, सोलापूर**
मो.७६२०६८०९६७





## विशेषांक २०२३

### ✼ प्रतिनिधी ✼

| | |
|---|---|
| सुनिल गायकवाड | पुणे |
| राजेंद्र कोरके-पाटील | पंढरपूर विभाग संपादक |
| सुधाकर रणदिवे | धाराशिव जिल्हा प्रतिनिधी |
| नामदेव निर्मल | शिरोळ तालुका प्रतिनिधी |
| संजय चव्हाण | टाकळी सैनिक प्रतिनिधी |
| विशाल लोंढे | करमाळा तालुका प्रतिनिधी |
| डॉ.सुर्यकांत गायकवाड | सांगली/सातारा प्रतिनिधी |
| निंगप्पा निंबाळ | दुधनी प्रतिनिधी |
| महादेव सोनकवडे | वागदरी प्रतिनिधी |
| बलवान गोतसुर्वे | पश्चिम महाराष्ट्र प्रतिनिधी |
| एस.के.गायकवाड | तुळजापूर तालुका प्रतिनिधी |
| दादासाहेब बनसोडे | नळदुर्ग प्रतिनिधी |
| अनिल बनसोडे | माळशिरस प्रतिनिधी |
| राणी गायकवाड | नाशिक प्रतिनिधी |
| राहुल बनसोडे | पिंपरी चिंचवड प्रतिनिधी |
| मिलिंद जाधव | भिवंडी प्रतिनिधी |


कार्यालय : सम्यक पब्लिकेशन ॲड प्रिंटर्स, २४७ मातोश्री रमाई आंबेडकर नगर न्यु बुधवार पेठ सोलापूर ४१३००१


प्रशासकीय कार्यालय : सम्यक उद्योग समुह, यश सिध्दि न्युज, सर्व्हे नं.६०/२ हाऊस नंबर ५२०/४ कोंढवा बुद्रुक साईनगर लेन नं.३ सुखसागर पुणे-४११०४६

हा दिवाळी अंक मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.९९२१९८८३५८ ( अक्कलकोट न्यायकक्षेत)

# ❋ अनुक्रमाणिका ❋


| क्र. | कथा | लेखक/कवी | पान.क्र |
|---|---|---|---|
| १ | दिवाळी कुणाची ? | आ.कपिल पाटील | ०५ |
| २ | पडघ्यामध्ये डॉ.बाबासाहेब.. | मिलिंद सुरेश जाधव | ०७ |
| ३ | पंगत लागली उठायला.. | ॲड.अविनाश काले | ०९ |
| ४ | तुमच्या हातच्या.. | नवनाथ रेपे | ११ |
| ५ | ध्यास शिक्षणातील.. | भैरवनाथ कानडे | १५ |
| ६ | ग्रामपंचायतींनी गरीबी.. | मारुती बनसोडे | १९ |
| ७ | इडा पिडा टळो.. | ज्योतिबा पारखे | २१ |
| ८ | माणसाला सन्मान... | विनोद सदावर्ते | २३ |
| ९ | नवीन उद्योजकांसाठी.. | निलेश काळे | २५ |
| १० | नवीन शिक्षण धोरणांचा.. | ॲड.सचिन बनसोडे | २७ |
| ११ | आरक्षण लढाईचे सार.. | ॲड.अविनाश काले | २९ |
| १२ | विशेष व्यक्ती व्यक्तीमत्व | -- | ३१ |
| १३ | नामदेव ढसाळ... उत्तरार्ध.. | शरणबसपा सोनकांबळे | ३३ |
| १४ | राजाभाऊ सरवदे .. लोकनेते | प्रा.राहुल रुही.. | ३७ |
| १५ | आ.सचिनदादा कल्याणशेट्टी एक.. | प्रा.गौतम बाळशंकर | ४१ |
| १६ | गौतमी पाटील .. संघर्षाची.. | कमलाकार सोनकांबळे | ४३ |
| १७ | चंद्रशेखर भांगे पत्रकारेतील.. | सुनील गायकवाड | ४५ |
| १८ | काव्यपक्ती | कवी/कवयित्री | ४७ |
| १९ | भाषावार प्रांत रचना.. | सूर्यकांत लक्कप्पा | ५० |
| २० | मिरचीच्या खळ्यावर | अनिल बनसोडे | ५५ |
| २१ | सामाजिक चळवळीत | सुरेखा पैठणे | ५८ |


दीपावली अभिष्टचिंतन



# संपादकीय

प्रथम आमच्या असंख्य वाचकांना हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!! दैनिक यश सिध्दि न्यूजचा प्रथम दिवाळी विशेषांक आपल्या हाती देताना खूपच आनंद होत आहे. कारण बाजार पेठेमध्ये खूपसारे दिवाळी अंक येत असतात. हे दिवाळी अंक आपला वेगळेपणा दाखवून देत असतात. आणि यश सिध्दि न्यूजचा ही दिवाळी अंक आपला वेगळेपणा दाखविण्यासाठी बाजार पेठेमध्ये उपलब्ध झाला आहे. दैनिक यश सिध्दि न्यूजने गेल्या १० महिन्यामध्येच वाचकांच्या मनावर राज्य करित आपला वेगळा ठासा उमटविला असून राजकीय, सामाजिक, व्यवसयिक, कायदे विषयक बातम्या वाचकांपर्यंत पोहचवित आहे. दैनिक यश सिध्दि न्यूज हे सुरुवातीस ई पेपर स्वरुपात प्रत्येकांच्या मोबाईलवर उपलब्ध झाले आणि आता प्रिंट स्वपात आपल्या घरापर्यंत येत असून यावर वाचकांचा प्रतिसाद ही खूपच चांगला आहे. सोलापूर जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील नवीन पत्रकारांना संधी देवून त्यांची लिखानाची वेगळी ओळख ही या दैनिक यश सिध्दि न्यूज मधून तुम्हाला दिसत आहे. हा दिवाळी अंकामधील लेख हे कडक स्वरुपातील असून समाजातील चुकीच्या प्रवृत्तींना आळा घालतील असे आहेत. तर काही लेख खूपच माहिती देणारे वाचनिय आहेत. दिवाळी कुणाची? ,पडघ्यामध्ये डॉ. बाबासाहेब,आरक्षणाचे तीन तेरा..! तुमच्या हातच्या नैवेद्याने.. अक्कलकोट ऐतिहासिक.. यासोबत महाराष्ट्रतील राजकीय सामाजिक, पत्रकारिता, कला क्षेत्रात एक वेगळं व्यक्ती महत्व असणाऱ्या मान्यवराच्या संघर्षाचा आढावा हे लेख विचार करण्यास भाग पाडतील असे आहेत. हा दिवाळी अंक आपल्याकडे संग्रहित ठेवण्यासारखा असून २०२४ च्या दिवाळी अंकामध्ये काही बदल घडवायचे असतील तर नक्की कळवावे.. कारण वाचक हा आमचा मार्गदर्शक आहे.

संपादक
कमलाकर सोनकांबळे



तालुक्यातील तमाम
जनतेला दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
तालुकाध्यक्ष
तालुकाध्यक्ष
उपाध्यक्ष
ग्रा.पं.सदस्य
उपसरपंच
मा.निजप्पा गायकवाड
भाजपा अनुजाती विभाग अक्कलकोट
मा.बलवान गोतसुर्वे
भाजपा अनुजाती विभाग द.सोलापूर
मा.धोंडूराज बनसोडे
भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष
प्रा.गौतम बाळशंकर
हन्नूर ग्रा.पं.सदस्य ता.अक्कलकोट
मा.कमलाकर सोनकांबळे
ग्रामपंचायत गोगांव
शुभेच्छुक
* भाजपा अनु.जाती विभाग अक्कलकोट तालुका, भाजपा अनु.जाती विभाग दक्षिण सोलापूर.
* धोंडूराज बनसोडे मित्र परिवार उडगी ता.अक्कलकोट,
* तेजस्वी अर्थमुव्हर्स हन्नुर, संपर्क : ९०२१२६५२३८
* सिध्दार्थ सोशल फौडेशन, महाराष्ट्र राज्य



- आ.कपिल पाटील,
मुंबई

# दिवाळी कुणाची? ब्राह्मणांची की बहुजनांची?

बहुजनांनी अन् बौद्धांनी दिवाळी साजरी करू नये? मुस्लिम, ख्रिश्र्चनांनी करू नये? असले मेसेज गेल्या काही वर्षात व्हाट्सअप सुरु झाल्यापासून फिरू लागले आहेत. दिवाळी आनंद वाटण्याचा सण. सण कुणाचेही असोत आपले आणि त्यांचे असे नफरत भरे मेसेज खरंच पाठवण्याची गरज आहे का?

आकाश कंदिल खिडकीत लावत असताना या प्रश्र्नांचा विचार करत होतो. आमचं घर नास्तिक. ना घरात देव्हारा. ना कोणता पूजा-पाठ. पण दिवाळीत भाताचं कणिस लावून दारात तोरण बांधतो. आकाश कंदिल लावतो. घरात फराळ केला जातो. नवे कपडे घालतो. दिवाळीचा आनंद जो घराघरात असतो. तोच आनंद आमच्या घरातही असतो. लहानपणापासून दिवाळीचा हा आनंद मनात साठत आला आहे. माझे ८५ वर्षांचे वडील आजही शेतात राबतात. तेही अधार्मिक. पण आई सश्रद्ध. म्हणून दिवाळीचा आनंद आई वडिलांनी कधी कमी होऊ दिला नाही. मुंबईत तर घरात सगळेच सण जोरात साजरे करतो. बुद्ध पौर्णिमा, ईद आणि ख्रिसमसही. अर्थात शेतकऱ्याचं घर असल्याने दिवाळीचा आनंद काही और असतो. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी भाताच्या - धानाच्या पेंढ्या अंगणात रचून उडवं उभं राहिलं की दिवाळीचे वेध लागतात. धान्याच्या राशी अशा अंगणात आल्या की दिवाळी येणारच. तीच धान / धनतेरस.

पहिला दिवा लागतो वसुबारसला. वसू म्हणजे वासुकी राजा. नागवंशी. थेट ब्रह्मदेवाशी लढला. पशुधनाच्या रक्षणासाठी. त्याच्या आठवणीचा हा दिवस.

दुसरा दिवा नरकासुरासाठी. नीतिमान योद्धय़ासाठी.

तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा. पुरोहितांनी त्याचं कर्मकांड केलं. पण ही बाई लढवय्यी. आर्यांशी दोन हात करणारी. त्यांनी पळवून नेलेलं गोधन सोडवून आणणारी. म्हणून धनाला लक्ष्मीचं नाव मिळालं. अशोक राणांनी ती बौद्धानुयायी होती, असं म्हटलंय. महालक्ष्मी किंवा गजलक्ष्मी हे सुद्धा गौतम बुद्धांची आई महामाया हिचंच रूप आहे. राजा रविवर्माचं महालक्ष्मीचं चित्र सांची स्तुपावरील महामायेच्या शिल्पावर बेतलेलं आहे. अवैदिकांचं वैदिकीकरण म्हणा किंवा संस्कृती संगम. भारतीयांनी तिची आठवण आजही मनात जपली आहे. समृद्धीची माता म्हणून.चौथा दिवस बळीराजाचा. दिवाळीचा सणच तर त्याचा. तीन हजार वर्षे काळजाच्या कुपीत जपून ठेवलेली बळीराजाची पणती असंख्य ज्योतींनी उजळते ती ही दिवाळी. वामनाने डोक्यावर पाय ठेवत ढकललं होतं बळीराजाला पाताळात. वामन विष्णूचा अवतार मानला जातो. वामनाचं मंदिर देशात कुठेही सापडत नाही. बळीराजा मात्र आजही हृदयात कायम आहे.

शेतकऱ्याचं दुसरं नाव बळीराजा. काळ्या मातीत राबणारा तो. ऊन, पावसाशी मैत्री करत. ओल्या - सुक्या दुष्काळाशी चार हात करत. सर्जनशीलतेचा फाळ जमिनीत रुजवत नांगरणी करणारा. मढं झाकून पेरा करणारा. असंख्य पोटांची चिंता करणारा. कधी अटळ परिस्थितीशी सामना करणारा. फाळाची तलवार करत लढणारा. पण

कधीच दावा करत नाही तो तारणहार म्हणून. मोक्षदाता म्हणून.

त्या बळीराजाच्या स्वागताचा सोहळा म्हणून असते दिवाळी. दक्षिणेत ओणम साजरा होतो, तोही बळीराजाच्या स्वागतासाठीच. केरळात पाऊस आधी येतो. पीकही आधी हाती लागतं. म्हणून ओणमही दिवाळी आधी येतो. जमिनीत पेरलेलं बी, भरलेल्या कणसावाटे तरारून वर येतं. पाताळात ढकललेला बळीराजा पुन्हा भेटायला येतो तो हा असा.

ईडा, पिडा टळो बळीचं राज्य येवो. अशी प्रार्थना प्रत्येक माय त्यादिवशी आपल्या मुलांना ओवाळताना करत असते. अशी प्रार्थना जगात कुठे नसेल. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी बळीचं राज्य मागणारी. त्या बळीराजाच्या स्वागताची दिवाळी का नाही साजरी करायची? असंख्य दिव्यांची रोषणाई त्यादिवशी केली जाते. अमावास्या संपून नवा दिवस सुरू होतो तो बळीराजाच्या आठवणीने. प्रल्हादाचा नातू, विरोचनाचा मुलगा तो बळीराजा. त्याच्या बळीवंशाची हकीगत डॉ. आ. ह. साळुंखेंनी सांगितली आहे. ती मुळात वाचायला हवी. दिवाळी साजरी करायची की नाही, या प्रश्नाचं उत्तर त्यातून मिळेल.

हा सण असा आहे की तो या देशाशी, त्याच्या निसर्गाशी, शेतीशी आणि शेतकऱ्याशी जोडलेला आहे. अन्नदात्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण आहे. कर्मकांड करणारे शेंदूर फासत राहणार. पण शेंदराने विद्रूप केलेला आपला नायक नाकारण्याचं कारण काय? अन् आनंद साजरा करायला धर्माचं बंधन हवं कशाला? अनेक प्रसिद्ध दर्ग्यांमध्ये दिवाळीला दिव्यांची आरास केली जाते. खेड्या पाड्यातले ख्रिस्ती बांधव दिवाळीतही घरात गोडधोड करतात. जैन, बौद्ध, शैव कुणीही असा, बळीराजा त्या प्रत्येकाचा पूर्वज आहे. म्हणून प्रत्येकाच्या घरात दिवाळीचा आनंद आहे. केरळात ओणमही असाच हिंदू, ख्रिस्ती आणि मुस्लिमांच्या घरात साजरा होतो.

दिवाळीचा सण सुरू कधी झाला?

श्रमण मान्यता व परंपरेनुसार तो बळीराजाच्या पुनरागमनाचा, बुद्धांच्या स्वागताचा आणि महावीरांच्या महानिर्वाणाचा दिवस. हिंदू मान्यतेनुसार लंका युद्ध जिंकून प्रभू श्रीराम अयोध्येत परतले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी अयोध्येत दीपोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्रात कार्तिक अमावास्येला दीपावली साजरी होते. तिथे उत्तरप्रदेशात योगींनी त्याच्या आदल्या दिवशी दीपोत्सव साजरा करायला सुरवात केली आहे. त्या दिव्यांमध्ये आनंदापेक्षा नफरतीचंच तेल घालण्यात त्यांना अधिक धन्यता वाटते.

बौद्ध वाङ्मयात नुसार बुद्ध झालेल्या आपल्या पुत्राचं सिद्धार्थ गौतमाचं कपिल वस्तुत स्वागत करण्यासाठी राजा शुद्धोदनाने दीप उजळले तो हा दिवस. तो दिवस होता अश्विन अमावस्येचा. बुद्ध झालेल्या आपल्या पूर्व युवराजाचं स्वागत कपिल वस्तुने दीपोत्सवाने केलं. पहिल्या धानाची खीर बनवली. सम्राट अशोकाने त्या दिवसाला पुढे उत्सवाचं स्वरूप दिलं. लोकमान्य टिळकांनी गणपतीचा आणि महात्मा फुलेंनी शिवजयंतीचा उत्सव सुरू केला तसं. ८४ हजार ठिकाणी स्तुप, विहार, स्तंभ उभे करून दीप दान केलं. पाली - बौद्ध वाङ्मयात तो दिवस धम्म दीप दान उत्सव म्हणून अधोरेखित आहे. धम्म प्रकाश दिवसो. बौद्ध धर्म जिथे जिथे गेला तिथे तिथे दीप दानाचा उत्सव अश्विन अमावस्येला साजरा केला जातो. भन्ते मोग्गलान यांची हत्या याच दिवशी झाली म्हणून दुःख न करता हजारो धम्माचे दीप उजळा असा संदेश अशोकाने दिला.

शेवटचे तीर्थंकर महावीरांचं निर्वाण अश्विन अमावास्येलाच झालं. म्हणून जैन दिवाळीत सुतक नाही पाळत. ज्ञानाचा प्रकाश निमाला म्हणून दुःख नका करू. असंख्य दीप उजळा, असं सांगतात.

’गये से भवुज्जोये, दव्वुज्जोयं करिस्समो’

’ततस्तुः लोकः प्रतिवर्षमादरत् प्रसिद्धदीपलिकयात्र भारते’

दीपावलीचा जैन आणि भारत संदर्भ असा आहे. एक काळ दिगंबर जैन धर्माचा महाराष्ट्रात मोठा प्रभाव होता. तो पुढे ओसरला पण दीपावली मागे ठेऊन.

इतिहास लिहणाऱ्यांचा असतो. ’बळी भारता’ ऐवजी वामन अवताराच्या आरत्या लिहिल्या गेल्या. ओणम महाबळीच्या स्वागतासाठी साजरा होतो. भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी मागे बळीच्या डोक्यावर पाय ठेवणाऱ्या वामनाच्या चित्रासह वामन जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. वामन जयंतीच्या शुभेच्छा देणाऱ्यांचं आज राज्य आहे. म्हणून बळीराजाला विसरायचं का? अयोध्येत ’रामा’चा पत्ता नाही. सर्वत्र नथुरामाचा प्रयोग सुरू आहे. म्हणून महात्म्याला विसरायचं का? ७० वर्षे होतील आता. कधी हिंमत झाली नव्हती त्यांची. आज वामन जयंतीच्या शुभेच्छा दिल्या जात आहेत. उद्या नथुराम जयंतीच्या दिल्या जातील. म्हणून घाबरून कसं चालेल. अमावास्येनंतर प्रतिपदा येतेच. बळी प्रतिपदा.

कवी बा. भ. बोरकरांच्या शब्दांत,

नको घाबरू...
पंख आवरू...
अनावरा आकाश खुले
पल्याड आहे प्रकाश तिष्ठत
उजेडाची घेऊन फुले!

**समाप्त** ✻ ✻ ✻





**मिलिंद सुरेश जाधव**
मो.८६५५५६९४३६

# पडघ्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पाऊल खुणा...!

झिजले तुम्ही चंदनापरी दिली सर्वांना मायेची सावली...
अंधाऱ्या जिवनातून बाहेर काढलं अन् प्रकाशाची वाट दावली...

महाराष्ट्र म्हटला तर डोळ्यासमोर पुरोगामी महाराष्ट्र उभा राहतो. या महाराष्ट्राला खूप ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे आणि तो वारसा येथील महानायक आणि महानायिका यांच्यामुळे. महाराष्ट्र मधील जिल्हे असो, की तालुके किंवा खेडे पण कुठेतरी ऐतिहासिक बाबी आढळतीलच, असाच ऐतिहासिक वारसा लाभलेला ठाणे जिल्ह्यातील भिवंडी ह्या तालुक्यातील असलेलं गाव म्हणजे पडघा..



पडघा अनेक खेडे गावांचा एक आर्थिक उलाढाल आणि महत्त्वाचा केंद्रबिंदू बनला आहे. तिथे अनेक गावातून येणाऱ्या लोकांची गर्दी, तिथे होणारे व्यापार हे सर्व दृश्य पाहून अगदी मन भारावून जाते ह्या अश्या निसर्गरम्य आणि भिवंडी तालुक्याच्या कुशीत वसलेल्या पडघा गावाला ह्या देशाचे महानायक, राष्ट्रनिर्माते परम पूज्य बोधिसत्व , विश्र्वरत्न,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पदस्पर्श लाभले. ही पडघा गावासाठी अभिमानस्पद बाब ठरली आहे. आणि ही एक न पुसता येणारी ऐतिहासिक सोनेरी रेषा आहे. आज मला अभिमान वाटतो की मी या पडघ्याच्या मातीत जन्मला आलो खरंच, आज मन भरून येत आहे, अनेक पिढ्याच्या जीवनाचे सोनं करणारा घटनासम्राट ह्या मातीत आला आणि मातीच आज सोनं करून गेला. नवतरुणाममध्ये एक चैतन्य निर्माण करणारी ही घटना आहे. प्रत्येकाच्या हृदयावर कोरणारी ही घटना आहे. सर्वांच्या मनात एक घर करणारी अभिमानास्पद घटना आहे.

ह्या महामानवाने देशाची राज्यघटना लिहिली. देशाला संविधान दिलं, या संविधानाने स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता मिळवून दिले. आणि संविधानामुळे हुकूमशाहीला हद्दपार केलं आणि बळकट अशी लोकशाही प्रस्थापित केली. सर्व नागरिकांना समान दर्जा मिळाला. सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळाला, प्रत्येक माणूस ताठ मानेने आणि स्वाभिमानाने आणि अभिमानाने जगू लागला. प्रत्येक क्षेत्रात महिला आज उंच भरारी घेऊ लागल्या आणि मोठ-मोठ्या पदावर आज जाऊन देशाचं नाव उज्वल करू लागल्या, ही किमया सारी भारतीय राज्यघटनेची आहे अर्थात महानायक भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची इतिहासात नोंद होणारी अशी ऐतिहासिक घटना आहे आणि ही घटना आपण जिथे राहतो त्या गावांमध्ये घडलेली असते तर नक्कीच येथील प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटावा अशी ही घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण आदर्श मानत असतो या महान व्यक्तिने सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.

खरतर पडघा गावातील प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटणारी ही घटना आहे. आम्ही ज्या गावात राहतो त्या गावांमध्ये घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भिवंडी तालुक्यातील पडघा या गावात आले होते. पडघा समतानगर येथील वृद्ध नागरिकांकडून ऐतिहासिक दाखले नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते, असा त्यांच्या आठवणींना त्यांच्याकडून उजाळा मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात येणार होते. तेव्हा ही बातमी वाऱ्यासारखी पडघा परिसरामध्ये पसरली होती.



ठाणे जिल्ह्यातील आणि भिवंडी तालुक्यातील पडघा हे गाव फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचे केंद्रबिंदू म्हटले जाते. या पडघा गावातून अनेक सामाजिक कार्यकर्ते घडले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभाग आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याकरिता पडघे परिसरातील अनेक युवा सामाजिक कार्यकर्ते एकत्र आले आणि मोठ्या जोमाने काम करू लागले. विविध सामाजिक उपक्रम राबू लागले. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील पडघा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती आणि पाणी सत्याग्रहही केला होता. त्या आठवणीला पडघ्यातील नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व जयंतीनिमित्त नेहमीच उजाळा देत असतात.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पडघ्यात पाणी सत्याग्रह केला होता. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर काशिनाथ दोंदे ह्या भिम अनुयायीकडे उतरले होते. तेव्हा पडघ्यातील सुप्रसिद्ध सडकेवरची (सतीची) विहीर सत्याग्रहासाठी निवडण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह त्यांच्यासोबत असलेल्या सत्याग्रहींनी विहिरीचे पाणी काढले होते. या घटनेचा संदर्भ ठाणे संघसरिता या पुस्तकामध्ये दिला आहे. पडघा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा झाली होती, अशी आठवण समतानगर येथील नागरिक सांगत आहेत. आम्ही लहान होतो, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते. तेव्हा पडघा परिसरात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली होती. त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते होते. पडघा येथे त्यांची सभा झाली होती, ' अशी आठवण समतानगर ,पडघा येथील हिराबाई सोनावणे ( वय ९० ) यांनी माझ्याशी चर्चा करताना सांगितले.

अशा प्रज्ञा महासूर्याचा पदस्पर्श पडघा, बोरिवली भूमिता लाभले आहे. आणि त्याचाच वसा घेऊन अनेक कार्यकर्ते घडले आहेत. या ऐतिहासिक वारसाच जतन व्हावं, या दृष्टीने कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. आणि फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ अधिक गतीमान करावी असे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शैलेश दोंदे यांनी माझ्याशी चर्चा करताना सांगितले.

पडघा हा एक ऐतिहासिक वारसा लाभलेला गाव आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पडघा येथील सडकेवरची ( सतीची) विहीर आजही साक्ष देत आहे. जेव्हा ही घटना आम्ही पुस्तकामध्ये वाचतो तेव्हा आमच्या तरुण कार्यकर्त्यांना काम करण्याची ऊर्जा मिळते. ज्या महामानवाने या भारत देशाची राज्यघटना लिहिली. असा घटनाकार एका खेड्या गावामध्ये पाण्यासाठी सत्याग्रह करतो आणि त्याच गावात आम्ही राहतो तर आम्हाला येथील प्रत्येक नागरिकाला नक्कीच या गोष्टीचा अभिमान वाटतो आणि आमचं मन फुलून येतं. या घटनेबाबत अजून सविस्तर माहितीचा शोध आम्ही घेतं आहोत. अनेक पुढारी होऊन गेले. अनेक पुढारी निर्माण होतील. त्यामध्ये नक्कीच प्रत्येकाच्या ओठावर असणार नाव म्हणजे घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर....

बाबा तुम्हाला वाहलेली<br>
हार, फुले सुकून जातील...<br>
तुमचे विचार मात्र प्रत्येकाच्या मनात<br>
सुगंधापरी दरवळत राहतील...

**समाप्त** ✻ ✻ ✻



*Dr.Ambedkar with his wife Savitha Ambedkar - 1948*



ॲड.अविनाश काले
मो.९९६०१७८२१३

# पंगत लागली उठायला..आणि हे चालले जेवायला..? आरक्षणाचे तीन तेरा..!

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी छत्रपती शाहू राजे यांनी कोल्हापूर संस्थानात मागास वर्गीय आणि मराठा यांना ही शिक्षण आणि नौकरी यात आरक्षण ठेवले होते. याचे कारण अनेक कचेऱ्यात ज्या सगळ्या नौकरी होत्या त्या फक्त ब्राम्हण वर्गाच्या हातात होत्या आणि बहुजन समाज शिक्षणापासून कोसो दूर होता

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीमाई सावित्री बाई फुले यांनी सुरू केलेले बहुजनांसाठी चे शिक्षण सर्व दूर पसरले नव्हते किंवा त्याची महती लोकांना कळली नव्हती याचे कारण गाव खेड्यातील पारंपारिक जीवन पद्धतीत होते. आणि कारागिरी किंवा शेती साठी शिक्षणाची पारंपारिक पद्धत उपयोगी ठरतं होती म्हणजे चर्मकाराचा मुलगा कातड्याशी खेळत आणि शेतकऱ्याचा मुलगा औत बैलाशी खेळत आपोआप ते कौश्यल्य संपादित करत होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि शैक्षणिक चळवळ झपाट्याने वाढू लागली हळू हळू विज्ञान आणि गणिती क्षेत्रात प्रगती झाली. जग आधुनिक झाले, तसतश्या लोकांच्या राहणीमान आणि जीवनात फरक पडत गेला

मी याच्या फार तपशीलात जात नाही , याचे कारण मूळ लेखाचा विषय कांदबरी बनून जाईल. या काळात पाहिले तर समाजाचे दोन विभाग स्पष्ट होतात. एक आहे रे वर्ग.. म्हणजे ज्यांच्या कडे त्या वेळच्या कृषी आधारित अर्थ व्यवस्थेत आर्थिक कणा असलेली शेती ज्यांच्या कडे आहे व त्या व्यवस्थेच्या भोवती फिरणारी उद्योग व्यवस्था ज्यांच्या हातात आहे तो गावकुसातील समाज आणि दुसरा नाही रे समाज जो गावकुसा बाहेर आहे, ज्याचे कडे शेती नाही, शेती पूरक इतर व्यवसाय नाहीत जसे (घानी तून तेल काढणे ) वतनाच्या थोड्या जमिनी आधारे वरच्या, खालच्या, मधल्या आळीचे सगळेच ५-५० मालक असलेली कोरडवाहू जमीन त्याचे ही पलीकडे असलेला ना गाव ना कुस असलेला भटका, माळावर शिकार करून वेलाच्या टोपल्या विणून देव डोक्यावर घेऊन आणि संसार घोड्या गाढवावर लादून पाला पालात संसार थटनारा भटका विमुक्त आणि त्याच्या ही पलीकडे जंगलात राहणारा जंगली जुडी बुट्टी , हिरडे , बेहडे, मोहाची फुले , ताड माड याची दारू बनवून पिणारे आणि उंदरे, रान बोके, पासून थेट लाल मुंग्याची चटणी पक्वान्न म्हणून खाणारे आदिवासी..

स्वातंत्र्या नंतर किमान याही लोकांचे जीवनमान उंचवावे म्हणून आरक्षण नितीचा अवलंब करण्यात आला मुळात शेकडो कोटी लोकसंख्या असलेला हा देश कुणाच्या वाट्याला किती येणार? गावकुसाबाहेर राहणाऱ्या कांहीं लोकांच्या सुधारणा झाल्या, कांहीं घरे निर्माण झाली. पण मोठ्या प्रमाणावर हा वर्ग आज ही अंगमेहनत आणि साफ सफाई चे काम करूनच उपजीविका करत आहे हे वास्तव आज ही दडवले जाते. भारतीय समाज हा न्यायप्रिय समाज नाही तर तो जाती प्रिय आणि जातिसंघटित समाज आहे. म्हणून तो ब्राम्हण असतो तो मराठा असतो तो महार असतो किंवा पारधी असतो तो धनगर

असतो.डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे हिंदू धर्म हा जात कोंडाळे आहे, बटाटे पोत्यात भरल्या सारखी त्याची स्थिती आहे, प्रत्येक जातीचे अस्तित्व, प्रेरणा, आदर्श , रीती , रीवाज भिन्न म्हणून इथे जात संघटित होते. जातीचा माणूस जात डोक्यावर घेते ही जात भाषा जातीय हिताची भाषा बोलता आले की ते पुरेसे ठरते

सगळ्या भौतिक साधन संपत्ती गाव , तालुके , जिल्हे आणि राज्य ताब्यात असून ही ते दुःखी आणि ज्यांच्या हातात कोणतीच सत्ता, कारखानदारी, शेती नाही ते फार सुखी कारण त्यांना आरक्षण आहे. शिक्षणात सवलत आहे ,आणि बॅकलॉग भरला गेला नाही तरी नौकरीत आरक्षण आहे म्हणून ते सुखी..

सगळ्या अर्थकारणाच्या चाव्या स्वतः चे कणवटी ला लाऊन आणि आर्थिक महामंडळे निर्माण करून तटपूंजी सबसिडी देऊन बँकात हेलपाटे घालून ५-५० हजाराचे कर्ज ही मिळण्यास अनंत अडचणी चां सामना करावा लागणारा महार , मांग , होलार हा सुखी..? हे छिनालपन फक्त याच देशात चालू शकते याचे कारण या व्यवस्थेतील लोक दूट्टपी आहेत, त्यांच्या भावना प्रामाणिक नाहीत. नाही रे वर्गाने कसलीच भौतिक प्रगती करू नये अशी त्यांची मनोधारणा आहे, त्यांनी फक्त हलकी कामे करावी, शहरात गटारी चे मेन होल उघडुन त्यात त्यांनीच उतरावे, गावाच्या साफ सफाईची कामे करावीत असे त्यांना मनोमन वाटते. आरक्षणाला विरोध करायचा म्हणून ते गुणवत्ताचे तुणतुणे वाजवतात आणि तोंडाला येईल असे मोघम बोलतात.. म्हणे ९०%मार्क घेऊन ही ते नौकरी पासून वंचित आणि ६०%घेऊन ही आरक्षण वाले नौकरित.. यात खरोखर तथ्य आहे काय?आज कोणत्याही व्यवसायिक शिक्षणा पासून कॉलेज एडमिशन पर्यंत क्लोज ची टक्के वारी पहा म्हणजे समजेल की ते किती टक्क्या ला क्लोज होते ? परीक्षा घेणारे हे , पेपर ही फोडणारे हेच, आणि भरती करताना मुलाखती घेणारे ही तेच, नौकर भरती करताना एस सी /एस टी चे जागा असताना ही आणि त्या साठी उमेदवार उपलब्ध असताना ही त्या जागा मोकळ्या ठेऊन उमेदवार मिळाला नाही असे दर्शवून त्या जागी स्व जातीचे उमेदवार तात्पुरते भरती करून नंतर नियमित करणारे हे लोक न्यायी आहेत काय? ते इतक्या वर थांबले नाहीत, हे आरक्षण संपवण्याचे पाऊल त्यांनी कधीच उचलले आहे ते सर्व सार्वजनिक , सरकारी आस्थपनाचे खाजगीकरण करून

त्यांनी शिक्षणाचे ही खासगी करण केले. आत्ता तर जिल्हा परिषद शाळा ही यातून सुटलेल्या नाहीत मग हे कॉन्ट्रॅक्टर नफ्यासाठी शाळा चालवणार, बसेस चालवणार, वीज वितरित करणार, रस्ते बांधणार, धरणाच्या पाण्याचे नियोजन करणार यात किती दलीत ? किती आदिवासी ? किती भटके विमुक्त कॉन्ट्रॅक्टर आहेत? या वर्गा कडे असलेली जमीन किती? साखर कारखाने , दूध संघ, शाळा, कॉलेज अशी आस्थापने किती?

याचा एकदा तरी हिशोब मांडा.. दोष शोषण कर्त्यांचा नाही आमचा आहे आम्ही गांडु आहोत, आमचे रक्त उसळत नाही, आम्ही बोलतच नाही, मुकाटपणे बघत राहतो. आमच्या पोटातील अन्न हीच आमची चरबी झाली आहे , ते किती जमले? त्यांचे दुःख किती मोठे त्यांची गरिबी किती मोठी? शेती उध्वस्त झाली, आत्महत्या केली, कर्ज झाले आत्महत्या केली, आरक्षण मिळाले नाही आत्महत्या केली आम्ही मरतच नाही.. दुष्काळ पडला तरी रान भाज्या शिजवून आम्ही खाणार, कोंबडीचे सोलून टाकलेले भोत गरम पाण्यात टाकून त्याची पिसे उपसून मटण म्हणून खाणार, शेतातून उंदीर,घोरपडी, ससे आणि नदी नाल्यातील चींगळया मासे पकडून आम्ही खाणार, रेशनचा गहू आणि तांदूळ आणि आनंदाचा शिधा ही आमची दिवाळी..

अरे जरा लाजा.. थोडी तरी मनाची शरम बाळगा..


कोट्यवधी जनतेच्या हातात तुम्ही धतुरा दिला आणि तुमचे खरे शोषणकर्ते जे राजकारणात आहेत त्यांची शेती , त्यांची कारखानदारी, त्यांच्या शाळा, त्यांच्या गाड्या, त्यांचे बंगले, त्यांचे राजवाडे एकदा नजरे खाली घाला.. कोण खाजगीकरण करत आहेत ते बघा..

टोल गोळा कोण करत आहे ते बघा..कुणाच्या खाणी आहेत ते बघा.. आरक्षणाची पंगत त्यांनी केंव्हाच उठवली आहे..

आत्ता तर केंद्रातील सचिव ही थेट भरती करून घेतले आहेत यू पी एस सी ला फाट्यावर मारून पोलिस भरती, सैन्य भरती, शिक्षक, डॉक्टर ही कॉन्ट्रॅक्टद्वारे भरती आणि तुम्ही चालले जेवायला..

तुमचे आमचे शत्रू ओळखा ते समान आहेत आमचा रोष गरीब मराठ्या वर नाही त्यांना ही जगण्याचे साधन मिळाले पाहिजे असे आम्हाला ही वाटते पण एकदा दिशा ठरवून घ्या कोण शत्रू..? कोण मित्र..? ते ठरवून घेऊयात.. स्वतः भिकारी झालो रस्त्यावर आलो तरी जातीचे म्हणून संस्थानिक प्यारे असतील तर तुमच्या दुखण्यावर कधीच इलाज सापडणार नाही. खरकट्या पत्रावळी वरील लढाया बंद करा त्यात ना तुमचे भले आहे ना आमचे, एकदा प्रशासनातील वाटा ठरवायचं चां आहे ना?मग त्या साठी जन गणना करा सगळ्या समाजाची लोकसंख्या निश्चित करू त्या नंतर नौकरी असेल किंवा प्रशासन यातील लोकसंख्येच्या प्रमाणात टक्के वारी ठरवून घेऊगुणवत्तेची काळजी करू नका आपापल्या टक्के वारीत गुणवत्तेची स्पर्धा होईल, तुम्ही आम्ही काय वेडे आहोत काय? म्हशीचे शेपूट पिरगळून गुरे राखणारा जातीचा आहे म्हणून त्याला थोडेच सर्जन बनवून आपले ऑपरेशन कर म्हणणार आहोत ? हा गुणवत्तेचा बाऊ त्यांनी केला आहे जे ४८%जागा सुंबडीत बसून झुंबडीत खात आहेत आणि तुमच्यात आमच्यात भांडणे लावून गमत बघत आहेत त्यांना ही त्यांच्या लोकसंख्याचे प्रमाणात वाटा मिळेल त्या पेक्षा एक टक्का ही कमी नाही अन् जादा नाही. आपण सारेच या देशाचे मालक आहोत , आत्ता ही लढाई संस्थानिक आणि पुंड्या चे हातात जाऊ देऊ नका त्यांना बाजूला सारा तरच आरक्षणाचे आणि देशाचे , समाजाचे तीन तेरा होण्या पासून वाचतील हे समजून घ्यावे हीच विनंती..

**समाप्त ❊ ❊ ❊**



**नवनाथ दत्तात्रय रेपे**
मो.९७६२६३६६६२

# तुमच्या हातच्या नैवेद्याने तो बाटतोय ?

प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे हे त्यांच्या देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे या पुस्तकात म्हणतात की, केवळ एक शिवाजी हे नुसते नाव जरी उच्चारले तरी हिंदुच्या तेहतीस कोटी देवांची फलटण बाद होते. तर मग प्रश्र्न पडतो की, केवळ शिवाजी या नावापुढे जर सर्वच देवच बाद होत असतील तर आमचे स्वतःला उच्चशिक्षित समजणारे लोक काय म्हणून आजपर्यंत एकाचेही विघ्न दूर न करणा-या गणेशाच्या नावाने एवढा आकांडतांडव करून काकाड आरती माकड आरती करण्यात वेळ वाया घालवत असतील ? गाडगेबाबा म्हणतात की,

‘मळा पासून कधी, कोणी जन्म घेतं असते का ?
एक मूर्ती तयार व्हावी, एवढा मळ कुणी अंगावर ठेवते का ?’.

आमचा (बहूजन भौताड कम्युनिटी) बीबीसी समाज वर्षातील तीनशे चौसष्ट दिवस बुध्द शिव फुले शाहू आंबेडकर आण्णाभाऊ यांच्या विचारांचा प्रचार प्रसार करताना स्वतःची तुंबडी भरताना दिसतो मात्र गणेश उत्सवात त्यांची मती भ्रष्ट होते की काय ? कारण हे तथाकथित भामटे मात्र लोकांना महापुरूषांच तत्वज्ञान सांगतात अन् घरी आपल्या बायका पोरासोबत ज्या गणपतीला महात्मा फुले ढंबुढे-या म्हटले त्याची हार फुले टाकून आरती ओवाळताना दिसतात. म्हणजे त्यांनी महापुरुषांच्या विचारांशी केलेली हीच ती गद्दारी नव्हे तर काय ? गाडगेबाबा म्हणतात की,

अर्धा किलो उंदराले, पन्नास किलो झेपेल का ?
बसलं त्यावर ठाम मांडुनी, तर उंदीर तरी जिवंत राहिल का ?’.

आमच्या घरातील लहान मुलांना प्रश्र्न पडतो की, मुर्ती तर माणसाची, पण त्याचे तोंड हत्तीसारखे दिसते तेव्हा मूल त्या मुर्तीकडे पाहुन फिदीफिदी हासतात पण स्वतःला उच्चशिक्षित, बाल - युवा व्याख्याते मात्र याला डोक्यावर घेऊन मिरवताना दिसतात म्हणून तर या उच्चशिक्षितांना सांगाव वाटत की, तुम्ही प्रथम महात्मा जोतिबा फुलेंच समग्र वाङमय वाचा कारण महात्मा जोतिबा फुले म्हणतात की,

‘पशुपरी सोंड पोर मानवाचे !!
सोंग गणोबाचे नोंद ग्रंथी !!
बैसे उंदरावरी ठेवूनिया बुड !!
फुकितो शेंबूड ! सोंडेतून !!
अंत्यजासी दूर, भटा लाडू देतो !!
नाकाने सोलीतो ! कांदे गणू !!
चिखला तुडवूनी बनविला मोरया !!
केला ढंबू-ढेर्या ! भाद्रपदी !!.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या प्रतिज्ञेत म्हणतात की, मी गौरी गणपती यांना देव मानणार नाही आणि त्यांची उपासना करणार नाही. पण आज त्यांचेच खा. रामदास आठवले सारखे ब्राम्हणवादी बांडगुळ मात्र या काल्पनिक पात्राची पुजा करताना दिसतात ही खुप मोठी शोकांतिका आहे. म्हणून तर एक गायक म्हणतो की,

'निळाच झेंडा, निळीच टोपी
निळा निळा तु बनतो
लय निळा निळा तु बनतो
पण तु घरात गणपती आणतो
मग कशाला जयभिम म्हणतो ?'

रामायणातील सत्य या पुस्तकाचे लेखक पेरियार रामासामी यांनी १९५३ साली बुध्द पौर्णिमेच्या दिवशी गणपतीच्या मुर्त्या फोडल्या होत्या हे बहुजन समाज कधी समजून घेणार ? पेरियार रामासामी यांना समजून घ्यायला डोक्यात मेंदू असावा लागतो. ज्यांच्या डोक्यात गोबर गोमुत्र आहे त्यांना पेरियार रामासामी व त्यांची पुस्तक पचणं अवघड आहे, हे आजच उघड नागड वास्तव आहे. तसेच पुढे गाडगेबाबा म्हणतात की,

'नुकत्याच जन्मल्या बाळाले, हात्तीचं डोकं लागेल का ?
डोकं हात्तीचं लावूनी, तो माणूस बनून वागेल का ?
वैद्य असा होऊन गेला, त्याले जगाने नाही पाहिले का ?
डोकं जनावराचे माणसाला जोडे, असं कुठं होऊ राहिले का ?'.

मा. प्रबोधनकार सीताराम ठाकरे ०७ फेब्रु.१९५८ रोजी गणपतीचे रहस्य मध्ये म्हणतात की, 'ब्राम्हण समाजाने बुद्धालाच काल्पनिक गणपती बनवुन बुद्धाचे अस्तित्व नष्ट केले. आणि देवांची निर्मिती करुन स्वतःला देव घोषीत केल, आणी काल्पनिक पात्राच्या नावावर संपुर्ण समाजाला अंधश्रद्धेत बुडविले. सण उत्सवाच्या नावावर ब्राह्मणांनी या समाजा कडून धन दौलत उकळण्यास सुरुवात केली. खोट्या गणपतीची पूजा करुण ब्राह्मण धन दौलत मिळवतात प्रत्येक सणाला आमचे धन ब्राह्मण घेत असतो.' परंतू त्यांचे स्व. बाळासाहेब ठाकरे असताना मुख्यमंत्री मनोहर जोशींनी (ब्राम्हण) मातीच्या गणपतीला दूध पाजण्याचा पराक्रम केला. भट ओळखा कारण भट तुम्हाला पुर्वीपासूनच अंधश्रद्धेच्या खाईत ढकलत आहेत हा इतिहास आहे. तसेच गणपतीविषयी विद्रोही कवी विश्र्वंभर वराट हे त्यांच्या अंभगातून म्हणतात की,

गणपती तुझे काय नियोजन ! उंदीर वाहण बसावया !
बैसता त्यावरी होऊ नये घात ! उंदीर बोळात घुसताची !
तुझा तो मोदक ठेव सांभाळुनी ! खातो करांडुनी उंदीर बा !
म्हणे विश्र्वंभर गणोबा विकृत ! देव नव्हे भूज वाटे मज !.

त्यापुढे विद्रोही कवी विश्र्वंभर वराट म्हणतात की,

'करूनिया गोबराचा गणपती ! पुढे धुपबत्ती लावियली !
तरी येईल का त्याशी सुंगधीता ! आणि पवित्रता कोणेकाळी !
करील तो काय सृष्टीनियंत्रण ! आरपार शेण भरलेले !
म्हणे विश्र्वंभर जळण चुलीचे ! इतुके ही त्याचे मोल नाही !'

मराठा समाजाला वाटत गणपती आमच दैवत असून तो विघ्नहार्ता आहे. कधी कधी तर सुपारीच गणपती आहे अस समजून सुपारीला पाणी लावणारे मराठा समाजातील बहाद्दर पाहीलेत. त्यामुळे त्यांना सागावं वाटत की, मागिल काही दिवसापुर्वी पुण्यात एका मराठा समाजातील यादव नावाच्या महीलेने मेघा खोले या ब्राम्हण महीलेच्या घरी चतुर्थीच्या दिवशी स्वयंपाक बनवला होता पण खोलेंना नंतर समजल की, यादव या मराठा आहेत तेव्हा त्या ब्राम्हण समाजातील खोले म्हणाल्या की , तुम्हा शुद्र मराठा महिलेच्या हातच्या नेवैद्याने आम्हा श्रेष्ठ ब्राह्मणांचा देव बाटला, त्यांनी यादव या मराठा महीलेविरोधात तक्रार दाखल केली कारण त्यांचा ढंबुढे-या नावाचा तथाकथित देव मराठ्यांच्या स्पर्शाने बाटला होता. म्हणून आता तरी मराठा समाजाने समजून घ्याव की, मराठा समाजाच्या हातच्या नैवेद्याने जर भटांचे काल्पनिक देव बाटत असतील तर त्या भटा ब्राम्हणांचा आणि आपला धर्म व देव एक असेल ? याचा विचार करा. याविषयी गाडगेबाबांच्या शब्दात सागावं वाटत की,

भाकड अश्या कथा रचुनी, देवाच्या नावे तुले लुटले का ?
थोतांड सारं खरं केलं, आन बुद्धीला तुह्या पटलं का ?
सांग आते, भोळ्या जनतेला का मूर्ख केले, असा जवाब तू त्याले मागशील का ?
अंधभक्तीची काळी पट्टी तही, मेंदुवरून दूर करशील का ?

महात्मा फुलेंनी सुरू केलेली शिवजयंती खुप मोठ्या प्रमाणात साजरा होतोय ही गोष्ट भटमान्य टिळकाच्या लक्षात येताच शिवजयंती वरून लोकांच लक्ष विचलीत करण्यासाठी स्वयंमान्य टिळकाने काल्पनीक ढंबुढे-याच स्तोम माजवले अन् बहूजन समाज त्याला बळी पडला. म्हणून जोतिबा फुले म्हणतात की,

'गनोबाची पूजा भाविका दाविती !!
हरामाच्या खाती ! तूप-पोळ्या !!
जै मंगलमुर्ती जै मंगलमुर्ती !!
गाती नित्य किर्ती ! टाळ्यासह !!'

भटा ब्राम्हणांनी आजपर्यंत बहूजन समाजापुढे काल्पनिक पात्र रंगवून तो आपला विघ्नहर्ता सुखकर्ता आहे अस सांगितल त्यामुळे बहूजन समाज त्या कर्दमात फसत गेला. यख काल्पनिक ढंबुढे-याविषयी जगदगुरू तुकोबाय म्हणतात की, गणोबा विक्राळ ! लाडुमोदकांचा काळ !

वारकरी सांप्रदायाचा पाया रचनारे संत नामदेव महाराज म्हणतात की,

इतर देवांचे न पाहू तोंड !
विठ्ठल माझा प्रचंड !!

तर मग प्रश्र्न पडतो की, नामदेवांनी सांगितलेला विठ्ठल माझा प्रंचड आहे तर मग बहुजन समाजाला इतर देवांची गरजच काय ? कशाला पाहीजे विठ्ठला व्यतिरिक्त इतर थोंताड पण आमच्या सुशिक्षित लोकांना आजही गाय गोबर गोमुत्र साप विंचू पाल माकड कुत्र डुक्कर कासव हत्ती मोर उंदीर यांच्यात देव दिसतो ? कारण त्याची पुजा ते करताना दिसतात ही खुप मोठी शोकांतीका आहे. आजपर्यंत या

विघ्नहर्त्याने एकातरी बहूजन कुटुबांतील व्यक्तींच विध्न दुर केल आहे ? म्हणून बहुजन समाजाला तुकोबांच्या शब्दात सागावं वाटत की, वांझेंने दाविले ग-हवार लक्षण ! चिरगुटे घालून वाथयाला !

बहूजन समाजाला सागावं वाटत की, भटांच्या नापिक डोक्यातून निघालेल्या सुपिक काल्पनीक कथांच्या नाही लागून विघ्नहर्त्या व सुखकर्त्यांच्या नादी लागून आपला आमुल्य वेळ व पैसा किती दिवस वायफळ घालवणार ? म्हणून तर गाडगेबाबा म्हणतात की,

‘वैद्य असा होऊन गेला
त्याले जगाने नाही पाहिले का ?
डोकं जनावराचे माणसाला जोडे
असं कुठं होऊ राहिले का ?’

एकही दिवश शाळेत न गेलेल्या गाडगेबाबांना गणपतीचं थोतांड आणि लचांड समजल पण तुम्ही उच्चशिक्षित असूनही काल्पनिक पात्राकडून सुखाची व विघ्न निवारणाची अपेक्षा करतात तेव्हा आपण सुशिक्षित आहोत का ? हा प्रश्र्न स्वतःला विचारा. कारण उच्चशिक्षित असणारेच महापुरुषांच्या विचारावर चालत नाहीत त्या शिकलेल्या लोकांविषयी माजी न्यायधीस पी.बी. सावंत म्हणतात की, ‘हा वर्ग आपल्याच महापुरुषांच्या विरोधात काम करतो’.


काल्पनिक पात्रावर किंवा थोंताडावर काही बोललं तर बुध्दीची कमतरता असणारांच्या भावना दुखावल्या जातात त्यामुळे मा.आ. केशवराव धोंडगे म्हणतात की, त्यांनी आपल्या भावनेचा विमा उतरावा किंवा त्या भावनेचा पुष्पगुच्छ करून तो इअर कंडीशनमध्ये ठेवावा जेणेकरून त्याला इजा पोहोचणार नाही. म्हणून तर विद्रोही कवी विश्र्वंभर वराट म्हणतात की,

‘श्रध्देपोटी केला शेणाचा गणेश !
आळयांची पैदास थांबेल का ? !
गुळाचा गणेशा लागती मुंगळे ! मेणोबा वितळे तापासंगे !
केला कापराचा हवेत विरतो ! पाण्यात जिरतो लवणाचा !
म्हणे विश्र्वंभर नवल ते काय ! देव होतो व्यय तरी कैसा ? !’
सत्य आम्हा मनी ! नव्हे गबाळाचे धनी !
देतो तिक्ष्ण उत्तरे ! पुढे व्हावयासी बरे !

**समाप्त ✻ ✻ ✻**



# बाप



पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड
मोब.९०७५५९५६९५

बाप म्हणजे असा जादूगर आहे जो दुःखाला सुखात बदलतो,पाठीशी खंबीर उभा राहून लढायला शिकवतो,संकटावर मात करून जिंकण्याचे सामर्थ्य भरतो.ईमानदारीने मेहनत करून जगण्याचे बळ निर्माण करतो.स्वाभिमानाने जगण्याचे केवळ उपदेश न देता उभ आयुष्य उदाहरण बनून जगून दाखवतो.बाबा,वडील,पप्पा,डॅडी आणि पिता अश्या अनेक नावाने प्रसिद्ध असलेला हा दुवा आपल्या जीवनाच्या प्रत्येक वाटेवर न थकता साथ देत राहतो.अगणित त्याग करत मनातील इच्छा आणि आकांशाची आहुती देत आपले मार्ग प्रकाशित करण्यासाठी अविरत जळत राहतो.जबाबदारीचे ओझे वाहून थकला तरी त्याला थांबण्याची मुभा नाही कारण जो भार त्याने उचलला आहे त्याला उंच शिखरापर्यंत पोहोचवण्यासाठी तो निघालेला असतो .कर्तव्य निभावत असताना किती यातना झाल्या यापेक्षा तो त्या कर्तव्याची पूर्तता करण्यास जास्त महत्त्व देतो.

आजही ज्यांना बाप नावाचा आधार आहे ते नक्कीच जीवनात खचत नाहीत कारण आज बाप जरी कमवत नसला तरी त्याने आपल्याला स्वतःच्या पायावर उभे राहून कमावण्याची जी योग्यता दिली आहे त्याचे मोल कधीच होणार नाही.निस्वार्थ भावनेने इतरांच्या मदतीस धावून त्याने आपले सुंदर विश्र्व निर्माण केलेले असते आणि सर्वांच्या मनात घर करणारा हा पिता स्वतःच्याच घरात कधी परका होऊन जातो हे कळतच नाही.जीवनाची पूर्ण जमापुंजी खर्च करून तो केवळ घर उभं करतं नाही तर त्याच्या स्वप्नातील ते अनोखे जग असते ज्यासाठी खडतर प्रवास करून त्याने ते मिळवलेले असते. साऱ्या जगाशी झुंज देत त्याने आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले असते.

मुले जशी मोठी होतात तशी त्यांची समज विकसित होत नाही.सर्रासपणे बोलण्या बोलण्यात मुले एकमेकांना वडिलांच्या नावाने हाका मारतात,शिवीगाळ करताना बापाचा उल्लेख करतात.ज्या बापाच्या जीवावर उड्या मारतात त्याच बापाला एकेरी बोललात.काही ठिकाणी वडिलांना मारहाण केल्याची घटना ऐकण्यास मिळते तर काही ठिकाणी शुल्लक वादातून पित्याचा खून झालेला ऐकण्यात येतो.असंख्य संकटाना सामोरे जात ज्याने सुंदर जीवन घडवण्याचा उद्देश पूर्ण केला त्याच्या जीवनी एवढे दुःख का?चांगली कमावती मुले माय बापाला वृद्धाश्रमात सोडून त्रासातून मुक्त झाल्याचा आनंद मानतात परंतु ते विसरून जातात की ज्यांच्या अंगा खांद्यावर लहानाचा मोठा झाला त्याला आज खरी आधाराची गरज आहे.काठीचा आधार घेत एक एक पाऊल पुढे टाकणाऱ्या बापाला खरतर काठीचा पण भार होत असेल.

खरे म्हणजे बापाच्या भूमिकेतून जग पाहायला शिकलं तरच त्याचा त्याग कळेल ,त्याची ओढ कळेल आणि कळेल अंतरीची पिढा ज्यात तो रोज होरपळत राहतो.आपण सहजच म्हणून जातो बाबा तुम्ही माझ्यासाठी केलंच काय? अरे वेड्या तू उभा आहेस या पेक्षा अजून मोठा पुरावा त्याने काय द्यावा तुला.बेहिशोबी संपत्ती त्याने तुझ्यासाठी जतन केलेली ती म्हणजे निर्मळ मन आणि प्रभावी जीवन ज्याद्वारे कोणतीही अडचण सहज दूर करणे शक्य होते.जेंव्हा जेंव्हा आपण कशाचा हट्ट केला तेंव्हा तेंव्हा त्याने जिवाचं रान करून ती वस्तू आपल्या नजरेसमोर उभी केली आणि जेंव्हा त्याच्या उतरत्या वयात त्याने हट्ट केला तेंव्हा आपण त्या हट्टाला नजरांदाज करत राहतो.

हे कुठेतरी थांबल पाहिजे,बापाला त्याच हक्काचं सर्व मिळण्यासाठी त्याने आक्रोश करावा ही वेळच येऊ नये.मुलांनी कर्तव्य निभावत त्यांना समाधान प्राप्त करण्यासाठी जे करता येईल ते करत राहिले पाहिजे.आपण करू शकतो या भावनेने नाही तर बाप ह्या सर्वास पात्र आहे म्हणून.माझ्या रूपाने त्याने जी गुंतवणूक केलेली आहे त्या गुंतवणुकीला व्याजासह परत करून देण्याची संधी त्याने दिली यातच आपले सर्वस्व.

ईश्र्वरा तू असशील मोठा जगी
माझ्यासाठी तो तुझ्या पेक्षाही महान आहे
स्वतःला उगाळून मला सुगंधित करणारा
बाप माझा चंदनाची सहान आहे

समाप्त ✻ ✻ ✻



**भैरवनाथ खंडू कानडे**
मो.९८६०३४४०७३

# ध्यास शिक्षणातील उत्तमतेचा.....

शिक्षणाच्या आजच्या परिस्थितीचं अवलोकन करताना असे वाटते की ,जगातली मोठी शिक्षण व्यवस्था आपल्या देशात आहे . आपल्या देशासमोर व शिक्षण क्षेत्रासमोर अनेक प्रकारची आव्हाने आहेत . विज्ञान - तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवनवीन आव्हाने पेलताना उत्तम शिक्षक , दर्जेदार शिक्षण व उत्तम प्रशासन या तीन बाबींवर देशाने आता लक्ष केंद्रित करायला हवं . कारण कोणताही समाज त्या शिक्षण पद्धतीपेक्षा गतिमान असू शकत नाही , तसेच कोणतीही शिक्षण पद्धती शिक्षकांपेक्षा गतिमान असू शकत नाही . यासाठी विद्यार्थ्यांवर निरपेक्ष निर्व्याज आणि भरभरून प्रेम करणार्या पूज्य साने गुरुजींच्या संकल्पनेतील शिक्षकांची भूमिका यामध्ये महत्त्वपूर्ण आहे.क्षेत्र कोणतेही असो , शिक्षकाचे त्या त्या क्षेत्रातील मार्गदर्शकाचे स्थान हे श्रेष्ठ दर्जाचे आहे . त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात दिलेले योगदान व घेतलेली भूमिका त्यासाठी केलेल्या प्रयोग प्रयत्नांचं मोल हे खूप मोठं असतं . तेव्हा समाज घडविण्याची ताकत असलेल्या शिक्षकांच्या पाठीशी सरकारी यंत्रणेने व साऱ्या समाजाने धीरोदत्तपणे उभे राहिल्यास शिक्षण आणि विकासाचा परस्पर संबंध अधिक घट्ट व्हायला वेळ लागणार नाही . त्यासाठी शासनाचे दूरदृष्टी धोरण व माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य पद्धतीने उपयोग करून देणारी यंत्रणा कार्यान्वित करायला पाहिजे . हल्ली ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत ,नवनवे शोध लागत आहेत .शिक्षकांच्या मनातली कर्तव्य बुद्धी , त्यांच्यातील विद्यार्थी प्रेम , त्याला निरंतर अध्ययनासाठी शिक्षण संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या आवश्यक सोयी , उत्तम ग्रंथालय , योग्य प्रशिक्षण , चुकीच्या धोरणाविरोधात सतर्कताआणि समाज हिताला नख लागण्याची शक्यता निर्माण झाल्यास त्याला पूर्ण ताकदीने विरोध करण्याची शिक्षक नेतृत्वाची मानसिकता व सुलभ यंत्रणा आणि शिक्षणातील उत्तमतेचा ध्यास या सर्व चांगल्या गोष्टी एकत्र आल्यास दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण निर्माण व्हायला वेळ लागणार नाही .

शेती क्रांती , औद्योगिक क्रांती आणि शिक्षण व माहिती क्रांती या तीन क्रांतींनी मानवी इतिहासात मोठी उलथापालथ घडवली आहे. शेती क्रांतीमुळे भटके आयुष्य स्थिर झाले . औद्योगिक क्रांती आली त्या काळातही संक्रमण अवस्था त्रासदायकच वाटत होती. १९ व्या शतकाच्या अखेरीस मुक्त शिक्षण आणि औद्योगिकीकरणाला वेग आला. अपसूकच ज्ञानाच्या ,बुद्धिमत्तेच्या कक्षा रुंदावल्या गेल्या .साहजिकच शिक्षण हाच ग्राम विकासाचा विश्र्वसनीय स्त्रोत मानला गेला . राज्यासह मराठवाड्याच्या सूक्ष्म व स्थूल प्रश्र्नांच्या मुळाशी जाऊन उद्याच्या ग्राम विकासाची वाटचाल कोणत्या दिशेने होणे आवश्यक आहे? यावर लक्ष केंद्रित केल्यास शिक्षणकेंद्री ग्रामीण विकासाची संकल्पना आणि आवश्यक सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज असल्याचे प्रकर्षाने जाणवते . अपेक्षित बदलांसाठी शिक्षण क्रांतीसह सार्वत्रिक व दर्जेदार किमान कौशल्यावर आधारित शिक्षण हाच समाजाच्या सर्वांगीण व समतोल विकासाचा सम्यक विचार


ठरावा .पायाभूत संचितावर उभा असलेले ग्रामजीवन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोनाची गरज आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या व मराठवाडा मुक्तीदिनाच्या अमृत महोत्सवी वर्षात शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन आव्हानांना सामोरे जात राष्ट्राच्या वेगवान बदलांचा सम्यक व मुलगामी विचार आपणाला स्वीकारायला हवा . नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये इयत्ता सहावी पासून किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय विमुक्त शिक्षणाची पूरक अभ्यासक्रम कार्यवाही करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या विशेषत: ग्रामीण भागातील गाव खेड्यात , वाड्या वस्त्यांवर शिक्षण घेणाऱ्या मुलांचा सर्वांगीण विकास करण्याकडे सरकारी यंत्रणेचा कल दिसून येतो .यासाठी आवश्यक त्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या परंतु अंमलबजावणीची परिणामकारकता मात्र दिसत नाही. शासकीय योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीचा व दर्जेदार शिक्षणाचा अभाव यामुळे होणाऱ्या अपरिमित हानीकडे वेळीच लक्ष केंद्रित न केल्यास येणारा काळ हा आव्हानात्मक ठरणार आहे.हे वास्तव नाकारून चालणार नाही. मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काची आग्रही भूमिका मांडणाऱ्या व्यवस्थेकडे निरखून पाहिल्यास वंचितांच्या वाड्या वस्तीवरील दर्जेदार शिक्षणाची वानवा आजही प्रकर्षाने जाणवायला लागते. ग्राम संस्कृतीशी निगडित उद्योग व्यवसाय व त्यासाठी आवश्यक किमान कौशल्यावर आधारित शिक्षण याचा अभाव असल्याने नोकरी ,व्यवसायासाठी खेड्यातून शहराकडे ओढा सुरू झाला. कशाचीही शाश्र्वती उरली नाही. वातावरण कमालीचं अस्थिर ,असुरक्षित झालं जुनी मूल्यं खरी वाटेनात. ग्राम विकासाच्या पारंपारिक पद्धती फोल ठरू लागल्या आणि नैतिक व व्यावसायिक शिक्षणाचा सुंदर अनुबंध निर्माण केल्याची वल्गना करणाऱ्या व्यक्ती , संस्था आणि व्यवस्था या कुचकामी वाटू लागल्या .शहरात आणि गावात कॉलन्या फोफावल्या इतकेच काय तर एकेकाळी केवळ गुणांचा गौरव करणारे आता अधिक कमाईच्या कर्तुत्वाला कर्तव्य ठरवू लागले . आणि तिथेच सामान्य उपेक्षित , वंचितांच्या शिक्षणाचे ऱ्हासपर्व भरात आले. अशा दुहेरी निष्ठांच्या दर्शनाने गावखेडी विकासाची आदर्श संकल्पना वरपांगी वाटायला लागली .पायाभूत संचितावर उभा असलेला ग्रामीण महाराष्ट्र आजही व्यावसायिक व दर्जेदार शिक्षणाच्या प्रतीक्षेतच आहे. व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली व्यक्तिवादाचा अश्र्वच चौखुर उधळला गेला असला तरी ग्राम विकासाचा मूळ गाभा असणारा संवाद मात्र क्षीण होत गेला. कुणालाही न मोजणाऱ्या असंवादाला प्रतिष्ठा आली . जग झपाट्याने बदलत असते. आपली विचार करण्याची पद्धत त्यासाठी बदलावी लागते . मात्र आजही ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांमध्ये असलेल्या शैक्षणिक सुविधांचा अभाव , शिक्षकांची कमतरता व कार्यरत शिक्षक शिक्षकांना दिला जाणारा अतिरिक्त कामाचा भार ,यामुळे शैक्षणिक क्षेत्रातील विषम व्यवस्था पराकोटीची झाल्याने वंचितांची शैक्षणिक समस्या अधिक गडद होत चालली आहे . उन्नतीसाठी पुन्हा एकदा आता समग्र शिक्षणावर आधारित सर्वांगीण व समतोल ग्राम विकासाचा सम्यक विचार पुढे येण्याची गरज वाटते.त्यासाठी वेळ , बुद्धिमत्ता आणि राजकीय इच्छाशक्ती व बदलत्या तंत्रज्ञानाचा आग्रह हवा .


शिक्षण हे विद्यार्थीकेंद्री , सार्वत्रिक व गुणवत्तापूर्ण असले पाहिजे , हा सर्वांचा आग्रह आहे. अमेरिकेच्या संविधानात मानले गेलेली शिक्षणातील समता हि भांडवलशाही समाजव्यवस्था असतानाही शिक्षणात तो समानतेचा आग्रह धरला आहे. कारण शिक्षणात समानता नसेल तर शिक्षण हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असू शकत नाही . मराठवाड्यातील अर्धपोटी , ऊसतोड करणाऱ्या वीट भट्टीत काम करणाऱ्या , दुर्गम आदिवाशी गरजू , वंचित मुलांच्या शैक्षणिक प्रवाहासाठी सरकारने सारं काही कागदावर दिले , पण सुविधांची गुणवत्ता ,शिक्षणाचा दर्जा शिक्षकांच्या सन्मानाबाबत असलेली अनभिज्ञता , अतिरिक्त कामाचा भार हा ग्रामीण विकासातील अडसर आहे. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष , शिक्षणतज्ञ ,शिक्षण प्रेमी , कार्यकर्ते व माध्यमांनी शिक्षणातल्या प्रश्र्नाच्या मुळाशी गेल्यास गावविकास व शिक्षण यांच्यातील अडसर ठरू पाहणारे भेदक वास्तवत पुढे येईल. जागतिकीकरणाच्या वावटळीत स्वतःच्या अस्तित्वासाठी व शिक्षणाच्या हक्कासाठी लढाऊ भूमिकेत असलेला राज्यातील शिक्षक हा अनेक समस्यांनी त्रस्त आहे. यासाठी गरज वाटते ती शैक्षणिक संस्था चालवणाऱ्या यंत्रणेने मानसिकता बदलून सैद्धांतिक शिक्षण देण्यापलीकडे उद्योजकता प्रेरित शिक्षण देण्यावर भर देण्याची. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधुन मुलांना व्यावसायिक शिक्षणाचे बाळकडू वेळीच न दिल्यास भविष्यातील जागतिकीकरणाचे संकट अधिक गडद होऊन आपण त्यामध्ये टिकू शकणार नाही हे वैश्र्विक कटूसत्य आहे .होऊ घातलेल्या या जागतिकीकरणाच्या संकटाशी दोन हात करण्यासाठी आपल्या शिक्षण प्रक्रियेतील दोष दूर करणे ही काळाची गरज आहे .यासाठी सरकारी यंत्रणा , शिक्षण संस्था व शाळा या सक्षम व समर्थ बनल्या पाहिजेत हा आश्र्वासक प्रवास मराठवाड्याच्या व राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेसाठी प्रेरक ठरू शकतो . त्यासाठी असंख्य बदलाची श्रृंखला अभिक्रिया सुरू होणे अनिवार्य आहे. ग्रामीण विकासासाठी आपल्या शिक्षणाची प्रेरणा काय आहे ? त्याचा अर्थ नेमका कशात आहे ? असे काही यक्ष प्रश्र्न अधून मधून नेहमीच आपणास छळत राहतात. तेव्हा आपल्या अस्तित्वाची अर्थशून्यता त्रासदायक होते आणि मग आपण उत्तराच्या शोधात निघतो . कधी या असह्य समस्यांचेच अस्तित्व नाकारून समाधानी असल्याचा आवच आणत राहतो. प्रश्र्न पडूच नये याचा प्रयत्न करीत राहतो . आपणच आपल्या कुतूहलाचा खून करून टाकतो .अवघड वाटणारे विकासाच्या आड येणारे प्रश्र्न डिलीट करण्याचा अटोकाट प्रयत्न करण्यापेक्षा त्यासाठीचा रोडमॅप आणि तंत्रज्ञानावर आधारित उन्नतीचा सॉफ्टवेअर तयार करणे गरजेचे आहे .कारण जग हे झपाट्याने बदलत असते आपली विचार करण्याची पद्धत ही जर जुनाटच असेल तर आपण बदलू शकत नाही . सध्या काळाच्या ओघात नकार देण्यात धन्यता मानली जाऊ लागली आहे. कशाच्या विरोधात बंड करावे हेच समजत

नाही. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना पुढील २५ वर्षात शहरात ,गावात भौतिक क्रांती बरोबरच शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती होणे अभिप्रेत आहे .आर्थिक मंदी , बेरोजगारी दहशतवाद , दुष्काळजन्य स्थिती महागाई आणि हवामान बदलांमुळे अवघ्या जगाचे भविष्य धोक्यात आले . वाढत्या समस्येचे स्वरूप महाकाय तितकेच अतिशय जटिल झाले आहे .यावर मात करायचे असेल तर विविध ज्ञानशाखांचा संगम पुढील काळात घडायला हवा ,अन्यथा आधुनिक मानसिकतेमध्ये बदल झाला नाही तर अंत नजीक आहे . ग्रामीण विकासासाठी असलेल्या लोकशाहीचा पर्याय समर्थपणे आपणाला पेलता आला पाहिजे .ग्रामपंचायत पर्यंतच्या सर्व संस्थाची नवीन संरचना तयार झाल्या नाहीत तर ग्रामीण भागातील भुकेलेल्यांचे आणि तहानलेल्यांची संख्या कधीच घटू शकणार नाही .भविष्यातील पिढ्यांचा बेदरकार विचार न करता ज्ञान युगातील अविवेकी पर्व संपून नव्या ग्रामीण विकासाच्या अध्यायाचे पर्व सुरू झाले पाहिजे .यासाठी व्यवसायिक शिक्षणाच्या बाबतीत विकासाची नवी क्षितिजं आपणाला शोधता येतील. नवीन व्यवसाय , रोजगार उत्पन्न यामध्ये वाढ करून आर्थिक जडणघडण होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये व्यवसायिक शिक्षणाचा कुतुहल निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी कोणती पावले उचलावीत याचा विचार येत्या काळात करणे हितावह वाटते .यासाठी आवश्यक कौशल्य शिकायचे कसे , समस्यांना उत्तर शोधणे , कल्पनाशक्तीचा वापर करणे , प्रभावी संप्रेषण कौशल्य , संगणकावर प्रभुत्व या बरोबरच नैतिक मूल्य शिक्षणातून माणूसपण राखणं या गोष्टी विस्तृत होणे अपेक्षित आहे . कारण राष्ट्राचा विकास समाजाच्या विकासावर आणि समाजाचा विकास हा शिक्षणाच्या विकासावर अवलंबून असतो . गरजेनुसार तयार केलेला कालसापेक्ष अभ्यासक्रम हा गरजेपुरताच असतो. परंतु व्यक्तित्वाचा संपूर्ण व समतोल विकास , बौद्धीक विकास , भावनांचे उदात्तीकरण ,कलात्मक प्रवृत्तीचे उन्नयन याबरोबरच उत्पादन क्षमता , व्यवहारिक कार्य कुशलता , उदरनिर्वाहाची पात्रता इत्यादी गोष्टींना शिक्षणात स्थान दिल्यास व्यवहारिक जीवनात निर्माण झालेली विविध प्रकारची समस्या दूर होऊ शकते . विद्यार्थ्यांचा मानसिक विकास हा कोणत्याही मंत्राने किंवा सत्तेच्या तंत्राने होऊ शकत नाही तर विद्यार्थ्यांचा मानसिक विकास हा ज्ञान मंत्राने होऊ शकतो. परिवर्तनाची दिशा देणारे हे ज्ञानमंत्र असले पाहिजे. उद्यमशीलतेची प्रेरणा , सर्वधर्मसमभाव , आणि सृजनशीलता ही जीवनविषय कौशल्य , आपत्कालीन व्यवस्थापन ,खाजगीकरण , उदारीकरण याचे परिणाम व जागतिक स्तरावरील विविध क्षेत्रातील घडामोडी याचा विचार करून विषयाची मांडणी करणे काळाची निकड आहे . सध्या माहिती व तंत्रज्ञानाची झपाट्याने प्रगती होत असून तिचा शिक्षण व्यवस्थेवर प्रभाव पडणे स्वाभाविक आहे . त्यासाठी माहिती तंत्रज्ञान , पर्यावरण जागतिकीकरणाच्या समस्यांची ओळख करून देणे आणि दैनंदिन आव्हानांना सामोरे जाणे साठी समर्थपणे पेलणारी उद्दिष्टे हे शिक्षणातून साध्य व्हायला हवीत .कालानुरूप अपरिहार्य ठरणारा बदल लक्षात घेऊन काही नवीन उद्दिष्ट तयार केल्यास ग्राम जीवनाचा कायापालट व्हायला वेळ लागणार नाही. हीच मराठवाड्यासह देशाच्या ग्रामीण विकासाची खरी नांदी ठरू शकते.कारण व्यक्ती व समाजाला आता अस्थिर करणाऱ्या नकाराचा वीट आला आहे. राज्याचे शैक्षणिक मागासलेपण दूर सारण्यासाठी बदलणाऱ्या वैश्र्विक विचारांची समाजाला आज गरज आहे .आसपासचा कोलाहाल , अनागोंदी त्यातून कसा मार्ग काढायचा हे आज कठीण झाले आहे .जगाचा इतिहास असो, अर्थकारण , समाजकारण असो वा आधुनिक तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रातील बदल समजले नाहीत तर वैयक्तिक अपमान मानला पाहिजे . प्रश्र्न समजून घेण्याचं बौद्धिक आव्हान आणि परिस्थिती बदलण्याची स्फूर्ती हाच जगण्याचा गाभा असला पाहिजे . आपली निष्क्रिय मानसिकता व लोकशाही सक्रिय करत नकाराला नाकारात जुने नाते अर्थपूर्ण करण्याचे आणि नवे नाते निर्माण करण्याचे आव्हान स्वीकारले तर हा पुढील अमृत काळ अधिक सुंदर होऊ शकतो हे मात्र निश्र्चित.

(*लेखक महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराचे मानकरी आहेत . )

**समाप्त * * ***



# अक्कलकोट ऐतिहासिक शस्त्र भांडार

■ विश्वनाथ चव्हाण,अक्कलकोट
मो. ७५८८२१४९७४

अक्कलकोट नगरीला तीनशे वर्षांपासूनचा भोसले कुळाचा संस्थानी इतिहास आहे. त्याच्या खुणा नवाजुना राजवाडा, ऐतिहासिक मंदिरे, राजघराण्याची स्मारके यांतून त्या नगरीत दिसतात.अक्कलकोटचे संस्थान छत्रपती शाहू महाराजांच्या साताऱ्याच्या गादीबरोबर आकारास आले. राजे फत्तेसिंह भोसले हे शाहूंचे मानसपुत्र होते . ते त्या संस्थानचे पहिले राजे. ती गोष्ट १७०७ सालची. पुढे १८९६ ते १९२३ मध्ये फत्तेसिंह भोसले (तिसरे) हे राजे होऊन गेले. राजांच्या काळात अक्कलकोटचा नवा राजवाडा आणि त्यांचे शस्त्रागार उभे राहिला .





त्यांचा नवा राजवाडा म्हणजे लंडनच्या बकिंगहॅम पॅलेसची प्रतिकृती आहे , ते सोलापूरजवळच्या अक्कलकोट शहरातआहे . राजवाड्याच्या अवशेषांच्या रूपाने इतिहासातील ते वैभव प्रेक्षकांसमोर उभे करू शकले. त्या राजवाड्याचे बांधकाम १९१० साली सुरू झाले. ते तेरा वर्षांनी, १९२३ साली पूर्ण झाले. तो राजवाडा त्याच्या भव्यतेने दीपवून टाकतो. वाड्याच्या दर्शनी भागावर अक्कलकोट संस्थानचे राजचिन्ह आहे आणि त्याखाली ‘सत्यमेव जयते’ ही त्यांची राजमुद्रा आहे . आपल्या देशाचे म्हणून वापरात असलेले ते बोधवाक्य कधीकाळी अक्कलकोट संस्थानचे होते. राजवाड्याच्या पहिल्या मजल्यावर शस्त्रागार आहे. त्यांना शस्त्रे जमवण्याचा छंद होता.त्यांनी असंख्य शस्त्रेही जमवली. त्या संग्रहातून अक्कलकोटचे ते शस्त्रागार निर्माण झाले हे आशियातील मानाचे शस्त्र संग्रहालय मानले जाते.



अक्कलकोट संस्थानच्या वंशजांकडून त्या साऱ्या ऐतिहासिक ठेव्याचे पिढ्यान् पिढ्या जतन केले जात आहे. सध्या ती जबाबदारी श्रीमंत राजकुमारी संयुक्ताराजे भोसले आणि श्रीमंत राजकुमारी सुनीताराजे भोसले , श्रीमंत राजकुमार मालोजीराजे (तिसरे )भोसले पार पाडत आहेत. ऐतिहासिक वास्तू आणि वस्तू या त्या त्या काळा-वेळाचे दर्शन घडवतात. कधी काळी बांधलेला अक्कलकोटचा तो राजवाडा आणि त्यातील ती जुनी ऐतिहासिक हत्यारे पाहताना तोच अनुभव येतो.

**समाप्त** ✻ ✻ ✻



**मारुती बनसोडे**
मो.९५९५१७१८६६

# ग्रामपंचायतींनी गरीबी मुक्त गाव करणे काळाची गरज..

संकल्पनेची ओळख आणि रचना जागतिक कार्यक्रम २०३० च्या माध्यमातून कोणालाही मागे सोडू नका तथा सर्वांना सोबत घेउन चला या प्रतिज्ञेच्या अनुषंगाने शासनाच्या प्रत्येक स्तरावर यानुसार अंमल करणे आवश्यक आहे. शासन स्तरावरून जाणीवपूर्वक अनेक काळापासून प्रयत्न करूनही ग्रामीण भागातील गरीबी दुदैवाने पाहिजे त्याप्रमाणात कमी झालेली नाही. जागतिक कार्यक्रम २०३० च्या माध्यमातून ग्रामपंचायतींना संधी उपलब्ध करून दिली आहे. ग्रामपंचायत ही एक तळागाळातील लोकशाही संस्था आहे. तेथे गावात राहणा-या लोकांसाठी अत्यंत महत्वाच्या बाबींच्या योजना आखणे आणि त्यावर कृती करणेबाबत ग्रामपंचायतीवर जबाबदारी सोपविलेली आहे. ग्रामपंचायतींना २९ विषयांवर काम करणे अपेक्षित आहे. संविधानिकरित्या अनिवार्य आहे, त्यापैकी काही विषय हे गरीबीच्या समस्येचे निराकरण करण्याबाबत महत्त्वपूर्ण आहेत. ग्रामीण गृहनिर्माण, गरीबी निर्मुलन कार्यक्रम, कुटुंब कल्याण, महिला आणि बाल विकास, दुर्बल घटकांचे कल्याण, आणि कृषी आणि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय है त्यापैकी महत्वपूर्ण विषय आहेत..

ग्रामपंचायती ग्रामसभेच्या माध्यमातून विचारमंथन करून कृती आराखडा ठरवतील आणि स्थानिक पातळीवरील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी गरीबी दूर करण्याचा व लोकांना उपजीविका देण्यासाठी कृतिकार्यक्रम राबवतील

सर्व विभागांचे, विशेषतः असुरक्षित लोकांचे जीवनमान उंचावणे हे गरीबी संपविण्यात महत्त्वाचे योगदान असेल आणि त्यामुळे गावात शाश्र्वत उपजीविका सुनिश्र्चित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिवाय, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक असुरक्षितता किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या धक्क्यांमुळे कोणीही गरीबीच्या पाशात मागे पडू नये म्हणून सामाजिक संरक्षणाची खात्री करणे आवश्यक आहे. गरीबी कमी करणे हे सर्व शासनाचे नेहमीच सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे. पंचायतीराज द्वारे जबाबदारीची वाटणी आणि योगदान हे विद्यमान धोरण निश्र्चिती मूल्यवर्धन असेल.

ग्रामपंचायत विकास आराखडा, मिशन अंत्योदय आणि छठड्च् ने तळागाळात गरीबी कमी करण्याच्या प्रयत्नांसाठी योजना आखण्यासाठी आणि उपक्रम हाती घेण्यासाठी वातावरण निर्माण केले आहे. अनुकूल शाश्वत विकासाचे उद्दिष्ट संकल्पना (SDGs) आणि गरीबी यांचा परस्पर संबंध लक्षात घेता, बहुआयामी आणि बहु-कारण, शाश्वत विकासाच्या संकल्पना विचारात घेणे आवश्यक आहे.

या संदर्भात, ग्रामपंचायतींना गरीबीमुक्त व उपजिवीका वृद्धीस पोषक गाव उद्दिष्टाचा पाठपुरा करणे आवश्यक आहे. सामग्रीचा प्रसार महत्त्वाचा असला तरी, सामग्री वितरीत करण्यासाठी सहभागी पद्धती तयार करणे ही त्यांना संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे आहे अन्यथा त्यांना फारसे हे समजणार नाही. म्हणून या थीम अंतर्गत सामग्री मोठ्या प्रमाणात व्यापलेली आहे म्हणून प्रशिक्षण विविध पद्धतीव्दारे

विचार करू शकणाऱ्या परस्पर संबंधीतांना मार्गदर्शन आवश्यक आहे

गरीबीमुक्त आणि उपजिवीका वृद्धिस पोषक गाव ग्रामपंचायती करीता उद्दिष्ट ठरवुन योजना करणे आवश्यक आहे. योग्य आधारित आणि बहुआयामी फ्रेमवर्कमध्ये ग्रामपंचायत साठी उद्दिष्ट ठरवा. आणि योजना गावाच्या बहुविध गरजा आधारीत ग्रामपंचायतीचे लक्ष्य निश्र्चित करून आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

गरीबी मुक्त गाव उद्दिष्ट साथ करण्याकरीता ग्रामपंचायत सर्वेक्षण व्दारे लाभार्थी निश्चित करून त्यांच्या गरजा ओळखुन त्याकरीता लक्ष्य ठरवून योजना तयार करणे. सहभागी प्रशिक्षणार्थींना ग्रामपंचायतीची भुमिका - SDGs संकल्पना, कारण, परिणाम, संबंध व आव्हाने याबाबत अवगत करणे आवश्यक राहील.

उद्दिष्ट संकल्पना पुढे घेऊन जातील

ग्रामपंचायत भागकल्पना त्यांचा परस्परसंबंधावर मार्गदर्शन

✲ आणि गावातील लोकांचे जीवाश् ल. सामाजिक-आर्थिक असुरक्षित लोका समस्या ओळखणे आणि संभाव्य उपायांचे मार्ग काढणे

✲ संकल्पनेची प्रासंगिकता प्रस्थापित करण्यासाठी गरिबीमुक्त आणि वर्धित उपजीविका याबाबत ग्रामपंचायतीची भूमिका

✲ ग्रामस्थांना संकल्पना १ च्या दिशेने संसाधने आणि अभिसरण क्षमतांची जाणीव करून देणे ६. ग्रामपंचायत गरीबी मुक्त आणि उपजीविका वृद्धित करण्यासाठी कृती योजना आणि पुढ मार्गाची रूपरेषा तयार करणे.

✲ GPDP मध्ये 'गरीबी-मुक्त आणि उपजिवीका वर्धित करण्यासाठी ग्रामपंचायत का आंतरभाव करण्याकरीता कृती कार्यक्रम ट. मोड्युलमध्ये कव्हर करण्याच्या प्रशिक्षण संकल्पना : सर्वागिण आणि परस्पर संबंधित असल्यामुळे, मोड्युलमध्ये विविध संकल्पना असतील ज्यांची काळजी घेतली जाईल काही

**प्रमुख विषय खाली दिले आहेत.**

१. ग्रामपंचायत मधील गरीबी मुक्त आणि वर्धित उपजीविका या प्रमुख संकल्पनांच सिंहावलोकन गरीबी मुक्त आणि वर्धित उपजीविका ग्रामपंचायत म्हणजे काय?

ii. गरीबी मुक्त यात बाल गरीबी आणि लिंग पैलूंसह गरीबी आणि उपासमार पुर्णत: कमी करणे.

सामाजिक संरक्षण आणि सुरक्षा यंत्रणा उपलब्ध करणे. कौशल्य, उद्योजकता आणि रोजगाराच्या संधीची उपलब्धता...

✲ गरीबी मुक्त आणि वर्धित आजीविका सुनिश्चित करण्यासाठी ग्रामपंचायतीची भूमिका आणि अभिसरण

✲ कृती नियोजन आणि GPDP आराखड्याचे एकत्रीकरण तळश्रळ देखरेख आणि पुनरावलोकन/ तथा झालेल्या कामाचा मागोवा घेणे. अशा पद्धतीने काम केल्यास आपल्या गावाची गरीबी मुक्त झाल्याशिवाय राहणार नाही असे मला वाटते

**समाप्त ✲ ✲ ✲**





**ज्योतिबा पारखे**
अक्कलकोट

# इडा पिडा टळो बळीच राज्य येवो!

प्राचीन काळी म्हणजेच जवळपास अंदाजे तीस ते चाळीस शतकापूर्वी बहुजनाचा राजा शीलवान गुणवान पराक्रमी महाप्रतापी सज्जनाचे रक्षण करणारा व दुर्जनांना दंड देणारा...(म्हणून असे म्हणतात कि बळी तो कान पीळी) अखंड जंबुद्वीप भारतावर संयमाने नितीने व खूशहालीने राज्य करणारा हा नितीवान व दानशूर असा बळीराजा होऊन गेला.त्यांच्या राज्यात जनता इतकी खुशहाल व सूखावली होती कि त्यांच्या बद्दल खालीलप्रमाणे संत व महापूरूषानी आपआपली मते मांडलीआहेत.यावरून आपल्याला लक्षात येईल कि बळीराजा किती महान व काळजीवाहू होता. हा सर्व लेखप्रपंच यासाठी कि निमित्त आहे दिवाळीचे..

आपण म्हणाल दिवाळी(दिपावली) व राजा बळीचा काय संबंध.?तर तो पूढीलप्रमाणे....

सर्वप्रथम बळीराजाच्याच नावाने साजरी होत असलेल्या दिवाळी बद्ल इतिहासिक उपलब्ध असलेल्या पुराव्यानिशी पहिल्यांदाच दिवाळी या सणा विषयीची माहिती मिळते. अरेबीयन प्रवासी १000वर्षापुर्वी अलबेरूनी ज्यावेळी

अखंड भारतात आला तेव्हा त्यांनी आपल्या पुस्तकात जे की आज अलबेरूनी का भारत या हिंदी भाषांतरित असलेल्या पुस्तकात (जे कि आज उपलब्ध आहे) असे नमूद करतात कि वासुदेव ची स्त्री लक्ष्मी आणी विरोचन चा पुत्र राजा बळी जो पाताळात बंदिस्त आहे. वर्षातून एकदा त्याला मुक्त करण्याचा व त्याची आतुरतेने वाट पाहण्याचा कार्तिकेच्या पहिल्या दिवशी अथवा अमावस्येच्या दिवशी जेव्हा सूर्य तूळा राशीत जातो. तेव्हा त्या दिवसाला दिवाळी मानतात लोक त्या दिवशी पहाटे उठून स्नान करतात अमेद चे कपडे घालतात एक- दुसऱ्यांना पान सुपारी भेट देतात व ते स्वार होऊन दान देण्यास निघतात व हर्षउल्हास- आनंदाने एकमेकांना भेटतात व त्या रात्री मोठ्या संख्येने दिवे लावले जातात जेणेकरून वायू शुद्ध म्हणजेच निर्मळ होईल. ह्या उत्सवाचे कारण हे आहे की महान राजा बळी जो सातव्या पाताळात बंदिस्त आहे. वर्षातून एकदा त्याला मुक्त करण्याचा व पुन्हा या संसारा मध्ये परतण्याची परवानगी मिळते.यासाठी हा सण बळीराज्य अर्थात बळीचे अधिपत्य म्हणून ओळखले जाते. तसेच आपल्या राजा विषयी असलेली तळमळ, प्रेम, आपुलकी व सहानुभूती म्हणून तसेच कृतज्ञ दिवस म्हणून ही पाळला जातो.जसे लोकराजे शाहू महाराजांना जे अपार प्रेम व जिव्हाळा मिळाला तोच प्राचीन काळी बळी राजांना मिळाला तेही कित्येक पटीने विषेश म्हणजे हजारो वर्षांपासून ते आजही कायम आहे. असे म्हणावे लागेल.. म्हणजेच काय तर बळीराजाचा मुक्त होण्याचा दिवस खुशीचा- आनंदाचा दिवस आपला सर्वात मोठा बहुजनांचा सण हा दिवाळी होय आणि या दिवाळीला बलिप्रतिपदेच्या दिवशी सर्व महिला माता-भगीणी कामना करतात (आजतागायत आजही) की, इडा पिडा टळो राजा बळीचे राज्य येऊ..

समतावादी व विद्रोही वारकरी पंथ या महान बळीराजाच्या

समर्थनार्थ पहिल्यांदा आपला आवाज बुलंद केला.. ते आपल्या विवेकवादी काव्यातून पूढीलप्रमाणे व्यक्त होतात.. विद्रोही संत तुकाराम महाराज आपल्या विठ्ठलाला जाब विचारतात अरे तू इतका निष्ठुर का झालास पुण्यवान दानी व्यक्तीला पाताळात का धाडीले ???

पुढे संत जनाबाई लिहितात पुण्यवंत जो पातळी लोक नेला! दरिद्री तो भाग्यवंत केला! चोरट्याचा बहुमान केला!कीर्तीवानाचा प्रमाण केला धुंद झाला तुझा दरबार

त्याचबरोबर संत नामदेव म्हणतात अपराधा विना बळी पातळी यातलास

याही पुढे जाऊन संत तुकाराम पुन्हा म्हणतात बळीया माझा पंढरीराव तो ह्या देवांचा ही देवअशा या

देवांचा ही देव ही ऊपमा संतांकडून मिळालेल्या राजा बळी ची महीमा पूढे

महात्मा फुले यांनी विद्रोही संतांच्याही पुढे जाऊन आपल्या विचारांना आणखीन धार लावत बळी राजा बद्दल देवाला प्रश्र्न करण्याऐवजी ते सरळ सरळ येथील प्रस्थापितांना धर्मसत्ताना धर्ममार्तंडांना प्रश्र्न विचारतात आपल्या गुलामगिरी या ग्रंथात उल्लेख करत ज्यांनी या बळीराजांची बदनामी केली त्याचे ते तीव्रतेने खंडन करतात. त्याचबरोबर बळीराजावर पोवाडा लिहून ते कुळस्वामी ही पदवी बहाल करत बळीराजा ला आमच्या कुळाचा स्वामी आहे. हे ठणकावून सांगतात.

मि या ठिकाणी महात्मा फुलेंच्या साहित्याच्या आधारे अंधश्रद्धेवर आधारित असलेला खरा इतिहास लपविण्यासाठी धूर्तपणाने तसेच स्वार्थ वृत्तीने बळी व वामनाची कथा सांगणार नाही.कारण आपण सर्व सुज्ञान आहात बूध्दीवान आहात तर्क करणारे(वामनाने कपटाने दानी राजा बळीकडे तीन पावले जमीन दान मागीतली तसे वचन घेतले.पहिले पाऊल सर्व पृथ्वी व्यापली,दूसरे पाऊल संपूर्ण आकाश व्यापून टाकले,तीसरे पाऊल कूठे ठेवू असे वामनाने विचारले असता माझ्या मस्तकावर ठेव असे बळी राजाने सांगितले.. मला एक सांगा वामनाचे पाऊल एवढे मोठे असेल का हो ? बरं! त्याचे धड किती मोठे असेल? दूसर्या पावलाने संपूर्ण आकाशच व्यापल्याने त्याचे धड कूठे गेले असणार? व तिसरे पाऊल ठेवण्यासाठी तो वामन बळीराजा सोबत कसा बरं संवाद साधला असेल?..असो जे तर्कहीन आहेत मंदबुद्धी आहेत अंधभक्त आहेत किंवा झोपींचे सोंग घेतले आहेत अशाना थोड्या वेळासाठी विसरून जाऊया आपलेच हाडामासांचे रक्ताचे आहेत ते) आहात असे मानूयात...

व आपल्या महापुरुषांचे विचार घेऊन आपणाला आपला विवेक जागृत करून आपल्या बुद्धीच्या कसोटीवर तर्काने पडताळून आपण आपल्या बुद्धीला शरण जात विचार करून आपणासाठी या महापुरुष व राष्ट्र संताने जे ज्ञान,जी करूणा, जो बंधुभाव दिला आहे तो आपण जोपासूया.. व खऱ्या अर्थाने आपली असणारी सणे व उत्सवे डोळसपणाने व विचारपूर्वक मनाला पटल्यावरच गूण्यागोविंदाने सामाजिक सलोखा ठेवून साजरा करूया...

अंधकाराची हार व प्रकाशाचा विजय म्हणून ओळखली जाणारी ही दिवाळी चला आनंदाने ऊत्साहाने साजरी करूया आपले दुःख,दारिद्र्य, अंधश्रद्धा,कपोल कल्पना, अज्ञान,आपल्या मधील असलेले मद, काम, क्रोध, द्वेष, ईर्षा आणि भेदभाव कायमस्वरूपी जाळून हर्ष उल्हासाने बंधू भावाने निरोगी बुद्धी व मनाने साजरी करत बंधुभाव जोपासून आपला समाज व राष्ट्र बळकट करूया.. व येणाऱ्या पिढीला नवा आदर्श घालून देऊया जेणेकरून येणारी पिढी हि शुद्ध ज्ञान, तर्कपूर्ण, विज्ञानवादी व मानवतावादी विचार स्वतःमध्ये रूजवून आपल्या विवेकाचा विकास करत आपला खरा इतिहास समजून घेऊन आपल्यावर होणारे अन्याय अत्याचार दूराचार व आपल्यावर लादलेली मानसिक गुलामगिरी कायमस्वरूपी झुगारून देऊन आपल्या महापुरुषांनी व राष्ट्रसंतांनी दाखवलेल्या विचारावर चालून सक्षम व बुद्धिजीवी व स्वाभिमानी पिढी घडावी व स्वतःचा इतिहास निर्माण करावा ह्या सदिच्छासह प्रजेच्या सुखदुःखात नेहमी स्वतःला हरवून बसणारा व त्यांच्या कष्टाचे व हक्काचे फळ सम समान वाटून देणारा नेता, पिता समान थोरला बंधू व राजा असलेला.. भारताच्या सांस्कृतिक व ऐतिहासाचे एक उत्तुंग व्यक्तिमत्व जे सुमारे साडेतीन ते पाच हजार वर्षापासून आपल्या भारतीय बहुजनाला भुरळ घातलेला महानायक महासम्राट महा तत्ववेत्ता दानशूर हीरण्यकशपूचा पणतू, प्रल्हादाचा नातू, वीरोचनाचा पूत्र,कपीलाचा पूतण्या आणी बाणासूरचा पीता व आम्हा सर्व मूलनिवासी बहुजनांच्या काळजाच्या सात पदरातील आदरातिथ्य स्थान वसवलेल्या राजा बळीस विनम्र अभिवादन मानाचा मुजरा. पुन्हा एकदा सर्वांना दीपावलीच्या मंगलमय व ज्ञानमय शुभेच्छा

**समाप्त ✻ ✻ ✻**





विनोद सदावर्ते
मोबा: ९१३०९७९३००

# माणसाला सन्मान देणारे महान संविधान

संविधानापुर्वी देशात मनुस्मृती नुसार कायदे होते म्हणून हजारो वर्षांपासून माणसाला माणसापासून दुर केले, माणसाने माणसाला हिन व तुच्छ लेखुन स्वतः ला इतरांना पेक्षा श्रेष्ठ लेखण्याची व माणुसकी ला काळीमा फासणारी संस्कृती येथे होते. कुत्र्या मांजराला घरा वावर होता पण माणसाला गाव बंदी होती, गावात राहणाऱ्यांना मनुस्मृती विरूद्ध बोलण्याचे वागण्याचे स्वातंत्र्य नव्हते. केवळ सेवा करून एकाच वर्णाचे श्रेष्ठत्व मान्य करायचे व स्वतः कमवलेले दान दक्षीणा स्वरूपात देऊन मोकळे व्हायचे. देशात ब्रिटिश आले ब्रिटिशांच्या येण्याने शिक्षण, राजकारण व नोकरी मध्ये हजारो वर्षांपासून हक्क अधिकार नाकारून माणसिक गुलाम बनवलेल्या लोकांना स्थान मिळाले परंतु सामाजिक पातळीवर मात्र मनुचेच कायदे अस्तित्वात होते. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जगातील एकमेव श्रेष्ठ संविधान निर्माण केले व सर्वात अगोदर मनुस्मृती ने प्रस्थापित केलेली विषमता, अस्पृश्यता व भेदभाव बाजूला सारून प्रत्येक माणासाला सारखे केले. मनुस्मृती ने चार वर्ण तयार करून त्यांची कामे वाटून दिली व एका वर्णातुन दूसऱ्या वर्णात जाण्याचे सर्व रस्ते बंध करून दिलेल्या कामाला च धर्म मानून धर्माचे पालन करणे हेच पुण्याचे काम समजून माणसाला मर्यादित, गुलाम करून एकप्रकारे माणसाचे अस्तित्व च नाकारले. परंतु हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या व्यवस्थेला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून उलथून टाकून प्रत्येक माणसाला समान केले. भारतीय संविधान कलम १४ नुसार समतेचा अधिकार बहाल केला आणि धर्म, वंश, लिंग, जात किंवा जन्मस्थान यावरून कोणताही भेद करता येणार अशी तरतुद केली. म्हणजे आता वर्णव्यवस्था नसुन प्रत्येक जन माणूस म्हणून जगेल व सारख्या च प्रमाने सर्वांना महत्त्व राहील. कोणीही श्रेष्ठ कनिष्ठ राहणार नाही. म्हणजेच कायदा प्रत्येकाचे समान संरक्षण करेल. हजारो वर्षांपासून स्वतः चे वर्चस्व स्वतः सांगणाऱ्यांना, व इतरांना तुच्छ लेखणाऱ्यांना या कलमामुळे धक्काच बसला. कारण मनुस्मृती नुसार चार वर्ण समप्रमाणात कधीच येऊ शकत नव्हते. प्रत्येकाला काही मर्यादा होत्या परंतु संविधानाने सर्व तोडून, वर्णव्यवस्था गाडून मानसाला महत्त्व निर्माण करून दिले. पुढे कलम क्रमांक १५ मध्ये राज्य कोणत्याही नागरिकांशी धर्म,जात,वंश,लिंग व जन्मस्थान यावरून भेदभाव करणार नाही. थोडक्यात काय तर जात धर्म लिंग वंश बघून कोणत्याही सरकारला कोणतीही बाब नाकारून लोकांना वंचित ठेवता येणार नाही. कलम क्रमांक १७ नुसार कोणत्याही नोकरी मध्ये वरील बाबीचा विचार करून नोकरी नाकारता येणार नाही. कारण संविधानापुर्वी ब्रिटिश राजवट वगळता मोक्याच्या ठिकाणी एकाच वर्णाचे वर्चस्व होते. हे वर्चस्व कलम क्रमांक १६ ने नष्ट करून माणसाला प्राधान्य दिले. कलम क्रमांक १७ नुसार अस्पृश्यता निवारण करून समतेची क्रांती केली. कलम क्रमांक १४,१५,१६ मध्ये माणसाला समता प्रस्थापित करून दिलीच. परंतु वर्णव्यवस्थेमधुन पुढे निर्माण झालेली अस्पृश्यता

नष्ट करणेही गरजेचे होते. कारण मनुस्मृती नुसार माणसाच्या स्पर्शाने काही लोक बाटायचे. आता कलम १७ नुसार बाटणारे लोक पवित्र करण्याचे काम केले. आणि कलम क्रमांक१७ असताना एखादा व्यक्ती स्पर्शाने बाटलाच तर बाटणाऱ्याला शिक्षा होते. म्हणजे अस्पृश्यता निर्मूलन कलम १७ ने केले आहे. आता काही लोकांना प्रश्र्न पडला असेल कलम १४-१६ तिन कलमांनुसार धर्म, जात, वंश लिंग व जन्मस्थान वरून भेद करताच येत नव्हता तळ मग कलम क्रमांक १७ हे येण्यामागचे मुळ कारण काय तर. थोडक्यात सांगायचे झाल्यास भारत जातीप्रधान आहे. म्हणुन प्रत्येक जात एकमेकांना उच्च निच समजत असते. जाती जातीतील लोकांनी भेद करू नये जसे बामणांनी मराठा, जाट, राजपूत यांना कमी लेखु नये मराठ्यांनी कुणबी, तेली,माळी साळी, कुंभार धनगर यांना कमी लेखु नये व अशा प्रकारची विषमता राहुच नये म्हणून १४-१६ कलम आणि ज्यांना अस्पृश्य समजून गावाबाहेर ठेवले मांग, महार चांभार, भंगी अशा जाती साठी कलम क्रमांक १७ हि गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कलम क्रमांक १८ नुसार लष्करी व शैक्षणिक पदव्या वगळून इतर सर्व पदव्या बंद केल्या जसे अनेकांना पुर्वी वेगवेगळ्या पदव्या देऊन त्या पदव्याच्या आधारे त्या व्यक्तीला वेगळे स्थान दिले जायचे. परंतु कलम १८ नुसार सर्व पदव्यावर बंधी घालून सर्व माणसे समान आहेत. केवळ सैन्यात मिळालेल्या पदव्या व शैक्षणिक क्षेत्रात मिळालेल्या पदव्याच वापरण्याचा अधिकार मिळाला. म्हणजे हजारो वर्षांपासून माणसा माणसात फुट पाडून त्यांना जवळ येऊ दिले जात नव्हते. एकमेकांना माणूस म्हणून न बघता केवळ त्यांचा वापर करून त्यांचे मानसिक व शारीरिक शोषण केले जायचे अशा लोकांना भारतीय संविधानाने माणुन तर बनवले परंतु माणसाचे अस्तित्व कायम रहावे म्हणुन संरक्षण केले. मनुस्मृती नुसार वेद स्मृती हेच सर्वश्रेष्ठ आहे. स्मृती ने निर्माण केलेले वर्ण व वर्णानुसार वाटून दिलेले काम प्रत्येकाने करायला पाहिजे. मनुस्मृती व त्यामध्ये लिहलेले याविरोधात कोणीही काहीच बोलु नये. जो मनुस्मृती व ब्राम्हणाच्या विरोधात बोलेल तो शुद्र समजला जाईल असे निर्बंध लादले. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम क्रमांक १९ नुसार देशातील प्रत्येक नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देऊन बोलण्याचा, व्यक्त होण्याचा, मत मांडण्याचा अधिकार दिला. त्यामुळे देशातील प्रत्येक नागरिक बोलायला लागला, वेगवेगळ्या माध्यमातून आपले मत मांडायला लागला. आणि हीच गोष्ट विषमतावादी व्यवस्था चालवणाऱ्याच्या जिव्हारी लागली. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सुरवातीलाच विषमता वादी व्यवस्था उखडून समतावादी व्यवस्था प्रस्थापित करून त्याचे संरक्षण केल्याने मनुस्मृती नुसार चालणाऱ्यांचा धर्म धोक्यात आला. कारण हजारो वर्षांपासून जे नाकारले होते स्वातंत्र्य कलम क्रमांक १९-२२ ने देशातील प्रत्येक माणसाला बहाल केले. पुढे संविधानाचे कलम २३ते २४ मध्ये शोषणा विरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार मिळाला. जाती प्रधान देशात अनेकांचे हक्क अधिकार नाकारले गेले म्हणून मुलभूत गरजा ही पुर्ण करणे अनेकांकडून शक्य होत नव्हते म्हणून तर इतिहासात आपण बघितले तर पडेल ती कामे माणसाकडून करून घेतली जात. व मोबदल्यात एक वेळचे जेवण, शिळी भाकरी, किंवा खाऊन उरलेले अन्न दिले जायचे. अर्थात स्वरूप बदलून हे प्रत्येक जातीधर्मात होते. अशा प्रथा रुढी बंद करण्याचे काम कलम २३, २४ ने केले. वेठबिगारीच्या नावाखाली मोजकाच मोबदला देऊन त्यांच्या कडून अनेक काम करून पशुप्रमाने वागणूक दिली जात होती. प्रत्येक माणसाला जिव असतो, मान सन्मान असतो हे विसरून जाउन पशुप्रमाने महिला व पुरुषांचे शोषण केले जायचे याला संविधाने आळा घातला. पुढे कलम क्रमांक २५-२८ धार्मिक स्वातंत्र्य बहाल करून प्रत्येक व्यक्तीला आपल्याला धर्माचे पालन करणे, उपासना करणे, धार्मिक कार्यक्रमाला हजर राहणे, धार्मिक कार्यासाठी निधी देण्याचे हक्क संविधानाचे बहाल केले. त्या अगोदर फक्त दान दक्षिणा ब्राम्हणांना देण्याचा अधिकार होता. संविधानाने दान दक्षिणा, धार्मिक कार्यासाठी निधि देण्याचा अधिकार दिला परंतु तो द्यायलाच पाहिजे यावर बंधन घातले नाही. थोडक्यात आपल्या मर्जीने लोक धर्माचे पालन करून धर्माचा प्रचार प्रसार वैयक्तिक पातळीवर करू शकतात. वरिल बाबींचा विचार केला तर संविधानाने माणसाला माणसातच आणले नाही तर त्यांचे अस्तित्व निर्माण करून त्यांना संरक्षण देऊन मान सन्मान तर दिलाच परंतु सर्वांना समान केले आणि येथेच मनुस्मृती चे कायदेशीर अस्तित्व संपुष्टात आले. परंतु वैयक्तिक पातळीवर मनुस्मृती ला माणणारे लोक आजही जे लोक अंधविश्र्वास, पाखंड व धर्माच्या नावाखाली एकत्र येतात त्यांना संविधान कळूच नये म्हणून इतर कामात व्यस्त करून संविधानाबद्दल दिशाभूल करणारी माहिती देतात. आणि स्वतःला गुणवंत व आभ्यासु, ज्ञानी समजणाऱ्यांना अजून संविधानाचे महत्त्व व गांभीर्य कळत नसेल तर त्याला गुणवंत वा शिक्षीत कसे म्हणावे. हजारो वर्षांपासून गुलामीत खितपत पडलेल्या लोकांना माणसात आणणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर एका जातीचे उद्धाते आणि संविधान एका जातीची संपती असे वाटत असेल तर अशा विचारांच्या लोकांना कोणत्या शब्दात बोलुन त्यांचा सन्मान करावा? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसात आणुन मानसिक गुलामीतुन मुक्त केले तरीही लोकांना संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कळत नसतील तर त्यांच्या बुद्धीची किव येते.

**समाप्त ✻ ✻ ✻**

बागेत आज आयुष्याच्या
गुलमोहर प्रेमाचा फुलला
प्रीतीच्या पवित्र बंधनाला
अर्पिन संसाराचा झुला !!

**– गजानन चिंचमलातपुरे**



**निलेश काळे**
मो.९९४६१०१६६३

# नवीन उद्योजकांसाठी उपयोगी लेख..

हौसेने,गरजेमुळे किंवा इतर काहीच न जमल्यामुळे व्यवसाय सुरु केला जातो ; थोडंबहुत यश मिळतं सुद्धा पण अशा काही चरर्क्षी / ळर्पी चुका होतात,ज्यामुळे गंगा उलटी वाहायला लागते. अन पाणी नाका तोंडात जायला लागलं ? कि,मग विचार करायची आठवण येते.तर मुळात याचा विचार अगोदरच व्हायला पाहिजे पण तो काय होत नाही.

म्हणून हा लेख .

जे उद्या होऊ शकते ते अगोदरच वाचलात ? तर पुन्हा पश्र्चात्ताप करायची वेळ येत नाही .

१) दुसरीच आयडीया आवडणे : माणसाचं हेच होतं .आपल्यापेक्षा त्याच्या क्षेत्रात पैसा आहे सोप्पं काम आहे, झंझट नाही असं वाटायला लागतं .हातचं सोडून पळत्याच्या मागे लागण्याने काय होतं? याच्या अनेक कथा आपण ऐकल्यात. खूप सारे बिजनेस ओनर्स हेच करतात. नको तिकडे व्यवसाय वाढ ! नको त्या क्षेत्रात ळर्पीर्शिीशर्पीं करून बसतात अन इथे आर्थिक गडबड होते .

२) अतिशय खराब प्लानिंग स्किल : मोकळ्या शेतात आपण बी कसंही फेकलं तरिही पीक उगवुन येणारंच ना ? पण तरिही मग शेतकरी ; एका शिस्तीत, ओळीत पेरणी का करतो ? तर त्याला माहितीये शिस्तीत पेरणी केली तरच, शिस्तीत मशागत अन कापणी करता येईल . म्हणून तो पुढची प्लानिंग नीट करतो.आमचा बिजनेस ओनर बघुन घेता येईल या ॲटीट्युड मध्ये स्वतःचं नुकसान करतो.

३) रिस्क घ्यायला अत्ती घाबरणे : मित्रांनो रिस्क घेणे हे शोध लावण्यासाठी अत्यंत आवश्यक असते.पण अनेकजण केवळ कशाला उगाचच या दोन शब्दामुळे आयुष्यभर मागे रहातात. रिस्क घ्यायला शिकलं पाहिजे. कॅलक्युलेटेड रिस्क आपली प्रगती करु शकते.

४) नाही कधी म्हणायचं ? न कळणे ; आपण रिस्क घेत नाही ही चुकय : पण उगं प्रत्येक बाबच फायद्याची वाटून जिकडे तिकडे होकार देत चललात ? तर ते सुद्धा चुकीचं आहे. मुळात गाडीला ब्रेक का असतो ? तर पुढचं जायला नाही म्हणण्यासाठी . तसं आपल्याकडून देखील काही बाबतीत नाही म्हणलं गेलं पाहिजे. आपण तिथे गप्प गार बसतो अन् ही प्रत्येकाला खुश करण्यासाठी हो म्हणणे आपली इमेज अन धंदा दोन्ही खराब करते .

५) तयारी करण्याआधीच पैसा खर्च करणे : पैसा कमावणे एक वेळ सोप्पं आहे पण योग्य ठिकाणी पैसा खर्च करणे फार अवघडय . अनेक व्यावसायिक चुकीच्या ठिकाणी पैसा खर्च करून बसतात . प्लानिंग / डिस्कशन न करता पैसा खर्च केला कि कामाच्या गोष्टींसाठी पैसाच उरत नाही.म्हणुन तयारी करून -रींशिीशर्पीं करून पैसा खर्च करत चला .

६) प्रोफेशनल मदत न घेणे : जगातली प्रत्येक गोष्ट आपण करू शकत नाही : ज्या कामात जो व्यक्ती एक्सपर्ट आहे? प्रोफेशनल आहे? त्याची मदत घेणं कधीही परवडतं . आपण भलतेच प्रयोग करायला गेलं कि नुकसान हे ठरलेले असते. म्हणुन ही चुक कधीच

करू नका ! प्रोफेशनल व्यक्तीने त्याच्या आयुष्यातली बरीचशी वर्षे त्यात घातलेली असतात, अन काही फीस घेऊन तो तुम्हाला अनुभवाचा फायदा देणार असेल ? तर तो घेतलाच पाहिजे.

७) कामावर फोकस नसणे : थोडं बहुत यश मिळाले कि, अनेक जण स्वतः शेठ समजायला लागतात . मग त्यांची शेठगिरी उतु जायला लागते. कामावरचा फोकस कमी होतो. अन जिथे फोकस कमी झाला ? तिथे धंदा मार खातो .म्हणून आपला आपल्या धंद्यावरचा फोकस कमी होऊ देऊ नये.



८) योग्य व्यक्ती कामावर न येणे : आपला व्यवसाय ही एक कामाची श्रृंखला असते .इथे प्रत्येक टप्प्यावर योग्य क्षमता असलेला माणुस लागतो. पण हा माझ्या ओळखीचा आहे. पाहुणा आहे. नातेवाईक आहे . या एकाच पात्रतेवर निवड केली जाते . किंवा पात्रता नसलेल्या अन कमी पैशावर काम करायला तयार असलेल्या व्यक्तीची निवड होते. जे चुकीचं आहे. कमी पैशात मिळणारी प्रत्येकच गोष्ट वाईट असते असं नाही. पण चांगल्या व्यक्ती - वस्तुसाठी पैसे मोजायला तयार राहीलं पाहिजे .

९) ग्राहकसेवा नसते : आजच्या ग्राहकाकडे पैसा आहे. भरपुर पैसा आहे. त्याला केवळ वस्तुच नव्हे तर तुमच्याकडून मान-सन्मान-सेवा- आदर- आतिथ्य हे सगळंच पाहिजे . तरच तो आपल्याकडे परत येऊ शकतो .अन आपण डिस्काऊंटचे बोर्ड लावून ग्राहकाला सेवाच नाकारतो . जे चुकीचं आहे .

१०) मार्केटिंग कॅम्पेन नसणे : तुमच्याकडे काय आहे? हे जोपर्यंत जगाला कळत नाही , तोपर्यंत जग तुमच्याकडे खरेदीला येणार नाही . त्यामुळे सततपणे मार्केटिंग असणं आवश्यक असतं. मार्केटिंग च्या सिक्वेन्सला कॅम्पेन म्हणलं जातं. अनेकजण पैसा खर्च होतो किंवा आम्हाला काय गरज? या भावनेपोटी गप्प रहातात. अन मग धंदा कमी यायला लागतो.

११) टीम स्पीरीट नसणे : आपल्याकडे कामाला लोकं तर आहेत पण त्यांच्यात एकवाक्यता नसणे. कामाचा उत्साहच नसणे. हे काय कामाचं ? टिम असणे यापेक्षा उत्साही टिम असणे शिकायची तयारी असणारी उत्साही टिम असणे फार आवश्यक असते.

१२) कसलीच स्ट्रॅटजीकल प्लानिंग नसणे : व्यापारी माणसाने पुढच्या महिनाभराचं कॅलेंडर बघुन प्लानिंग केलं पाहिजे. जे इतरांना दिसत नाही ? ते लक्षात घेऊन प्लानिंग केलं पाहिजे. यालाच स्ट्रॅटर्जीकल प्लानिंग म्हणतात . ते नसेल ? तर गडबड होणार हे नक्की . १३) सिस्टीम्स नसणे कोणत्याही बिजनेसला सुरळीत पणे चालु ठेवण्यासाठी सिस्टीम्स लागतात . अन आज अनेक बिजनेस ओनर्स कडे हेच नाहियं जे धोकादायक आहे. कारण ? जर तुमचा स्पर्धक प्रोफेशनल सिस्टीम घेऊन उतरत असेल ? तर आपण त्याच्या समोर टिकुच शकत नाही. म्हणून आपण आपला बिजनेस देखील सिस्टीमाईज केला पाहिजे

१४) प्रोफेशनल कल्चर नसणे : ज्याप्रमाणे एखाद्या व्यवसायात Vision/mission/system आवश्यक असतात. तसेच त्या व्यवसायात कल्चर आवश्यक असतं .अनेक व्यावसायिकांच्या याचं महत्व मनात सुद्धा येत नाही जे चुकीचं आहे.

१५) बिजनेस कोचिंग नको वाटणे : वर लिहिल्या प्रमाणे कि प्रोफेशनल व्यक्ती आपला वेळ / पैसा / श्रम सगळंच वाचवतात . तसेच बिजनेस कोचेसला वेगवेगळ्या क्षेत्राचा अन टिमचा अनुभव असतो. त्यामुळे ते तुमच्या बिजनेसला वेगळ्या उंचीवर नेऊ शकतात पण फिस द्यावी लागते म्हणुन डॉक्टर कडेच जायचं नको ! असं म्हणल्याप्रमाणे लोक बिजनेस कोचिंगला टाळतात अन बिजनेस मधला आजार वाढायला लागतो .हे टाळता येतं आणि टाळलं गेलं पाहिजे. वरील पॉईंट नुसार होणाऱ्या चुका आपण टाळल्या ? तरच आपला व्यवसाय यशस्वी होऊ शकतो .

तेंव्हा या चुका टाळा ! अन व्यवसायात प्रगती करा !

**समाप्त ❊ ❊ ❊**





ॲड.सचिन बनसोडे
महासचिव जनता दल(यूनाईटेड) मुंबई

# नवीन शिक्षण धोरणाचा धोका आणि कंत्राटीकारणाचं संकट

२९ जुलै २०20 रोजी केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केलं. अनेक शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत यांनी या धोरणावर आक्षेप घेतले आहेत. नव्या शिक्षण धोरणात सहावीपासून विद्यार्थ्यांना कौशल्ये शिकविली जाणार आहेत. ते शिकताना ग्रामीण व शहरी भागातील छोट्या शाळा, जिथे पायाभूत सुविधांची कमतरता आहे. कौशल्य विषय शिकविण्यास प्रशिक्षित शिक्षक नाहीत. अशा दहा शाळांचा समूह करून तो मोठ्या वर्गाच्या शाळेला जोडला जाईल. त्या मोठ्या शाळेतून आवश्यकतेनुसार साधने व शिक्षक छोट्या शाळांना पुरविले जातील. भविष्यात २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची दळणवळणाची साधने व भौगोलिक अंतर याचा विचार करून त्यांची विलगीकरण करण्यात येण्याची शक्यता आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यात तसा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा विलगीकरण (बंद) करण्याची शक्यता अधिक आहे.

शिक्षण हक्क कायद्याची मर्यादा व कक्षा नवीन शैक्षणिक धोरणामुळे कमी पटसंख्येच्या ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शाळा संकुल ही संकल्पना छोट्या शाळांना समृद्ध करणारी असेल; पण त्याआडून छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. त्याचबरोबर हे नवीन शिक्षण धोरण धर्मनिरपेक्ष राष्ट्र असलेल्या आपल्या देशाच्या विरोधात आहे. नवीन धोरणात धर्मनिरपेक्षता, संविधानाची मूल्ये नाहीत. हिंदू राष्ट्र कल्पनेला बळ देणाऱ्या या धोरणात मुख्यत्वे शिक्षणासाठी योगदान देणाऱ्यांना स्थान नाही. अल्पसंख्यांकांनी शिक्षणासाठी दिलेले योगदान, संविधानाची मूल्ये याचा अंतर्भाव नाही. धोरणातील नवीन परदेशी विद्यापीठांमुळे सर्वसामान्यांना शिक्षण घेणे परवडणार नाही. शुल्क आकारणी ही संस्थांच्या हातात राहणार असून दुसरीकडे शुल्क नियंत्रण कायदा, असा विरोधाभास, गुंतागुंत आहे.

देशातील प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण, समान आणि विनामूल्य शिक्षण देण्याची सरकारची जबाबदारी आहे. केंद्रांने बालकांचा मोफत व सक्तिचा शिक्षण हक्क कायदा केला. मात्र, त्यात अनेक त्रुटी असल्याने मोफत, सक्तीचे शिक्षण सोडाच शिक्षणच घेवू शकत नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे कायदाच मुळात फसवा आहे. केंद्र सरकारने शिक्षणावरचा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या आठ टक्के करायला हवा. बालवाडी ते उच्च शिक्षण मोफत द्यावे, शिक्षण व्यवस्थेसाठी स्वतंत्र स्वायत्त शिक्षण आयोग निर्माण करायला हवा. नवीन शिक्षण व्यवस्थेतील हा धोका सर्वांनी लवकरच ओळखला पाहिजे. यासोबतच कंत्राटीकरणाचं संकट आपल्यासमोर आ वासून उभं आहे. नुकतेच महाराष्ट्र सरकारने सरकारी नोकर भरती खाजगी कंत्राटदारांमार्फत करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र नंतर लोकरेट्यामुळे त्यांना तो निर्णय मागे घ्यावा लागला.

मात्र केवळ एक दोन शासन निर्णय रद्द करण्याइतका मर्यादित हा कंत्राटीकरणाचा प्रश्र्न नाही. शासकीय सेवांचे ऑऊटसोर्सिंग करणे, कंत्राटीकरण करणे, रिक्त पदे न भरणे हे मोदी सरकारच्या दबावाखाली

राबविले जाणारे राज्य सरकारचे धोरण आहे. आरोग्य आणि शिक्षण ह्या दोन क्षेत्रांना उत्पन्नाचे निकष लावणे हा मूर्खपणा आहे, आरोग्य आणि शिक्षण ह्या सेवा मानव विकास निर्देशांक उंचाविण्यासाठी गरजेच्या आहेत. त्यामुळे नफा तोट्याचे गणित याठिकाणी लावता कामा नये. शिक्षणाचे शुल्क वाढवणे, खासगी संस्थांना विनानुदानित महाविद्यालये चालविण्यासाठी प्रोत्साहन देणे, परकीय खासगी विद्यापीठांना मोकळे रान देणे हा एकूण शिक्षण क्षेत्राचेच कंत्राटीकरण करण्याचा प्रयोग सध्या नग्नपणे राबविला जातोय. तासिका पद्धतीने प्राध्यापकांना राबवून घेणे, शिक्षण सेवक म्हणून पिळवणूक करणे ह्या धोरणांमध्ये मुलभूत बदल घडणे आवश्यक आहे. नेशनल मॉनीटायझेशन पाईपलाईन ह्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेल्या धोरणानुसार देशातील सर्व नफ्यात असलेले सार्वजनिक उद्योग कॉर्पोरेटला विकून टाकणे हाच रोजगार निर्मितीतील सर्वात मोठा अडथळा आहे. वर्षाला २ कोटी रोजगाराचे आश्र्वासन मोदी सरकारने पाळलेले नाही, उलट सैन्यदलातील जागा अग्निवीर योजनेमार्फत कंत्राटी करून करोडो युवकांच्या भवितव्याची राखरांगोळी केली आहे, शहीद झालेल्या अग्निवीर तरुणाला सन्मान सुद्धा देण्यात आला नाही ही बाब संतापजनक आहे. राज्यातील प्रशासकीय सेवेत जाण्यास इच्छुक असलेले युवक व सर्वसामान्यांच्या विरोधाचा कानोसा घेत, आपली राजकीय गणित तपासत राज्य सरकारने कंत्राटी नोकर भरतीचा शासन निर्णय रद्द करण्याची घोषणा करतात आणि मागील सरकारांवर खापर फोडून मोकळे झाले. मागील सरकारांनी स्वीकारलेले कंत्राटी धोरण हे सरसकट रद्द करण्याची भाषा आणि त्याजोगी कृती त्यांनी करून दाखवावी, ते शक्य नसेल तर राज्यातील युवकांची दिशाभूल करू नये. शिक्षण क्षेत्राचे संपूर्ण कॉर्पोरेटायझेशन करू पाहणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात लागू करण्याचे पुरेपूर प्रयत्न सध्याचे सरकार करत आहे. जागरूक नागरिक म्हणून आपण सर्वांनीच या प्रश्र्नांकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे. प्रसंगी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षक संघटना, चळवळी यांना बळ द्यायला हवे. हे जर आपण केले नाही तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही.

**समाप्त * * ***






ॲड.अविनाश काले
मो.९९६०१७८२१३

# आरक्षण लढाईचे सार राजकीय फेर बदलात होईल काय?

महाराष्ट्राच्या राजकारणात जालना जिल्हा हा आरक्षणाच्या लढाईचे केंद्र बिंदू बनलेला आहे. निजामकालीन कुणबी दाखले मराठवाड्यातील मराठा समाजाकडे असल्याने व १९६७ पूर्वीचे कुणबी मराठा यांना ओबीसी आरक्षणात लाभ मिळाल्याने, वाढीव आरक्षण कोट्याला असलेल्या सुप्रीम कोर्टाच्या मर्यादा लक्षात घेता ५०% चे आत ओबीसी कोट्यातून शिरकाव करता येऊ शकतो असा विश्र्वास मराठा आरक्षण आंदोलनकर्त्यांना वाटू लागला व यातून ही चळवळ सुरू झाली.सुरुवातीला या आरक्षणाचे लाभार्थी फार फार तर पाच-दहा हजारांत राहतील असे वाटल्याने त्याकडे कोणी विशेष गांभीर्याने पाहिले नाही. अश्या स्थितीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी विराजमान असणाऱ्या मा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी छत्रपती शिवराय यांची शपथ घेऊन मराठा आरक्षणपुर्ती करण्याचे वचन देऊन त्यांचा राजकीय पाया मजबूत करण्याचे धोरण आखत समग्र शासकीय यंत्रणा दाखले पुरावे शोधण्याच्या कामाला लावले. अचानक मोठ्या प्रमाणावर मराठा कुणबी दाखले निघू लागले त्याच समवेत मारवाडी, लिंगायत असे ही कुणबी दाखले निघू लागले यातून कायदेशीर समस्या उद्भवू शकते हे त्यांना ज्ञात झाले.

म्हणूनच ना. तानाजी सावंत यांनी सरसकट कुणबी दाखले देण्यातील अडचणी मांडण्याचा प्रयत्न केला असाच प्रयत्न खुद्द मुख्यमंत्री यांनी त्यांच्या सातारा जिल्ह्यातील दरे या गावी महिला बैठकीच्या माध्यमातून केला. पण सहजी जोर लावला तर आरक्षण मिळून जाईल या भूमिकेतून समग्र महाराष्ट्रातील मराठा समाजाने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष त्यांची शक्ती मनोज जरांगे पाटील यांच्या मागे उभी केली. आंतरवाली सराटी येथे आंदोलकांवर झालेला लाठी हल्ला माध्यमांनी घरा घरात पोहचवला होता.आरक्षणाच्या प्रतिकूल नेहमी प्रमाणे ॲड गुण रत्न सदावर्ते यांनी कायदेशीर युक्तीवाद माध्यमातून चालू केला आणि सामाजिक विभाजनाला सुरुवात इथेच होण्याला सुरुवात झाली.

इतिहासापासून आजतागायत गाव खेड्यात मराठा समाजाची असलेली सामाजिक, राजकीय वर्चस्वाची पकड अधिक मजबूत असल्याने आरक्षण घेऊन आल्या शिवाय कोणत्याच राज्यकर्त्यांना गावात प्रवेश बंदी असल्याचे डिजिटल फलक मनोज जरांगे पाटील यांच्या फोटो सह लागले. प्रस्थापित मराठा नेते, राजे, महाराजे ही या लढाई तून बाहेर फेकले गेले व मराठा समाजाचा एकमुखी चेहरा म्हणून जरांगे पाटील पुढे आले.

संसदीय राजकारणात सर्व समाजाची मते आवश्यक असल्याने , प्रस्थापित मराठा राजकीय घराणी अप्रत्यक्षरीत्या या आंदोलनाच्या पाठीशी राहिले हे ही वास्तव आहे. गरजवंताचा हा आरक्षण लढा थेट सातारा कोल्हापूर गादीचे आशीर्वाद घेऊन लढला जात असताना हा फक्त गरीब चेहऱ्याचे आडून कोणत्या राजकीय कारणासाठी अधिकचा आहे हे तपासले जाऊ लागले तेंव्हा ओबीसी ना घटनात्मक दृष्ट्या राजकीय आरक्षण नसल्याने ते फक्त राज्य निहाय ओबीसी जातीच्या

नुसार फक्त स्थानिक स्वराज्य संस्थेत आहे.

ज्या मुळे ते ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अश्या ओबीसी आरक्षित जागेवर उभे राहू शकत होते. जिल्हा परिषद अध्यक्षपद राखीव ठेवले तर ते इंद्रा सहानी केसचे निकाला नुसार ५०%ची मर्यादा भंग करते व ही जागा एकच असल्याने आरक्षण १००%होते म्हणून या पदाला आरक्षण मुक्त करण्यात आले. तेंव्हा पासून या स्पर्धेत ना ओबीसी आला ना एस सी एस टी, घटनात्मक राजकीय आरक्षणाने निवडणुकीत घटलेली मराठा समाजाची संख्या ओबीसी आरक्षणाने ही घटली याचे दुःख राजकीय नेत्यांना होते व आहे हे वास्तव लक्षात घेता मराठा समाजा शिवाय इतर कोणत्याही समाज घटकास सत्ता प्राप्त होऊ नये हाच प्रमुख उद्देश या लढाई ला प्रस्थापित राज्यकर्त्यांनी चीटकवला.आ. गोपीचंद पडळकर हे पवार घराण्याच्या वर नेहमी टीकास्त्र सोडतात परंतु त्यांची ही भूमिका प्रतीकात्मक आहे ते प्रस्थापित घराणेशाहीचे विरोधात भूमिका मांडत असतात. धनगर समाजाचे आरक्षण लढाईचे निमित्ताने मी त्यांच्या सानिध्यात दीर्घकाळ एकत्रित राहिलो, महाराष्ट्रातील धनगर समाज लोकसंख्येने २ कोटीच्या घरात आणि समाज म्हणून एकसंघ असताना ही लोकसंख्येच्या प्रमाणात या समाजाचे आमदार खासदार निवडून येत नाहीत. एखादा दुसरा प्रतिनिधी प्रस्थापित पक्ष घेतात ही स्थिती संसदीय राजकारणात असेल तर मायक्रो ओबीसीचे लोकप्रतिनिधी कसे दिसतील? माझे मार्गदर्शक नेते तुकाराम माने साहेब हे सामाजिक बांधकाम विभागातील अभियंता असताना ही याच असवस्थेतून राजीनामा देऊन बाहेर पडले आणि स्वंतत्र मतदार संघाच्या पुन्हा पेटवा मशाली हे पुस्तक त्यांनी लिहून दर्शवून दिले की प्रस्थापित पक्ष आणि त्यांचे नेते उपेक्षित समाजातील दलाल लोकांनाच राजकीय संध्या देतात आणि या मुळे दलीत, आदिवासी, ओबीसी या वर्गा वर प्रस्थापित शासनकर्ते विविध प्रकारे अन्याय करतात. त्यांच्या विकास योजनांना कात्री लावली जाते त्यांचा सामाजिक न्यायाचा अनुशेष न भरता तो इतरत्र वळवला जातो या वर्गातील जनतेला बँका कर्ज देत नाहीत. त्यांचे शेतीला अर्थ पुरवठा होत नाही, त्यांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देताना हात आखडून घेतले जातात आणि नौकर भरती करताना ही उपलब्ध विद्यार्थी असताना ही कोणते ना कोणते कारण दर्शवून त्या जागी उच्च वर्णीय भरून त्यांना मुदत वाढ देत देत कायम लाभार्थी बनवले जाते.मी ज्या समाजातून आलो आहे त्याची अवस्था तर फारच बिकट आहे तो सामजिक दृष्ट्या अजून ही बहिष्कृत आहे या समाजाचा उमेदवार भरती प्रक्रियेत बाजूला सारला जातो त्या ठिकाणी पर्याय निवडला जातो. राजकीय सामजिक आवड म्हणून मी वकिली न करता राजकारणात आलो आज माझे वय ६० वर्षाचे आहे साध्या ग्राम पंचायत निवडणुकीत मी उमेदवार असावे असे कोणत्याही प्रस्थापित पक्षास नेत्यास वाटले नाही हा माझा अनुभव आहे.

जावे कुण्या ठिकाणी उध्वस्त माणसांनी
संतात ही घरांच्या राखेस भाव नाही..

या सुरेश भट्ट यांच्या गझल मधील ओळी सारखी आमची अवस्था याचे कारण आहे ही संसदीय राजकीय व्यवस्था प्रस्थापित घराणी कोळून प्याले आहेत. तिथे शिरकाव ना ओबीसी ला आहे ना आदिवासी ला ना दलितांना ना भटक्या विमुक्ताना..

सामाजिक दृष्ट्या शिरोधार्थ असलेल्या ब्राम्हण समाजाने हिंदुत्वाचे तत्वज्ञान विकसित केले त्या आधारे पक्ष संघटन उभे केले म्हणून अती अल्प लोकसंख्या असताना ही किमान यातील लोक हे प्रमुख म्हणून राहत आहेत.या आरक्षण लढाईत दोन नेते थेट मनोज जरांगे यांच्या समर्थनात उतरले यातील एक प्रहारचे आमदार बच्चू कडू साहेब आणि दुसरे वंचित चे संस्थापक अध्यक्ष ऍड. प्रकाशजी आंबेडकर साहेब

या दोघांची ही कारण मीमांसा वेगवेगळी आहे. पैकी आ. बच्चू कडू यांनी शिवसेना बंडखोर यांना साथ देऊन ही सरकार स्थापनेत त्यांना वाटा न मिळाल्याचे श्यल्य आहे आणि याचा सुड ते सरकार वर उगवत आहेत. ऍड प्रकाशजी आंबेडकर साहेब यांना गरजवंत मराठा आणि प्रस्थापित मराठा (निजामी मराठा त्यांचे भाषेत)असे वर्गीकरण करायचे आहे आणि हा गरजवंत मराठा वंचितचे पाठीमागे राजकीय बळ एकवटून उभा राहील किंवा रहावा असे त्यांना वाटते.

मी फार छोटा कार्यकर्ता असल्याने यावर अधिक भाष्य करणार नाही परंतु माझे स्पष्ट मत आहे असे विभाजन होणे अश्यक्य आहे. गरजवंत असले तरीही त्यांची गादी ठरलेली आहे आणि भारतात जाती इतकी एक संधता कुठे ही अस्तित्वात नसते.

असो असाच प्रयोग माजी खा हरिभाऊ राठोड करू पाहत आहेत.

अंबड येथे झालेल्या एल्गार परिषदेत आ. गोपीचंद पडळकर यांनी विविध जातीचे विविध पक्ष व संघटनेत विभागलेले वाघाचे बछडे एकत्रित आले आहेत व हे ऐक्य कायमस्वरूपी रहावे असे सूचित केले तरच कांहीं बचाव होईल. नांदेड येथे काल आ प्रकाश अण्णा शेंडगे यांनी ही ओबीसी समाजाचे राज्य कर्ते मतपेटीतून बाहेर काढावे लागतील असे वक्तव्य केले. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे फलीत म्हणू यात किंवा प्रतिक्रिया म्हणुयात पण एक बाब सकारात्मक घडते आहे ती म्हणजे प्रस्थापित राजकीय नेत्यांना बाजूला सारून नवे उमेदवार व त्या उमेदवारांना मते देण्याची राजकीय जाणीव विकसित होत आहे या प्रक्रियेला अधिक गतिमान करावे लागेल ओबीसी/ एस सी /एस टी/मुस्लिम ओबीसी अश्या सर्व गैर मराठा राजकारणाची सुरुवात सर्व लोक प्रतिनिधी त्या त्या सामाजिक वर्गातील विचारवंत / पत्रकार / वकील/ डॉक्टर/उद्योजक यांनी मिळून करावी लागेल.व तसे घडताना दिसत आहे.

सगळ्याच घडामोडी समाज माध्यमातून व्यक्त करता येत नाहीत , या मर्यादा लक्षात घेता इथेच थांबतो ,पण याच लेखातून इतकेच सांगतो की राजकीय फेर बदलाला सुरुवात झाली आहे , जय अहिल्या जय जोती जय भीम..!

**समाप्त** * * *



उपसरपंच
मा.पंकज मलकप्पा सुतार
नूतन उपसरपंच वागदरी
तमाम शेतकरी बांधवांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
ग्रामपंचायत, वागदरी व समस्त ग्रामस्थ वागदरी, ता.अक्कलकोट




दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
सिध्दार्थ गायकवाड
संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती
अक्कलकोट जि.सोलापूर.



आमच्या असंख्य ग्राहकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!
प्रोप्रा.राजु गवंडी
मो.८७८८९६५९५४
९९६०१३०८२१
बालाजी बिल्डिंग कॉन्ट्रक्टर
आमच्याकडे सर्व बांधकामसाठी लागणारे वाळु,विट,योग्य दरात मिळेल
तसेच प्लबिंग,टाईल्स,प्लास्टर व मोल्डींगचे कामे करून मिळेल
भाजीपाला मार्केट,मेन रोड दुधनी ता.अक्कलकोट जि.सोलापूर




दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा..!!
Deva : 9730089742
9322386934
Vijay : 9322386934
8483000831
PRABUDDHA ENTERPRISES
आमच्याकडे जे.सी.बी., डंपर, आयवा,
पोकलेन आदी गाडया कन्स्ट्रक्शनसाठी भाडयाने मिळतील.
XEROX
COLOUR XEROX
LAMINATION
Shop No. 2, Amardham Chowk, Khemani, Ulhasnagar.




तमाम जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
प्रोप्रा. गौतम बाळशंकर
9021655238
8087598842
तेजस्वी अर्थमुव्हर्स
आमच्याकडे शेतीची, रस्त्यांची जेसीबी मार्फत कामे करुन मिळतील.
भीमनगर हन्नूर ता.अक्कलकोट जि.सोलापूर




सर्व जनतेला
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक : मा.संजयबाबा ननवरे
गोरगरीबांच्या कायम मदतीस धावणारे समाजसेवक




दिवाळीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!
प्रणव मॅटर्निटी व सर्जिकल हॉस्पिटल
डॉ.गिरनार गवळी
M.B.B.S.DGO.F.C.P.S.(Mumbai)
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ
डॉ.शोभा गवळी
M.B.B.S.M.D.(Pune)
भुलतज्ञ
उपलब्ध सुविधा
* २४ तास अत्यावश्यक सेवा * २४ तास डिलेव्हरीची सोय
* गर्भपिशवीच्या आजारांवर संपूर्ण उपचार व शस्त्रक्रिया
* टाका व बिनटाका कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया * वैद्यकीय गर्भपाताची सोय
* गरोदरपणातील सर्व तपासण्या व उपचार
* महिलांच्या सर्व आरोग्य समस्यांवर उपचार * जनरल शस्त्रक्रियांची सोय.
के.वी.पी.कॉलेज चौक, जुना अकलूज बायपास रोड, पंढरपूर मो.९६२३२७४३६६




महान तपस्वी श्री.संत राजाराम महाराज (श्री.संत कैकाडी महाराज)
विश्वपुण्यधाम मंदिर तर्फे सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
॥ विश्वपुण्यधाम ॥




तमाम जनतेला दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
सोलापूर जिल्हा स्टॅम्प व्हेंडर व बॉन्ड रायटर संघटना (रजि.) यांचे अंतर्गत
पंढरपूर शहर व तालुका स्टॅम्प व्हेंडर, बॉन्ड रायटर संघटना, पंढरपूर
अध्यक्ष
राजाभाऊ (रामचंद्र) आराध्ये
मो. ९८२२५२६२३१
जिल्हाध्यक्ष
मोहन वडगावकर (मुक्त पत्रकार)
फोन : २७२४५००. मो. ९४२२४५८०९०
उपाध्यक्ष
नंदकुमार (यशवंत) कुलकर्णी
मो. ९८५०१८२५५२
सचिव
पंढरीनाथ मोघे
मो. ९८५०१३०८१२
कार्याध्यक्ष
अनिल गवळी
मो. ९९६०९५९०२३
खजिनदार
सर्जेराव बोंगे
मो. ८८८८५३०६८८
सहसचिव
सिताराम गायकवाड
मो. ८६००७७५००६


तमाम जनतेला
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
: शुभेच्छुक :
मा.ज्योतिबा उर्फ जयभाऊ पारखे.
सामाजिक कार्यकर्ता तथा
फकीरा दल सोलापूर जिल्हा प्रमुख.


तमाम जनतेला दिवाळीच्या
आरोग्यमय शुभेच्छा..!!
रक्तदान हेच श्रेष्ठदान
रक्तदान करा जीव वाचवा...
Mr.Satyam Gaikwad
Chairman
Mo.8830534296, 9960193121
महात्मा बसवेश्वर
रक्तपेढी, सोलापूर
Mahatma Basaveshwar
Blood Centre, solapur
Contact For Arranging Blood Donation Camp's
* 24x7 Services
Sonamata Nagar, Mashale Vasti,
Near inchgiri Math, Vijapur Road, Solapur,


आमच्या असंख्य पालकांना व विद्यार्थ्यांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
श्री बाहुबली विद्यपीठ, बाहुबलीचे
श्री सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी.
ता.शिरोळ जि.सोलापूर
श्री.संजय तपासे
मुख्याध्यपक
श्री.जितेन्द्र कोथळी
चेअरमन
सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, अध्यापक-अध्यापिका,शिक्षकेतर कर्मचारी,
स्थनिक समिती सदस्य, शालेय समिती सदस्य व संस्था पदाधिकारी


तमाम जनतेला
दिवाळीच्या खूप खूप
शुभेच्छा..!!
युवा नेते
मा.सुनील (मालक) चव्हाण साहेब
चेअरमन श्री तुळजाभवानी सहकारी
साखर कारखाना नळदुर्ग, ता.तुळजापूर
----------शुभेच्छूक------------
ॲड. रामचंद्र ढवळे
(तुळजापूर तालुका सत्र न्यायालय)
तथा संचालक क्रषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर
संपर्क : ९९२२८४७३२३


तमाम जनतेला
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा.!!
: शुभेच्छुक :
मा.शरणु गायछोडे, पुणे शहर चिटणीस
ग्रामपंचायत सदस्य नावदगी, रिपब्लिकण पार्टी ऑफ इंडिया (आ)


शुभ
दीपावली
शुभेच्छुक : दिपक बनसोडे
उपसरपंच ब्रह्मणपूर ता.अक्कलकोट


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
बांधकाम विभाग(जि.प.) अक्कलकोट जि.सोलापूर



**नामदेव ढसाळ**
साहित्यिक/कवी



विशेष व्यक्तिमत्व

**राजाभाऊ सरवदे**
सामाजिक/राजकीय

विशेष व्यक्तिमत्व



**आ.सचिन कल्याणशेट्टी**
सामाजिक/राजकीय




**चंद्रशेखर भांगे**
पत्रकार



**गौतमी पाटील**
कलाकार

# विशेष व्यक्तिमत्व




: शुभेच्छुक :

**जिल्हा परिषद शाळा गोगांव ता. अक्कलकोट जिल्हा सोलापूर**




: शुभेच्छुक :

**तालुका कृषी अधिकारी , अक्कलकोट सोलापूर रोड अक्कलकोट**

नामदेव ढसाळ

# उत्तरार्ध आणि अस्त





**शरणबसपा सोनकांबळे**
मो.

नामदेव ढसाळ यांच्यातील वैचारिक बदल कसा झाला व का झाला आणि त्या बदलाचा त्यांच्या साहित्यावर काही परिणाम झाला का, या प्रश्नाचा शोध-

ज्या पिढीतील कवींशी आपण आयुष्यभर भांडलो, ज्यांच्याविरुद्ध आपण बंड केले, त्यांच्या मृत्यूने आपणाला अतोनात दु:ख का व्हावे? की ढसाळांच्याच भाषेत सांगायचे तर, त्यांच्या कवितेतील मातीच्या वैभवातच हा आपला जीव अडकला आहे? अरुण कोल्हटकर,दिलीप चित्रे, ग्रेस आणि आता नामदेव ढसाळ! सुन्नतेच्या काठावर उभे राहून मृत्युलेख कसे लिहिले जातात? शोकात्म शब्दांच्या अंतरंगात एक पोरकेपण कसे काय पसरते?

असे नव्हते की, ढसाळ हे पहिले कवी होते वा पहिले दलित कवी होते; पण ढसाळांनी दलितांच्या दु:खी वास्तवाला कल्पनाशक्तीने जी उंची दिली, ती उंची देणारे ते पहिले कवी होते. ढसाळांच्या या कल्पनाशक्तीची प्रचीती 'गोलपीठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', 'प्रियदर्शिनी', 'तुही इयत्ता कंची', 'गांडू बगीचा', 'हाडकी हडावळा', 'खेळ'मध्येच आली होती आणि त्यावर मी 'नामदेव ढसाळ एक अढळ कवी' असा प्रदीर्घ लेखही लिहिला होता आणि ढसाळ हे भविष्यात अधिकाधिक आध्यात्मिक, अधिकाधिक बुद्धमार्गी होत जातील असे भाकीतही केले होते; पण त्या वेळीही त्यांच्या मृत्यूची कल्पना मला करवली नव्हती. पण म्हणतात ना- मृत्यू माणसाची शेवटची कल्पना आणि शेवटचे वास्तव आहे. तसेच झाले. शेवटी या शेवटच्या वास्तवाने नामदेव ढसाळांनाही गाठले.

ढसाळांचा हा अस्त त्यांच्या उत्तरार्धाविषयी कित्येक प्रश्र्न घेऊन माझ्यासमोर अवतरतो आहे. दलित साहित्यिकांना अनेकदा त्यांचा पूर्वार्ध आवडतो. मध्यार्ध अडचणीचा वाटतो, तर उत्तरार्ध नकोसा वाटतो, कारण पूर्वार्धात चळवळीतला धगधगता नामदेव आहे, तर मध्यार्धात प्रियदर्शनीकडून सर्वांगीण क्रांतीची अपेक्षा करणारा नामदेव आहे, पण उत्तरार्धातला नामदेव ढसाळ हा 'रीडल ऑफ राम' या बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखावरून शिवसेनेशी लढणाऱ्या नामदेव ढसाळला बाजूला सारून शिवसेनेशी व बाळासाहेब ठाकरेंशी युती करणारा नामदेव ढसाळ आहे. उत्तरार्धातला नामदेव ढसाळ हा 'समष्टीचे भान हरवू लागलेली साहित्य चळवळ' या लेखात ''बहुतांशी दलित साहित्य 'रायवळांची जत्रा' झाली आहे आणि या जत्रेला दलित साहित्यातील पुरोगामी प्रवर्तकाचा रोल करणारेच जबाबदार आहेत,'' असा ठणकावणारा नामदेव ढसाळ आहे.

भविष्यातील लढा हा पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी असाच आहे आणि पुरोगामी व प्रतिगामी हे कुठल्याही जाती, वर्ण, वर्ग, धर्मात असू शकतात. त्यामुळे ढसाळांच्यातील बदल हा ते पुरोगामी, अधिक पुरोगामी बनल्याचे लक्षण होते.उत्तरार्धातला नामदेव ढसाळ हा ''शंकराचार्यांची भाषा वापरून सांगायचे तर कम्युनिझम ही माया आहे,'' असे अनपेक्षित बोलणारा धक्कादायक नामदेव ढसाळ आहे.उत्तरार्धातला नामदेव ढसाळ हा एकाच वेळी फुलनदेवीला 'महाकाव्याची नायिका' व पु. ल. देशपांडे यांना 'प्रस्थापितापेक्षा वेगळे पुलं' म्हणणारा नामदेव ढसाळ आहे. नामदेव ढसाळ यांच्यातील हा वैचारिक बदल कसा झाला व का झाला आणि त्या बदलाचा त्यांच्या

साहित्यावर काही परिणाम झाला का, या प्रश्नाचा शोध मला नेहमीच घ्यावासा वाटला आहे.

राजकीय नेत्यांचे पक्षांतर हा काही फार नवीन घटनाक्रम (निदान भारतात) तरी नाही. खुद्द नामदेव ढसाळ यांचे सासरे शाहीर अमर शेख यांनी १९६२ च्या आसपास कम्युनिस्ट पक्ष सोडला होता आणि ते काँग्रेस पक्षात दाखल झाले होते. जॉर्ज फर्नांडिस यांनी ज्या जनसंघाच्या मुद्द्यावरून मोरारजी देसाई यांचे सरकार पाडले होते त्याच जनसंघाशी म्हणजेच भाजपशी नंतर हातमिळवणी केली होती. मग नामदेव ढसाळ यांच्या पक्षांतराचे आपणास इतके दु:ख का व्हावे? हे दु:ख खरोखर आपणास होते आहे, की नामदेव ढसाळ यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे ज्यांचे राजकीय नुकसान झाले त्या कम्युनिस्टांचे, लोहियावाद्यांचे आणि रिपब्लिकनांचे दु:ख मराठी



साहित्याच्या आणि साहित्यिकांच्या माथी मारले जात आहे? जो सोडून जातो त्याची बदनामी करण्याचे एक विशिष्ट तंत्र कम्युनिस्टांनी अवगत केले आहे. त्यामुळे साहजिकच नामदेव ढसाळ मराठी साहित्यात बदनाम होत गेले. याशिवाय घडले असे की, लोकांच्या कलावंत लोकांकडून काही अपेक्षा असतात, त्यातील एक म्हणजे निदान कलावंतांनी तरी पक्षांतर करू नये, आपल्या भूमिका बदलू नयेत. साहजिकच एखाद्या कलावंताने पक्ष बदलला की, त्याची निष्ठाही बदलली असे लोक गृहीत धरतात. प्रत्यक्षात नामदेव ढसाळांची निष्ठा बदलली का? तर त्याचे निश्‍चित उत्तर 'नाही' असे आहे. ढसाळांचा पक्ष बदलला तरी त्यांची आंबेडकर व बुद्ध यांच्या ठायी असलेली निष्ठा कायमच राहिली. अर्थात त्यांना उमगलेले आंबेडकर हे एका जातीचे नसून सर्व समाजाचे होते आणि त्यांच्या मते दलित पँथरमधील त्यांचे अनेक सहकारी हे एकजातीय पुढारी होते आणि या एकजातीय म्हणजेच महारजातीय परिवर्तनवादात अडकून ना त्यांना स्वत:ला संकुचित व्हायचे होते ना आंबेडकरांना संकुचित करायचे होते. प्रत्यक्षात त्यांचे सहकारी हे खरोखरच एकजातीय होते का? उदाहरणार्थ अरुण कांबळे यांच्याशी माझा वैयक्तिक परिचय होता आणि मी निश्‍चित म्हणेन की, ते एकजातीय नव्हते. मग जर एकजातीयतेच्या मुद्द्यात तथ्य नव्हते, तर पँथर का फुटली? माझ्या कानावर आलेली बातमी अशी की, एका ज्येष्ठ दलित नेत्याने ढसाळांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना जिवे मारण्याची दिलेली अप्रत्यक्ष धमकी! ही धमकी दलित समूहातून आल्याने आणि आपला जातसमूह आपले संरक्षण करू शकेल की नाही याची शंका वाटल्याने ढसाळ बाहेर पडले आणि त्यांनी बाळासाहेब ठाकरेंचे संरक्षण आपलेसे केले. या बातमीतही तथ्य किती?

यातील एक गोष्ट मात्र खरी, ती म्हणजे दलित पँथरमधील प्रत्येक नेत्याचा अहंकार आणि खोट्या शक्तींचा खरा माज! पँथर या अहंकारावरून व माजावरून झालेल्या भांडणावरून फुटली.

गांधीवादी काँग्रेसला शरण जाणाऱ्या प्रस्थापित दलित गांधीवादीशरण नेतृत्वाविरुद्ध केले गेलेले तरुण लोकांचे बंड म्हणजे दलित पँथर! हे बंडच फुटल्याने दलितही फुटले. अशा वेळी काँग्रेसला शरण जाणे म्हणजे गांधीवादाला शरण जाणे होते. ढसाळ हे कट्टर आंबेडकरवादी असल्याने त्यांना गांधीवादाला शरण जाणे परवडणारे आणि मानवणारे नव्हतेच. मग ढसाळांनी जायचे तर कुठे जायचे? स्वत:चे रिपब्लिकन घर मोडून पडलेले, स्वत: नवीन उभे केलेले दलित पँथरचे घर कोसळलेले, गांधीवादी घरात घुसायचे नाही हे मनोमन ठरलेले! अशा वेळी ढसाळांपुढे दोनच पर्याय होते. पहिला कम्युनिस्ट सोशॅलिस्ट घराचा ज्याला खुद्द बाबासाहेबांनीच नकार दिलेला, तर दुसरा जनसंघ-भाजपच्या घराचा ज्याच्याशी ढसाळांचे पटणे शक्यच नव्हते. अशा रस्त्यावर उभे असणाऱ्या ढसाळांना दिसले ते प्रादेशिक पक्षाचे शिवसेनेचे घर! नेमकी त्याच वेळी इंदुरीकरांच्या वगाला बाळासाहेब ठाकरेंनी मदत केली आणि शिवसेनेच्या घराविषयी ढसाळांच्या मनात असलेला आकस मावळला आणि ढसाळांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्या वेळी ढसाळ शिवसेनेत फार काळ टिकणार नाहीत अशी सर्वानाच खात्री होती, पण इथेच नियती स्वत:ची चाल खेळली. ढसाळांना 'मेंदूस्मरणतूट' हा रोग झाला आणि त्याच्या उपचारासाठी अवाढव्य पैशांची गरज निर्माण झाली. या गरजेवेळी बाळासाहेब ठाकरेंनी हात दिलाच, पण बाळासाहेबांमुळे अमिताभ बच्चननेही व पुढे सलमान खाननेही मदत केली. त्यामुळे शिवसेनेत राहणे ही ढसाळांची केवळ सामाजिक- राजकीय गरज न राहता वैयक्तिक गरजही बनली. नामदेव ढसाळांना त्यांचा मूर्ख म्हातारा माओ तसे तुंग हा बाळासाहेबांच्यात सापडावा हा हुकूमशाहीच्या अराजकी ढसाळी मानसिक सेटअपचा विकास होता की ती त्या मेन्टॅलिटीची गरज होती, हा प्रश्‍न त्यामुळेच अधिक अणकुचीदार झाला. अशा वेळी स्वत:चा आंबेडकरवाद (निदान कवितेत) शाबूत ठेवण्याची जबाबदारी द्विगुणित झाली आणि ढसाळ शिवसेनेत राहून आंबेडकरांवर दरवर्षी कविता लिहिते झाले. स्वत:ची आंबेडकरांवरील निष्ठा शिवसेनेत जोपासताना साहजिकच ढसाळांचे अस्तित्व पणाला लागले. सत्ता आहे आणि सत्तेत जीव रमत नाहीये अशी ही दुभंगणी होती आणि तिची सोडवणूक बुद्धाच्या अनात्मवादी अध्यात्मात होती. ढसाळ हे त्यामुळेच आध्यात्मिक झाले.दलित पँथर फुटल्यानंतर प्रत्येक नेत्याजवळ उरले ते दोनशे-

तीनशे कार्यकर्ते. या कार्यकर्त्यांची कविता करण्याची हौस दांडगी होती. त्यामुळे या कवी-कार्यकर्त्यांना त्यांच्या काव्यसंग्रहांना स्वत:कडे शाबूत ठेवण्यासाठी लायकी असो वा नसो, प्रस्तावना देणे भाग होते. स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवणाऱ्या विचारवंतांनाही कार्यकर्त्यांविषयी सहानुभूती होती. त्यामुळे त्यांना उत्तेजन देण्यासाठीही प्रस्तावना प्रकरण सुरू झाले. परिणाम असा झाला की, प्रत्येकाने ही 'रायवळांची जत्रा' गतिमान केली. ढसाळ पडले अभिजात प्रतिभेचे कवी! त्यांच्यातल्या अस्सल कवीला ही 'रायवळांची जत्रा' कशी मानवणार? शिवाय ही रायवळांची जत्रा त्याच्या प्रतिस्पर्धी दलित नेतृत्वांनी जन्माला घातलेली! साहजिकच त्यांनी या जत्रेवर आसूड ओढायला सुरुवात केली. परिणामी कवी कार्यकर्ते, विशेषत: सुमार प्रतिभेचे, ढसाळांपासून दूर जायला लागले आणि ढसाळ अधिकच एकाकी झाले.

प्रश्र्न असा निर्माण होतो की, ही 'रायवळांची जत्रा' फक्त दलित साहित्यात निर्माण झाली की स्त्री साहित्यात, देशीवादी साहित्यातही निर्माण झाली? नेमाडे किंवा दिलीप चित्रे यांनीही ती निर्माण केली नाही का? चित्र्यांनी निर्माण केलेले त्यांचे वारसदार कवी ढसाळांना अतिशय सुमार दर्जाचे वाटत होते आणि खासगीत ते तसे बोलूनही दाखवत. मात्र ढसाळांनी पब्लिकमध्ये मात्र याविषयी मौनच पाळले ते का?याहूनही अधिक मूलभूत प्रश्र्न असा की, ही रायवळांची जत्रा हे आपल्या वाङ्मयसंस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण का बनले आहे? वस्तुस्थिती अशी आहे की, मराठी संस्कृतीत चित्रे, कोलटकर व ढसाळ हे तीन जागतिक दर्जाचे कवी निर्माण झाले खरे, पण त्यांचे कवितासंग्रह खरेदी करून किमान हजार प्रती खरेदी करतील असे हजार अव्वल दर्जाचे रसिक मात्र मराठीत निर्माण झाले नाहीत. परिणाम चित्रे-नेमाडेंसारखे प्रवर्तक दुय्यम दर्जाच्या कवींच्यात स्वत:चे असे अव्वल रसिक शोधत राहिले आणि मग ते टिकावेत म्हणून प्रस्तावना, ब्लर्ब लिहून द्यायला लागले आणि त्यांच्या या तडजोडीने ही रायवळांची जत्रा अधिकच गतिमान झाली. याबाबतीत नामदेव ढसाळ मात्र भाग्यवान ठरले. नव्याने जगण्याचे भान आलेल्या दलित आंबेडकरी समाजाने इतरांच्या तुलनेत ढसाळांचे कवितासंग्रह विकत घेतले आणि ढसाळांना रायवळांची जत्रा निर्माण करण्याची गरज याही पातळीवर उरली नाही आणि त्यांनी बिनधास्त टीका केली.ढसाळ हे कट्टर आंबेडकरवादी असल्याने त्यांना गांधीवादाला शरण जाणे परवडणारे आणि मानवणारे नव्हतेच. मग ढसाळांनी जायचे तर कुठे जायचे?

नामदेव ढसाळांची जडणघडण झाली ती लोहियांच्या देशी समाजवादात आणि आंबेडकरवादात. साहजिकच कम्युनिझम हा लोहियांप्रमाणे त्यांना एकाच वेळी शत्रू आणि मित्र वाटत राहिला. त्याविषयी नेमकी काय भूमिका घ्यायची हे त्यांना कळले ते १९८५ सालानंतर. १९८९ साली रशियात कम्युनिझम कोसळला आणि ढसाळांचे कम्युनिझमविषयीचे उरलेसुरले आकर्षण संपले, मात्र आंबेडकरवादामधला लोकशाही समाजवादाचा अजेंडा त्यांना अधिक आकर्षक वाटू लागला. त्यातूनच कम्युनिझम हा माया आहे हे धक्कादायक विधान जन्मले. जगभर कोसळलेल्या कम्युनिझमच्या अवशेषात उभ्या राहिलेल्या एका कवीची ती प्रतिक्रिया होती.

ढसाळांचा आणि माफियांचा संबंध हा फार जुना! साहजिकच त्यांना फुलनदेवीविषयी आकर्षण वाटणे हे तसे नैसर्गिक! फुलनदेवी ही प्रथम ढसाळांसारखी बंडखोर, पण नंतर प्रस्थापितांच्या वळचणीला नाइलाजाने ढसाळांसारखीच उभी राहिलेली. साहजिकच ढसाळांना ती महानायिका वाटली. भारतात जेवढे शोषण फुलनदेवीचे झाले तेवढे कदाचित कुठल्याच स्त्रीचे वा अस्पृश्य व्यक्तीचे झाले नसावे. ढसाळांप्रमाणेच तिलाही शेवटी आजारानेच गाठले. ते साम्यच बहुधा ढसाळांना भावले असावे. पुलंच्या निधनानंतर 'प्रस्थापितांपेक्षा वेगळे पु.ल.' हा लेख त्यांनी लिहून एका अर्थाने दलित साहित्याला पाठिंबा देणाऱ्या पुरोगामी ब्राह्मणांना सन्मानित केले. एकदा तर आपण ब्राह्मणांना घातलेल्या शिव्या चुकीच्या होत्या अशी कबुलीही दिली. बदलत चाललेल्या परिस्थितीचे हे भान होते आणि ज्यांना हे भान नव्हते त्यांनी ते प्रस्थापितांना जाऊन मिळालेत अशी ओरडही केली. माझ्या मते भविष्यातील लढा हा पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी असाच आहे आणि पुरोगामी व प्रतिगामी हे कुठल्याही जाती, वर्ण, वर्ग, धर्मात असू शकतात. त्यामुळे ढसाळांच्यातील बदल हा ते पुरोगामी, अधिक पुरोगामी बनल्याचे लक्षण होते. एका प्रतिगामी पक्षात राहून ढसाळ अधिकाधिक पुरोगामी बनावेत हा विरोधाभास मात्र विचित्रच!या सगळ्याचा परिणाम म्हणून 'जागरण घालणारा शतकांचा चक्रधर', 'मन चंगा तो कठोती में गंगा' यांसारख्या वक्रोक्ती कवितांतून यायला लागल्या. ''अमृताचा धनू वर्षो न वर्षो या समाधीत मला कोंडून घ्यायचं नाही मी तर अजूनही उद्याच्या भाकरीची चिंता करतो आहे'' अशा साध्या सरळ ओळींची संख्या वाढू लागली. मात्र ढसाळ साधे लिहिणारे झाले याचा अर्थ ते सोप्पे आणि स्वस्त लिहिणारे झाले, असा मात्र नाही. फक्त सरळ दिसणारे सत्य सरळ भाषेत मांडण्याची त्यांची कला अधिक कुशल झाली एवढेच.ढसाळांच्या नंतर काय, या प्रश्र्नाचे उत्तर देणे सोपे नाही. एक मात्र खरे की, यापुढील दलित कविताच दलित समाजात जन्मलेल्या व्यक्तीच लिहितील ही गॅरन्टी मात्र आता संपणार हे नक्की. दलित ही संज्ञाही हळूहळू जातीय आणि वर्णीय अर्थ गमावत जाऊन वर्गीय होत जाणे अटळ आहे. याचा अर्थ कम्युनिझमचे पुनरागमन होणे असा नाही, तर सर्वहारा वर्गाच्या दृष्टिकोनातून एका नव्या तात्त्विक मांडणीचा व चळवळीचा उदय असा आहे. मात्र ही नवी तात्त्विक मांडणी करणाऱ्या वा कवटाळणाऱ्या कवींना नामदेव ढसाळांची कविता निरंतर प्रेरणा देत राहील एवढे काम मात्र या नामदेवाने करून ठेवले आहे हे नक्की. ढसाळांचे हे सर्वात मोठे यश आहे.

**समाप्त ✻ ✻ ✻**









**शुभेच्छुक : तहसिलदार साहेब**
**तहसिलदार कार्यालय, अक्कलकोट जि.सोलापूर**

**शुभेच्छुक : गटविकास अधिकारी**
**पंचायत समिती कार्यालय, अक्कलकोट जि.सोलापूर**








**जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर टाकळीवाडी**
**तालुका: शिरोळ , जिल्हा:कोल्हापूर**
**यांचेकडून दिवाळीच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा ....**
**मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका ,सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सदस्य व समस्त पालक वर्ग .**

**सर्व ग्राहकांना व जनतेला दिवाळीच्या**
**खुप खुप मनपूर्वक शुभेच्छा..!!**

# प्रज्योत गारमेंटस्

आमच्याकडे सर्व प्रकारचे लहान
मुला-मुलींचे रेडीमेड कपडे, लेडीज शॉपी, लॅगीज,
टॉप्सगाऊन इ.योग्य दरात मिळेल.

**इटकुर, ता. कळंब जि.धाराशिव**





**प्रोप्रा.सौ.स्वाती सुधाकर रणदिवे**
**मो.९०११९१७६००, ९३७३००९८५९**

# राजाभाऊ सरवदे लोकनेते



**प्रा.राहुल रुही**
मो.९७६५७२५१७६



सोलापूर जिल्ह्यात फुले शाहू आंबेडकरांचे विचार घेऊन सोलापूर शहर व जिल्ह्यात आंबेडकरी चळवळ उभे करणारे राजाभाऊ सरवदे यांचा जन्म मिलिंद नगर बुधवार पेठ येथे २६ ऑगस्ट १९५८ रोजी सरवदे घराण्यात झाला राजाभाऊ सरवदे यांचे प्राथमिक शिक्षण मनपा शाळा क्रमांक ११ मधून झाले आणि महाविद्यालय शिक्षण जैन गुरुकुल आणि दयानंद कॉलेज येथे झाले सोलापूर जिल्हा हा मूळतः अनेक चळवळींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो आणि या चळवळीतच राजाभाऊ सरवदे यांची जडणघडण झाली सन १९७४ - ७५ साली जैन गुरुकुल ला असताना तेव्हाची जुनी अकरावी या महाविद्यालयीन वयातच चळवळींशी राजाभाऊंचा जवळचा संबंध आला त्यावेळी बिहारचे बेलचे प्रकरण, दलित अत्याचार ,वरळीची दंगल, या सर्व प्रश्नांवर मुंबईमध्ये ९ जुलै १९७१ साली राजा ढाले, नामदेव ढसाळ ,भाई संगारे यांनी दलित पँथरची स्थापना केली आणि दलिताच्या अत्याचाराला आक्रमकपणे वाचा फोडली दलित पँथर वाऱ्यासारखी राज्यात व देशात पसरत असताना १९७४ साली सोलापुरातील सुभाष चौक येथे त्या वेळचे तत्कालीन संचारचे संपादक श्री रंगा अण्णा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली राजा ढाले आणि प्राध्यापक अरुण कांबळे यांची दलित पँथरची सभा झाली प्राध्यापक अरुण कांबळे यांचे आक्रमक भाषण झाले आणि ही सभा उधळण्याच्या प्रयत्नाने दंगा उसळला आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोवर दगडफेक करत असताना त्यावेळी राजाभाऊ सरवदे आणि राजा इंगळे यांनी तो फोटो हातात घेऊन बाबासाहेबांच्या फोटोला सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले तिथूनच खऱ्या अर्थाने राजाभाऊंचा संघर्ष सुरू झाला होता त्यानंतर पँथर चा झंजावात फोफावत असताना सोलापूर जिल्ह्यामध्ये पँथर च नेतृत्व बी.के .सीतासावंत एस .आर गायकवाड सारखे वरिष्ठ व्यक्ती करत होते आणि दयानंद कॉलेजमधूनच के. पी. गायकवाड बी.के .सीतासावंत यांच्या बैठका चालायच्या महाविद्यालयातच १९७७ साली राजाभाऊ सरवदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट असोसिएशन ही संघटना कार्यान्वित करून विद्यार्थी आणि दलित चळवळीचे प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आणि महाविद्यालयीन वयातच राजाभाऊ सरवदे चळवळीशी एकरूप होत गेले पुढे १९७५ ला शंकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना दलित अत्याचार दलित प्रश्न यांच्यावर अतिशय आक्रमकपणे काम करणाऱ्या दलित पँथर चे विसर्जन करावे यासाठी राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यावर दबाव आणला गेला दलित पँथर च विसर्जन झालं पुढे १९७७ ला सोलापूर मध्ये मोठी दंगल उसळली दोन दिवस संचारबंदी होती आणि त्या दंगली मध्ये आंदोलन राजाभाऊ सरवदे यांनी आंदोलन यशस्वीपणे हाताळले व शहरात शांतता प्रस्थापित केली दलित पँथर च्या विसर्जना नंतर पुढे दुसऱ्या टप्प्यामध्ये रामदास आठवले ,अविनाश मातेकर, गंगाधर गाडे ,प्रीतमकुमार शेवगावकर, यांची औरंगाबाद येथे बैठक होऊन वाढत चाललेल्या दलित अत्याचार आणि दलित प्रश्नांवर भारतीय दलित पँथर ची स्थापना झाली आणि राजाभाऊ सरवदे यांनी रामदासजी आठवले यांच्या समवेत भारतीय दलित पँथर च काम सुरू केलं रामदासजी आठवले आणि राजाभाऊ सरवदे यांचा संबंध भारतीय दलित पँथर मुळेच आला १९७९ ला अरुण कांबळे अध्यक्ष असलेल्या

भारतीय दलित पँथरचे रामदास आठवले हे संघटक होते ते सोलापूरला बैठकीला आले असता खणी येथे बैठक संपन्न झाली या बैठकीला राजाभाऊ सरवदे उपस्थित होते तेव्हाच्या बैठका या कार्यकर्त्यांच्या घरात महाविद्यालय कॉलेज वस्तीगृह येथे चालायच्या सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातील एस. के .कांबळे यांच्या रूमवर रामदास आठवले राहायचे बैठका घ्यायचे त्यांच्या समवेत राजाभाऊ सरवदे असायचे आणि सोलापूर जिल्ह्यातील प्रश्नांवर वाचा फुटायची संघटने बाबत निर्णय व्हायचे आक्रमक शैली अभ्यासू वृत्ती आणि कुशल संघटक हे गुण रामदास आठवले यांनी राजाभाऊ सरवदे यांच्यात आधीपासूनच ओळखले होते सोलापूर शहराचा विचार करायचा झाल्यास १९८२ पासून शहरात बुधवार पेठ आताचे मिलिंद नगर ,थोरला राजवाडा दलित विरुद्ध पत्रा तालीम हा संघर्ष नेहमी चालायचा तो संघर्ष मिटवण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी केले १९७८ ला मराठवाडा नामांतराचा ठराव झाला आणि मराठवाड्यासह





महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दंगली आणि दलितांच्या अन्यायात मोठ्या प्रमाणात वाढ झाली दलितांची घरे जाळण्याचे प्रकार देखील झाले त्यावेळी अनेक आंदोलनामध्ये राजाभाऊंनी भाग घेतला मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी राजाभाऊ सरवदे यांनी तब्बल २६ हजार मोर्चे काढले हा एक विक्रमच म्हणावा लागेल राजाभाऊ सरवदे हे रस्त्याच्या संघर्षातून तयार झालेलं नेतृत्व आहे सोलापूर शहरातील आताचे मिलिंद नगर बुधवार पेठ आहे त्याला त्याला १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार -मांग परिषदेमध्ये थोरला राजवाडा असे नाव दिले त्यामुळे या वस्तीला जोपासण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी आजतागायत केल आहे

१९८१ च्या काळात राजाभाऊ सरवदे हे तहसीलदार डी वाय एस पी ची एमपीएससी प्रीमियम परीक्षा पास झाले होते महाविद्यालयीन शिक्षणानंतर त्यांनी कृषी विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र वित्तीय महामंडळ मुख्य कार्यालय मुंबई येथे ८९ दिवस नोकरी देखील केली परंतु आंबेडकरी बाणा रक्तातच असल्याने त्यांनी आपले पुढचे आयुष्य हे समाजसेवेला आणि चळवळीला अर्पण केले ३१ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांची सभा राजाभाऊ सरवदे आणि सहकारी यांनी उधळून लावली त्याला कारण होते नामांतर लढा दलित अत्याचार याच प्रश्नावर १९८२ सालची जिल्हा नियोजनाची बैठक देखील राजाभाऊ सरवदे यांनी उधळून लावली होती ते १९८९ च्या दुसऱ्या भारतीय दलित पँथरच्या अधिवेशनाचे अध्यक्ष देखील होते नुसती चळवळ करून पोट भागत नाही त्यासाठी कार्यकर्त्यांने उद्योग व्यवसाय उभारावा हे त्यांचे प्रामाणिक मत यासाठी १९८६ रोजी त्यांनी टेम्पो घेतली टेम्पो ते आताचा मध्यवर्ती भागातील असणारा टू स्टार राज-हाईट्स चा प्रोजेक्ट, हॉटेल त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो चळवळ आणि पक्षातील काम यात फरक असतो असे ते मानतात एक पक्ष एक नेता एक झेंडा हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जोपासले आपल्या नेत्याचा शब्द कधी खाली पडू दिला नाही पक्ष, नेतृत्व, चळवळ बदनाम होईल असे कृत्य त्यांच्या हातून कधीच घडले नाही आपला नेता सांगेल ते धोरण ते बांधतील तेच तोरण या वृत्तीने त्यांनी ४६ वर्षे रामदास आठवले यांच्या सोबत चळवळीचा, रिपब्लिकन पक्षाचं काम केलं १९९९ ला उत्तर सोलापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांनी आपल्या नेत्याच्या आग्रहास्तर विधानसभा देखील लढवली त्यावेळी राष्ट्रवादी रिपब्लिकन पक्षाची युती असताना देखील लक्ष्मण माने यांच्या बंडखोरीचा सामना पक्षाला करावा लागला पण राजाभाऊ सरवदे यांनी निकराचा लढा दिला १ ऑगस्ट २००४ साली सोलापूर विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर २०१७ साली त्यांनी सिनेट निवडणूक लढवली आणि ते विक्रमी मताने निवडून आले आताच्या विद्यापीठांमध्ये जे अमुलाग्र बदल घडत आहेत त्यात राजाभाऊ सरवदे यांचा  वाटा निश्चितच आहे संघर्षातून तयार झालेले हे नेतृत्व कधीच कुठल्या आमिषाला बळी पडले नाही २०१४ ला सोलापुरात लोकसभेला, विधानसभेला जो बदल घडून आला त्यात राजाभाऊ सरवदे यांचा वाटा मोठा आहे चळवळीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिकपणा यामुळे ३० ऑगस्ट २०१९ रोजी रामदासजी आठवले यांनी महायुतीच्या माध्यमातून राज्यमंत्री दर्जा असलेल्या महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाची सूत्रे राजाभाऊ सरवदे यांच्याकडे दिली .या संधीचं सोनं करत मोडकळीस आलेल्या महामंडळाला राजाभाऊ सरवदे यांनी नव संजीवनी दिली अनेक क्रांतिकारी निर्णय

घेऊन राज्यातील मागासवर्गीय तरुणांना जवळजवळ शंभर कोटी रुपयाचे कर्ज वाटप करून कार्यकर्त्यांना तरुणांना स्वावलंबी होण्यास मदत केली शिक्षणामुळे प्रगती होते आणि माणूस घडतो पर्यायाने समाज घडतो म्हणून भुगाव येथे नालंदा शैक्षणिक संस्थेची उभारणी केली तेथे अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात तेथेच वस्तीगृहाची स्थापना केली संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या खैरलांजी घटनेच्या वेळी आणि त्यानंतर उद्भवलेल्या आंदोलनात राजाभाऊ सरवदे यांनी सोलापूर शहरात समाजाचे रक्षक म्हणून भूमिका अदा केली ज्यावेळी अनेक आंबेडकरी तरुणांवर गुन्हे दाखल होत असताना राजाभाऊ सरवदे हे प्रशासनापुढे एकटे उभे ठाकले आणि परिस्थिती मोठ्या चालाकीने हाताळली सोलापूर शहराला किंबहुना मिलिंद नगरला गुन्हेगारी वाद विवाद यांच्या मधून काढून प्रगतीपथावर नेण्याचे श्रेय राजाभाऊ सरवदे यांना जातं रिपब्लिकन पक्षात काम करत असताना सोलापूर जिल्ह्यात त्यांनी अनेक तरुणांना मोठं केलं स्वबळावर जिल्ह्यात नगरसेवक ,पंचायत समिती ,सदस्य ग्रामपंचायत सदस्य ,सरपंच ,उपसरपंच निवडून आणले ज्या पक्षासोबत युती असेल त्या युतीचं काम त्यांनी प्रामाणिकपणे केलेल आहे आणि त्याचे फायदे देखील आज जिल्ह्यात पाहायला मिळतात आज प्रत्येकगावामध्ये वाड्या वस्त्या मध्ये पुढारी नेता होण्याचं जणू एक पेवच फुटले आहे लवकरात लवकर लोकांनी नेता म्हणावं अशी होडच लागलेली आहे पण संघर्ष आणि संयम हे राजाभाऊ यांच्याकडून कडून शिकल पाहिजे .नेता होता येत नसतं लोकांनी नेता मानलं पाहिजे आणि त्यासाठी प्रखर संघर्ष त्याग प्रामाणिकपणा आणि लोकांच समाधान हे सूत्र आहे आणि हे राजाभाऊंनी नेहमी अंगीकारले आहे वरून ताठर दिसणारा हा मनुष्य समाजावर आपल्या कार्यकर्त्यावर तेवढेच निर्मळ प्रेम करतो आज जिल्ह्यामध्ये दशकातील अनेक नेत्यांचा विचार करायचा झाल्यास त्यामध्ये राजाभाऊ सरवदे यांचं नाव निश्चितच कोरल जाईल नुसत्या नावानेच काम होतात अशी ओळख असलेला दमदार व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ सरवदे काम कोणतेही असो ते राजाभाऊ सरवदे यांनी केलं नाही असं कधीच झालं नाही अनेक जाती -धर्माचे, पक्षाचे, संघटनेचे लोक राजाभाऊंकडे कामे घेऊन येतात आणि समाधानी होऊन जातात हीच राजाभाऊ सरवदे यांची ओळख आहे पक्ष चळवळ याच्याशी राजाभाऊ सरवदे यांनी कधीच तडजोड केली नाही अन्यथा या उंचीचा नेता कधीच आमदार, खासदार, मंत्री म्हणून दिसला असता सोलापूर जिल्ह्यात आंबेडकर चळवळीचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची ओळख आहे पण आपला आक्रमकपणा प्रामाणिकपणा एकनिष्ठता यामुळे राजाभाऊंचा वेगळेपण दिसून येतं आणि शहर जिल्ह्यात तसीच त्यांची ओळख आहे आक्रमक संघर्षातून तयार झालेल नेतृत्व कार्यकर्त्यांना ताकद बळ देण्याची वृत्ती नेहमी समाजाच्या हिताचा विचार यामुळे राजाभाऊ सरवदे हे पँथरकालीन वृद्धांपासून ते आजकालच्या फेसबुक इंस्टाग्राम च्या जमान्यातील इन्स्टंट तरुणांच्या गळ्यातील ताईत बनलेले आहेत ते नेहमी नवीन जगाशी अपडेट असतात नवीन गोष्टी शिकून घेत असतात त्यामुळे त्यांची शैली ही वेगळीच आहे राजाभाऊ सरवदे हे आपल्या खास केस रचनेमुळे तसेच पोशाखमुळे देखील शहर जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहेत रुबाबदार व्यक्तिमत्व, बोलण्याची लखब अनेकांची जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्याची रिघ लागलेली असते .परिस्थिती मुळे स्वतःला वकील होता आलं नाही म्हणून त्यांनी आपल्या एका मुलाला वकील केलं वकील झालो नाही पण वकिलाचा बाप झालो असे ते आवर्जून सांगतात पुढे त्यांचा वारसा अनेक सामाजिक उपक्रमातून त्यांचे दुसरे सुपुत्र सुशील सरवदे यांनी सुरू ठेवल्याचे दिसून येते आज त्यांचा वाढदिवस आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला दिलेला हा ओझरता  हा उजाळा सर्व मोठी माणसे नेहमी वृद्ध होत असतात पण राजाभाऊ सरवदे यांच्याकडे पाहिले तर आपल्याला ते प्रत्येक वाढदिवसाला चिरतरुण होत आहेत की काय असा भास होतो यामागे त्यांचा निर्व्यसनी स्वभाव व्यायामाची आवड दररोज सकाळी चालणे आधी होय. अशा या चिरतरुण ,दमदार ,दिमागदार रुबाबदार,दमदार आणि संघर्षशील नेत्यास वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा..!


**समाप्त * * ***







तमाम
जनतेला
दिवाळीच्या
हार्दिक
शुभेच्छा..!!
मा.विकी(बाबा) चौधरी
: शुभेच्छुक :
विकी(बाबा) चौधरी, सदस्य ग्रामपंचायत दहिटणे ता.अक्कलकोट
प्रदेश अध्यक्ष रोजगार आघाडी पिपल्स रिपब्लिकन पार्टी महाराष्ट्र राज्य


तमाम जनतेला
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक : मारुती(सागर) घटकांबळे
(ग्रामपंचायत सदस्य हसापूर)ता.अक्कलकोट जि.सोलापूर


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक
चंद्रकांत(अप्पु) सोनकांबळे
तालुका उपाध्यक्ष युवक कॉंग्रेस कमिटी अक्कलकोट
मु.किरनळ्ळी ता.अक्कलकोट जि.सोलापूर

## आ.सचिनदादा कल्याणशेट्टी

# एक दिपस्तंभ





**प्रा.गौतम बाळशंकर**
मो.९०२१२६५२३८

हनूरच्या लुंबिनी बुद्ध विहारामध्ये दिनांक १४ एप्रिल २०११ तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, याच्या समोर पांढऱ्या रंगाचा सदरा घालून, महामानवा समोर नतमस्तक होताना पाहत होतो. अचानक सूत्रसंचालन करणाऱ्यांनी, मला भाषण करण्यासाठी बोलावलं, भाषणामध्ये तालुक्याचे युवा नेते असा मी उल्लेख केला.आणि सर्वांनी टाळ्या वाजवल्या.आणि ती दुसरी तिसरे कोणी नव्हते तर , तत्कलीन सरपंच सचिन दादा कल्याणशेट्टी होते.एकंदरीत माझ्या भाषणाची चर्चा गावात रंगली.विरोधकांनी माझ्या भाषणाची विश्र्लेषण करू लागले.तोंडाला येईल ते बोलतात नवीन पोरं अशी चर्चा होती.कालंकाराने २०१९ ला ही चर्चा यशस्वी ठरली.२०११ च्या १४ एप्रिलच्याा दिवशी, तालुक्याचा युवा नेता अशी घोषणा.झाल्यानंतर २०१९ ला आमदार म्हणून झाली.सरपंच ते आमदार हा संघर्षवादी प्रवास, एका दीप स्तंभा सारखा वाटतो.

**सामाजिक कार्य:** विवेकानंद प्रतिष्ठान च्या माध्यमातून , विविध सामाजिक उपक्रम, सामुदायिक विवाह सोहळे, रदीतून शिक्षण गणेशोत्सव व्याख्यानमाला, महिलांसाठी रक्षाबंधन सोहळा, अंगणवाडी सेविकेसाठी पोषण आहार सोहळा, असे विविध उपक्रम, समाजसेवेसाठी, राबविले आहे.

**शैक्षणिक कार्य:** विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या अंतर्गत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे पिताश्री पंचाप्पा कल्याणशेट्टी सर, यांनी स्थापन केलेला या संस्थेने, शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठी भरभराटी घेतली आहे अनंत चैतन्य प्रशाला हन्नुर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरिजा माता प्राथमिक हायस्कूल, गृहसवा कल्याणशेट्टी महिला महाविद्यालय सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अक्कलकोट तक्षशिला वस्तीग्रह नालंदा वस्तीग्रह गरजू होतकरू विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना, अशी विविध शैक्षणिक कार्य आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून होत आहे.

**राजकीय :** हन्नुर ग्रामपंचायत ची २010 साली निवडणूक झाली.ही निवडणूक तशी मागील निवडणुकीपेक्षा चुरशीची ठरली.विरोधी पक्षाच्या गट, गटाची सत्ता असताना आपण नवीन पॅनल करून निवडून यावं अशी शाश्र्वती नव्हती अशातच शिक्षण महर्षी कै. पंचाप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्योस पॅनल होती.गावातील सत्ताधाऱ्यांना कंटाळाला माणसाची एकटा संघटना बनवली आणि अशा लोकांना एकत्र केलं जेणेकरून परिस्थिती बदलू पाहत आहे.तरुणांमध्ये क्रिकेटच्या स्पर्धा भरवण्यात तरुणांमध्ये नवचेतना निर्माण करून देणे.ग्रामीण भागातून शहरी भागात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पास साठी खर्च देणे, आर्थिक अडचणी असणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे असे कार्य सुरू केले.सत्ताधारी गटांना वाटू लागले की एकंदरीत आमचे सत्तासत्ताधारी गटांना वाटू लागले की एकंदरीत आमची सत्ता ही हती येईल.तसे काय झाले नाही पाच-चार असा निकाल लागला.सचिन दादा गावचे सरपंच झाले.आणि तिथूनच अक्कलकोट तालुक्याच्या बदलाच्या राजकारणाची सुरुवात झाली राजकीय व्यवस्था बद्दल व पाहणाऱ्या तरुणांसाठी



नवी ऊर्जा मिळाली.अशी युवक जोडले गेले जिथे त्यांना राजकीय थारा नव्हता.असे कार्यकर्ते जोडले गेले ज्यांना राजकीय पार्श्र्वभूमी नव्हती.अशा कार्यकर्त्यांना एकत्र केलं अक्कलकोट तालुक्यातल्या.राजकारणाला गती मिळाली.भारतीय जनता पक्षाला नवा युवा नेता मिळाला.ज्या भाजपाचे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत एकही सदस्य निवडून येत नव्हता.ऍडजस्टमेंटच्या राजकारणाला कंटाळून गेलेल्या कार्यकर्त्यांनी.सचिन दादाला राजकीय नेतृत्व मान्य केल.आणि जिल्हा परिषदेमध्ये दोन सदस्य निवडून आणले.आणि चार पंचायत



समितीचे सदस्य निवडून आणले.अक्कलकोट तालुक्याच्या अध्यक्ष ची जबाबदारी मिळाली.केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता आली.देवेंद्र फडणीस सारखं राजकीय ऊर्जा केंद्र सचिन दादांना मिळाल तालुक्यामध्ये विरोधी बाकाचा आमदार असताना सत्ताधारी तालुकाध्यक्षांनी भरघोस अशी निधी आणली.पूर्वीच्या काळामध्ये निधी कोण अंत कुठून येतं हे समजत नसतानाही.सर्वसामान्य माणसाला आणि कार्यकर्त्याला निधी कशी आणायची त्याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे सचिन दादा होय.अक्कलकोट आणि दुधनी आणि मैदर्गी नगर परिषदेची निवडणूक झाली , सचिन दादाच्या नेतृत्वात ही निवडणूक संपन्न झाली यामध्ये भारतीय जनता पक्ष चा दुधनी आणि अक्कलकोटच्या नगरपरिषदेवरती नगराध्यक्ष ही झाला पक्षाला भरघोस असे मत मिळाली.तीच पुढची चाहूल लागली होती.विधानसभेची, प्रस्थापित आमदारांनी भारतीय जनता पक्षात प्रवेशाची नांदी सुरू केली होती.आणि अचानक तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब यांनी खेळीच बदलली रयतक्रांतीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून आमदार सचिनआमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या नावाची घोषणा केली.अक्कलकोट तालुक्यातील जनतेला एक युवा ऊर्जा स्त्रोत असलेला नेता मिळाला.अक्कलकोट तालुक्यातील या युवा नेत्याला ३९ हजार मतांनी निवडल.तालुक्याला नवा आमदार मिळाला.समोर सर्व समावेशक राजकारणाची सुरुवात केली.राजकारणाबरोबर समाजकारण आणि शैक्षणिक हरितक्रांतीला आणि शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांनाामगारांना नवी चेतना मिळवून त्या माध्यमातून काम करण्याचे धोरण राबवले.सामाजिक आणि परिवर्तन घडवण्यामागे सर्व समावेशक राजकारणाला महत्त्व देत जातीपातीचा राजकारणा न करता तत्वाचा राजकारण करायला सुरुवात केली म्हणूनच अशा या धुरंदर आणि युवा नेत्यांनी अक्कलकोट तालुक्यातच नाही तर जिल्ह्याची जबाबदारी आता सांभाळत आहे. त्यांच्या नेतृत्वावरती विश्र्वास ठेवून असणारे हजारो तरुण त्यांच्या छत्रछायेखाली काम करत आहे आणि पक्षाला उभारी देत आहेत.राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये कोणती भूमिका चालू आहे त्याला महत्त्व न देता तालुक्याच्या महत्त्वपूर्ण भूमिका कोणीच आहे हे न पाहता बारकाईने पाहण्याचं काम आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी करत आहे अशा या दिपस्तंभचा आज वाढदिवस वाढदिवसाबद्दल खूपप लिहावं असं वाटतं परंतुपेक्षा वेगळं भविष्यात लिहिता येण्यासाठी ठेवावं लागणार आहे नक्कीच भविष्य उज्वलमय आहे आणि हा दीपस्तंभ हा दिवस , फुला सारखाच फुलत राहो अशी अपेक्षा , बाळगतो.

**समाप्त * * ***



गौतमी पाटील

# संघर्षाची ड्रिमगर्ल



**कमलाकर सोनकांबळे**
मो.९९२१९८८३५८



ग्रामीण भागातून आठवीपर्यंत शिक्षण घेऊन पुढील शिक्षणासाठी पुण्यात गेलेले एक गरीब कुटुंबातील गौतमी पाटील ही ड्रीम गर्ल म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील घराघरात पोहोचलेली गौतमी पाटील ही वेस्टन डान्सर व लावणी कलामुळे प्रेक्षक वर्ग अक्षरश डोक्यावर घेऊन आज ही नाचत आहेत. गौतमी पाटील ही भारतातील महाराष्ट्र राज्यातील एक प्रसिद्ध लावणी नृत्यांगना आहे. लावणी हा महाराष्ट्राचा एक पारंपारिक लोकनृत्य प्रकार आहे जो ढोलकीच्या तालावर सादर केला जातो. गौतमी पाटीलला लावणी नृत्य स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये तिच्या अभिनयामुळे ओळख प्रसिध्दी मिळाली आहे.


गौतमी पाटील यांचा जन्म आणि संगोपन धुळे जिल्हतील सिंदखेडा, येथे झाले आणि तिला लहानपणापासूनच वेस्टन डान्सर व लावणी नृत्याची आवड आहे. तिने लहान वयातच लावणी नृत्याचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली आणि तेव्हापासून ती एक लोकप्रिय कलाकार आणि नृत्य प्रकाराची शिक्षिका बनली. गौतमीने संपूर्ण महाराष्ट्रात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि लावणी स्पर्धांमध्ये सादरीकरण केले आहे आणि तिच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार जिंकले आहेत. गौतमी पाटील या लावणी नृत्याच्या शिक्षिका असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कलाप्रकाराचे प्रशिक्षण दिले आहे. लावणीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि तरुण पिढीला नृत्यप्रकार शिकवण्यासाठी ती कार्यशाळा आणि वर्ग आयोजित करते.

गौतमी पाटील ही महाराष्ट्रातील आघाडीच्या लावणी नर्तकांपैकी एक मानली जाते आणि त्यांनी या पारंपारिक लोकनृत्य प्रकाराच्या संवर्धन आणि संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ती तरुण कलाकारांना लावणी शिकण्यासाठी आणि सादर करण्यासाठी प्रेरित आणि प्रवृत्त करत आहे, ज्यामुळे हा समृद्ध सांस्कृतिक वारसा जिवंत आहे

गौतमी पाटील परिचय सागायच झालं तर गौतमी पाटील एक भारतीय नृत्यांगना आणि सोशल मीडिया स्टार आहे. तिचा जन्म १९९६ मध्ये शिंदखेडा, धुळे जिल्हा महाराष्ट्र, येथे झाला. तिचे वय २७ वर्षे आहे. तिची उंची ५ फूट ८ इंच आहे.

घरचे परिस्थिती गरिबीचे वडील व्यसनाधीनता यामुळे आई माहेरी सिंदखेडा या गावी राहत असे त्या ठिकाणीच गौतमी पाटील याची पहिली ते आठवीपर्यंतची शाळा गर्ल्स हायस्कूल शिंदखेडा या धुळे जिल्ह्यातील गावी झाले आठवी नंतर पुणे येथे राहण्यासाठी त्याच्या मामांनी घेऊन आले,शिंदखेडा येथे आई आजोबा सोबत ती राहत होती मामाने पुणे येथे बोलावून घेतले दोन मामा मावशी हे पुण्यालाच राहिला असल्याने आजोबा आई व गौतमी यांनी पुण्याला भारती विद्यापीठ येथे राहण्यास आले व पुण्यामध्ये नववी दहावी पर्यंतचे बंडूजी खंडूजी शाळा धायरी ,पुणे येथे पूर्ण केले गावाकडील शिक्षण व पुण्यातील शिक्षण यात खूप फरक असल्याची तिला जाणीव होत असत गावाकडे मैत्रिणी खूप छान सगळे मिळून सण उत्सव साजरा करत असत परंतु पुण्यात त्या उलट होत पुणे मध्ये फक्त एकच मैत्रिणी होती घरची परिस्थिती हालाखीची असल्यामुळे व वडिलाना दारूची व्यसन असल्याने कामावर दारू पिऊन गेल्यामुळे कंपन्यातून काढून टाकण्यात आले परत वडिलांनी त्यांच्या मूळ गावी चौपडा येथे

गेले त्यानंतर त्यांच्या कुटुंबाचे संपूर्ण जबाबदारी आईवर येऊन पडले आईने अनेक मिळेल ते करत करत कंपनीमध्ये कामाला जात असताना पीएमटी धडक दिल्यामुळे त्याच्या आईचा अपघात झाले त्यानंतर गौतमीला पुढील शिक्षण घेता आलं नाही व घरची परिस्थिती खूप हलाकीची असल्यामुळे आईने तिच्या गळ्यातील मंगळसूत्र घाणवट ठेवून काही दिवस संसार चालवले.



पुढं घर कसं चालवाव मोठी प्रश्र्न उपस्थित होते आईच्या मैत्रिणी गौतमीला महेंद्र बनसोडे यांच्याकडे घेऊन गेले त्यांचे डान्स क्लासेस होते त्या ठिकाणी दोन दिवस गेल्यानंतर महेंद्र सरांनी घुंगरू आणायला तिला सांगितले त्यावेळी घुंगरूचे किंमत पाचशे रुपये होते घरची परिस्थिती खुप गंबीर होते मनात जिद्द ठेवून त्याठिकाणी डान्स शिकण्यास सुरुवात केली त्याच दरम्यान अकलूज येथे लावणी महोत्सव कार्यक्रम होते त्यात त्याचे ग्रुप सहभागी घेतले होते त्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवले तिला खूप आनंद झाले त्यांनतर अनेक लहान मोठे कार्यक्रम करत राहिली त्यातून संपर्क वाढत गेले नंतर स्वतःचे कार्यक्रमाचे व्यवसाय चालू केले त्याचे पहिले कार्यक्रम वाघोली येथे झाले होते, गौतमी पाटीलाचे वेस्टर्न डान्स सोबत चंद्रा लावणी ही





करत असल्यामुळे त्याची कला एक वेगळं स्वरूपात दिसत होत त्यामुळे प्रेक्षकांना आवडू लागले कार्यक्रमासाठी दिवस भरातून १०० ते २०० कॉल महाराष्ट्र येत असत तिचे १० मुलीचे व इतर १५ असे २५ लोकांचे टीम तयार करून एक ग्रुप बनविले, ज्या ठिकाणी सुपारी येईल त्या ठिकाणी कार्यक्रमा जाऊ लागली हळू हळू गौतमीचे डान्स संपूर्ण महाराष्ट्रात घरा घरात पोचू लागले लहान वयात कमावलेले एवढे मोठी प्रसिद्ध काही लोकांना पचले नाही त्यामुळे तिचे कपडे बदलत असतानाचे व्हिडिओ काढून व्हायरल करण्यात आले होते त्यामुळे गौतमी पाटील हिला खूप मनःस्ताप झाले होते त्यावेळी या कला क्षेत्रातून बाहेर पडण्याची ती निर्णय घेतले होते परंतु तिला अनेक लोकांकडून, प्रेक्षकांकडून महिला वर्गाकडून खूप मोठी मानसिकधीर तिला देण्यात आले तिच्या मनात अनेक वेळा विचार येत होते की मी गरिब कुटुंबातील असल्यामुळे माझ्यामागे कुणी नाहीत त्यामुळे मला लोक ट्रोल करून माझ्यावर अनेक आरोप करतात का असं ती विचार करत परंतु महिला वर्गानी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून लढण्याची ताकद दिले व प्रेक्षक वर्गाच्या सपोर्टमुळे ती पुन्हा एकदा जोमाने कामाला लागली व कला क्षेत्रात नाव कमवत राहिली

गौतमी पाटील ही लहान मुलाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रम असो, बैलगाडा शर्यताचा कार्यक्रम असो किंवा दहीहंडीचे कार्यक्रम असो किंवा नेत्याच्या वाढदिवसाचे कार्यक्रम असो सर्व कार्यक्रमाचे सुपारी घेण्यास सुरुवात केली अनेक कार्यक्रमात पोलिसाने परवानगी नाकारले, अनेक संकटाना तोड देत कार्यक्रमाचे निर्णय स्वतः घेत त्यामध्ये बदल करत असे. ज्या ज्या ठिकाणी संकट आले त्याठिकाणी काहीच प्रतिक्रिया न देता शांत, संयम राहणे ती पसंद करती ती तिच्या स्वप्नबद्दल विचारले की म्हणत असते माझं काही स्वप्न नव्हतं, फक्त माझ्या मनात आमचं घर कसं चालेल, आज उद्या महिना यासाठी तेव्हा ही प्रयत्नशील होते आज ही प्रयत्नशील आहे जर भविष्यात चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल तर नक्की करेन असे सांगत असती तिचे स्वयंपाक करतेवेळीचे फोटो खूप व्हायरल झालेत ते फोटो तिच्या मॅनेजर अशोक खरात यांच्या गावामध्ये गेल्यावर त्याच्या घरी काढलेले आहेत.

ती आवर्जून सांगत असती डान्स हे कुणी हौसाने करत नसतो प्रत्येकाला स्वतःचे मजबुरी असते त्यामुळे या क्षेत्रात येत असतात सुरुवातीच्या काळातील पंधराशे रुपये प्रमाणे पगार घेत असत त्या पंधराशे पंधराशे रुपये जमावून ५००० जमल्यावर तिचे आईने घाणवट ठेवलेले मंगळसूत्र सोडून घेतली आत्ता स्वतःचे घर आहे ती या क्षेत्रात यशस्वी होण्याची श्रेय देण्याचे काम ती तिच्या आई-वडिलांना देते, तिला तिच्या कार्यक्रमातील कच कच कांदा, व सरकार हे गाणे खूप आवडतात असे संघर्षाची जीवन जगत एक यशस्वी कलाकार म्हणून महाराष्ट्रत ड्रीम गर्ल म्हणून गौतमी पाटील उदयास आली.

**समाप्त** ✻ ✻ ✻



चंद्रशेखर भांगे

# ग्रामीण भागातील पत्रकाराची पुण्यात गरुड झेप





**सुनील गायकवाड, पुणे**
मो.९८८१९ ८८३८३

अक्कलकोट तालुक्यातील मराठवाडा कर्नाटक या सीमावर्ती भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किरनळी हे गाव चौदाशे ते पंधराशे लोक वस्तीचे आहे या गावातील ग्रामदैवत चंद्रादेवी यात्रा महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश मध्ये प्रसिद्ध आहे यात्रेस लोक मोठ्या संख्येने सहभागी होतात अशा छोट्या गावामध्ये जन्मलेले चंद्रशेखर वसंत भांगे यांच्या जन्म किरनळी या गावातच झाले असून घरची परस्थिती खूप हलाखीची होती वडिलाचे जिद्द मुल शिकले पाहिजे व त्यांनी नाव कमावले पाहिजे या जिद्दीने मुलांना शिकवले गावातच जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शाळा शिकल्या नंतर चपळगाव येथे पुढील शिक्षणासाठी बोरडींग मध्ये घालण्यात आहे तेथून परत वागदरी येथील श्री एस एस शेळके प्रशाला येथे दहावी पर्यंत बोर्डिंग मध्ये राहून शिक्षण घेतले घरची परस्थिती खूप गरीबी असल्याने वह्या, पुस्तक, पेन, कपडे ही घेता येत नव्हत अशा हलाखीच्या परिस्थिती असताना ही वडिलांनी जिद्दीने काबाड कष्ट करून मुलांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करत होते

दहावी नंतर पुढे काय करायचं असं प्रश्न्न सतत शेखरच्या मनात यायचं त्यावेळी पुढे कामाशिवाय पर्याय नाही असे जेव्हा वाटलं तेव्हा मित्राच्या मदतीने पुणे येथे कामासाठी जाण्याची निर्णय घेतले परंतु जाण्यासाठी ही गाडी खर्च नव्हते , माला वाहतूक ट्रकने अखेर पुणे गाटले नवीन शहर, नवीन लोकं,नवीन परिसर, काहीच माहिती नसताना शहरा पोचल खरं पुढं काय करायचं हा मोठा प्रश्न

गावाकडील मित्राच्या शोधत तीन दिवस फुटपाथ वर न जेवता दिवस काढले व गावातील ज्या मित्राने पेंट्रोल पंप वर काम करत होते त्या ठिकाणी पोचले व दोन तीन दिवस असं तस काढले काम काय मिळतं नव्हत शेवटी त्याच पंपावर काम करण्यास सुरुवात झाले परस्थितीला संघर्ष करत आई वडिलांना सुखी कसे ठेवता येईल या जिद्दीने कामास सुरुवात केले परंतु वडिलाचे स्वप्न पूर्ण करता येत नव्हत समाजात एक वेगळी नाव कमावलं पाहिजे मुलाने हे काही करता येत नव्हत, कारण कामाशिवाय पर्याय नव्हत, पंपावर काम करत करत लहान मोठे सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत होता मिळेल तेव्हा अनेक विचारवंत पुस्तके वाचन करत असत पंपावर काम करणे तेथेच झोपणं , असे रोजनिशी चालू होते , पेट्रोल पंपावर रोज वृत्तपत्र येत असतं त्यामधील बातम्या वाचन करत असताना मनात पत्रकार होण्याची इच्छा होत असत परंतु काहीच करता येत नव्हतं गावाकडे वडील सतत आजारी पडत त्यांना दवाखाना दाखवण्यासाठी खूप खर्च होत होते त्यामुळे मनस्थिती बेचन होत होत वडिलांना सोलापुरला ॲडमिट केल्याचा निरोप आल काम सोडून सोलापुरात आले वडील आय सी यू मध्ये होते शेखर समोर वडिलाचे जीव वाचवण्याचे प्रयत्न चालू होते परतू दवाखाण्यात बील भरण्यासाठी शिंशि नव्हते शेवटी वडिलाचे नावे असलेले शेत जमीन खाजगी सावकारांना लिहून देऊन व्याजाने पैसे काढून दवाखाना दाखवण्यात आले वडिलाचे तब्येत बर झाले व गावाकडे घेऊन आल वडिलांना सोडून पुन्हा पुण्याच्या दिशेने प्रवास चालू झालं आत्ता मनात अनेक विचार चालू होत व्याजाने पैसे काढलेले होते भाऊ ही पेट्रोल पंपावर कामाला आला नुकतेच भावाच लग्न झालं होत लग्नासाठी दुसऱ्याकडून हात उसने शिंशि घेतलेले होते भावाला घराचं सर्व कामे करून संसार

चालू होत खर्च मात्र वाढत चाल होत एकीकडे खाजगी सावकाराचे व्याज वाढत होत काहीच ताळमेळ बसत नव्हत, मन खूप बेचान होत होत या सर्व संकटाना तोंड दिल्याशिवाय पर्याय नव्हत यासाठी जीवनच संघर्ष चालू होता एवढ्या संकटातून ही शिक्षण चालू ठेवले व अकरावी बारावी व पुढील शिक्षण नळदुर्ग महाविद्यालयातून घेतले

वडिलाचे तब्येत अधून मधून बिघडत होत वडिलांनी शेखरला लग्नाला तगदा चालू केले होते मुलीचे पाहणी चालू केले नांदगाव येथील नातेवाईक मधील मुलगी बघून लग्न लावण्यात आले संसाराचे जबाबदारी शेखरवर येऊन पडले हडपसर येथे भाड्याने घर घेऊन नवीन जीवनाला सुरुवात झाल होत त्याच बरोबर सामाजिक उपक्रम राबवत चालू होत हडपसर माळवाडी येथे मोफत पोलीस प्रशिक्षण घेण्यात आले यासोबतच साप्ताहिक काली गंगा या क्राईम स्टोरी वृत्तपत्र माध्यमातून पत्रकारितेला सुरुवात करण्यात आले त्यानंतर विविध चॅनल मध्ये कर करण्यास सुरुवात झाले. लोकशाही या न्युज चॅनल माध्यमातून अनेक सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम जोमाने सुरू असतानाच अनेक रुबी सारख्या मोठ्या हॉस्पिटल मधील किडनी रॅकेट उघडकीस सोबत किरीट सोमय्या यांचे व्हिडिओ क्लिप लोकशाही न्युज माध्यमातून जनते समोर आणून निर्भिड पत्रकारितेला पुणे शहरातून विविध ठिकाणी होर्डिंग्ज लावून अभिनंदन करण्यात आले

अनेक विविध विषयावरील बातमीचे दखल अधिवेशनात लक्षवेधी मध्ये घेण्यात आले.अशा प्रकारे परस्थितीवर मात करत पत्रकारितेमध्ये पुणे सारख्या शहरात गरुड झेप घेतले आहे

**समाप्त ✻ ✻ ✻**

# जयपूरच्या हवामहल बद्दल काही रोचक माहिती

राजस्थान हे पर्यटकांचे आवडते राज्य आहे. येथील किल्ले, महाल, शहरे, वाळवंट यांची अनोखी शान आहे. राजधानी जयपूरला लाखो पर्यटक दरवर्षी भेट देत असतात. पिंक सिटी अशी ओळख असलेल्या या शहरातील हवामहल त्याच्या अद्भूत वास्तुकला, इतिहास आणि डिझाईन मुळे पर्यटकांना आकर्षित करतो. गुलाबी रंगाचे सज्जे, जाळीदार खिडक्या, राजपूत आणि मुघल वास्तुकलेचा संगम हा महाल पाहण्यासाठी येणाऱ्यांना मंत्रमुग्ध करतो. या महालाविषयी काही रोचक माहिती वाचणे

आमच्या वाचकांना नक्कीच आवडेल.सर्वप्रथम या महालाचा आकार पाहू. तो एखाद्या मुकुटाप्रमाणे आहे. राजा सवाई प्रतापसिंग मोठे कृष्णभक्त होते आणि त्यामुळे या महालाचा आकार कृष्णाच्या मुकुटासारखा आहे असे सांगितले जाते. पाच मजली इमारत असलेल्या या महालाला भक्कम पाया नाही. त्यामुळे पायाशिवाय बांधलेला हा जगातील सर्वात उंच महाल मानला जातो. पाया नसल्याने हा महाल घुमावदार आणि ८७ अंशात झुकलेला आहे. याचा गुलाबी रंग बलुआ दगडांच्या मुळे आहे. हे दगड गुलाबी रंगाचे असतात.या महालाची उभारणी खास स्त्रीवर्गासाठी, त्यातही राजघराण्यातील महिला वर्गासाठी केली गेली होती. या महालाला ९५३ खिडक्या आहेत. यातूनच राजघराण्यातील स्त्रिया रस्त्यावर चाललेली नृत्ये, लोककला पाहू शकत आणि शहराचा नजराही पाहू शकत.हवामहाल मध्ये आत गेले की मुघल शैली आणि राजपूत शैलीचा सुंदर संगम दिसून येतो. कमानी, महिरपी मुघल शैलीमध्ये आहेत

तर खांब, छतऱ्या, फुलांचे डिझाईन राजपूत शैलीचे आहे. पाच मजली या महालात जिने नाहीत तर रॅंप आहेत. हा महाल सिटी पॅलेसचा एक हिस्सा म्हणून बांधला गेला होता त्यामुळे बाहेर प्रवेशद्वार नाही. पॅलेस मधूनच आत हवामहल येथे जाता येते.राजस्थानात उन्हाळा अतिशय कडक असतो. मात्र हवामहाल उन्हाळ्यात सुद्धा विशेष तापत नाही. या महालाला असलेल्या असंख्य खिडक्यातून गार वारा आत येत राहतो आणि त्यामुळे हा महाल तापत नाही. हवामहल हे नाव या महालाच्या पाचव्या मजल्याच्या नावावरून दिले गेले आहे. या महालाच्या ५ व्या मजल्याला हवामंदिर म्हटले जाते. या महालात गोवर्धन कृष्ण, प्रकाश मंदिर आणि हवामंदिर अशी तीन मंदिरे आहेत.









# काव्यपक्ती



## अत्त! दीप!भव!

स्वयं. प्रकाशित व्हा
अत्त दीप भव!हे वाक्य
किती लहान आहे तथागत
भगवान गौतम बुद्ध म्हणतात
अत्त दीप भव स्वतःचा दीपो
स्वतःच स्वतः प्रकाश हो!

जीवनात सृष्टी, शांती,
समाधान यश, प्रतिष्ठा,
मानसन्मान, धन, संपत्ती,
आरोग्य, सर्व हवे आहे ते
स्वतःच तुम्हाला स्व कष्टाने

मिळवायचे आहे घरभर दिवे
लावून प्रकाश करणे म्हणजे
सन नव्हे... तर गरिबांच्या ही
घरात... एखादा दिवा लावून
प्रकाश करणे म्हणजेच खरं
सण दीप उत्सव..

- निंगप्पा निंबाळ दुधनी

## माझ्या बापाच्या शेतात

माझ्या बापाच्या शेतात
पिक मोत्याचा जोंधळा,
आज आनंदून विठू
मारी रुक्मिणीला डोळा.
माझ्या बापाच्या शेतात
वाजे पानांचं संबळ,
आई जगदंबा पावली
बापाच्या घामामुळं.
माझ्या बापाच्या शेतात
काळी माती वाटे बुक्का,
नाद पानांची सळसळ
टाळ चिपळ्या पडती फिक्या.
माझ्या बापाच्या शेतात
आहे अमृताचा झरा
ठिबकून ठिबकून वाहे
त्याच्या घामाच्या धारा.
माझ्या बापाच्या शेतात
सगेसोयरे नाचती,
वृक्षवल्लींच्या संगती
गाथा मुखातून बरसती.
माझ्या बापाच्या शेतात
गाती पक्षी मंजुळ स्वर,
झाडा फांद्या खाली आहे
सावता माळ्याचं माहेर.

**कवी. प्रा. शिवाजी गायकवाड,**
**मू.पो.किरनळी ता. अक्कलकोट**



## मानव होऊ या

वैर मनातील विसरून सारे
चला एकोप्याने राहू या
बंधुभाव विश्र्वात भरुनी
चला तर मानव होऊ या

जन्म असे हा बहुमोलाचा
कर्तव्याची पूर्तता करावी
संधी पुन्हा मिळणार नाही
नव स्फूर्ती श्र्वासात भरावी


जीवन सुंदर होईल मानवा
सर्वात शोध तू सद्गुण रे
शिकण्या सारखे सदैव मिळते
त्याग त्वरा तू अवगुण रे

जिद्द असावी मन जिंकण्याची
जग जिंकून नाही मिळत सुख
भिती मनात प्रत्येक क्षणी रे
मिळकत चोरी जाण्याचे दुःख

ईश्र्वर निर्मित रचना ही सारी
येथे विना उद्देश नसे काही
माणूस अंश असे त्या रचनेचा
सर्वामध्ये त्याचेच रूप पाही

गरजवंताला मदतीचा हात देऊ
निराधारांचा होऊ या आधार
सफल होईल हा जन्म आपला
सत्कर्म करण्या नको माघार

**पवन कुसुंदल,नांदेड**
**संपर्क:९०७५५९५६९५**



## बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं..

आसवांनी खुशीत भिजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं..

ना ऊन,ना वारा,ना पावसाची भिती,
बघताच तुला फुलली ५६ इंच छाती,
पुस्तकं घेऊन उशीत निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं..

तेजापुढे तुझ्या चंद्र तारे फिके पडावे,
जीवनात एकदा बा तुझे दर्शन घडावे,
आनंदाचे अश्रू पुशीत निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं..

निळ्या भगव्यांनी फुलले दिक्षाभुमी शहर,
नागनगरीला आला नागवंशी यांचा बहर,
बघं कशी तुझ्या एसीत निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं..

जाता जाता फक्त विचार घेऊन जाईल,
अडाणी असलो तरी तुला लेकरात पाहिल,
परिवर्तन वादळात ना विझली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत निजली पाखरं !!!

## विस्थापित धोरण...

हजारो वर्ष सतत निर्माण केला
प्रस्थापितांनी विस्थापितांत प्रस्थापितवर्ग
नित्यनियम पाळावे,झुलावे
खोगीर संस्कृतीच्या पोकळीत
अविरतपणे..
मुळच्या संस्कृतीचे आंम्हीच कर्ते
ही वल्गना पुढे आली
संथगतीने रूजली आणि पेट घेतली
माणसाला नाकारून
धर्म-जात प्रमाण माणून..
कोणत्याच लढ्यात सामील नसलेले
राष्ट्रभक्त गणले गेले जे लढले,रक्त सांडले
ते केवळ वर्गाचे झाले
आजपर्यंत..
मी संख्येने,श्रीमंतीने मोठा
हाच अविर्भाव खोल रूजला
ह्यालाच खतपाणी यातले गेले
बदलत्या भारतात
निष्क्रियपणे..
विस्थापितात ही प्रस्थापित मानू लागले
वरदहस्ताच्या गुरूकृपेने
समाज थांबला तरी चालेल
मी नाही थांबणार,मागे बघणार
स्व:हितात.. तीच संस्कृती पुन्हा सांगणार
नवक्रांतीचा आदर्श पथ
ते कधीच न घेता आदर्श
तूटून पडतात आपल्याच नात्यागोत्यात
भेदास माणून..
विस्थापितातल्या प्रस्थापितांची ही नवीनवलाई
तीच रीघ ओढते आहे
पेरते पुन्हा-पुन्हा अधोगतीचे बीज
दोन संघर्षाच्या वाटा लढतो नेक
माणूस एक समग्र जीवनात
अविरतपणे..
नेतृत्वाची हव्यासा,संशयाचे बीज
समाज ध्रुवीकरणाचे मुळ असून
आज प्रत्येकाच्या ध्यानी आले पाहिजे
ही वृत्ती आगीसमोर उभी करून
मागे सरकेल निष्कलंकीत चेहरे जाळून..

**- बाबासाहेब सोनकांबळे**
**(जे.एन.सामाजिक संघटना)**



## कार्यकर्ता वेठबिगार झाला

जेंव्हापासून राजकारणात व्यापार आला
तेव्हापासून कार्यकर्ता वेठबिगार झाला!

जेंव्हा होती राजकारणात चळवळ
तोपर्यंत चालत होते कार्यकर्त्यांचे बळ
व्यापाऱ्यांची कार्यकर्त्यांसाठी होई धावपळ
आता मात्र होतेय कार्यकर्त्यांची तारांबळ
राजकारणात वाढली व्यापाऱ्यांची पिलावळ
आता राजकारणात व्यापारी दावेदार झाला
तेंव्हापासून कार्यकर्ता वेठबिगार झाला !

कधीकाळी कार्यकर्त्यांच्या
बळावर चालायचा पक्ष
आता व्यापाऱ्यांच्या नोटांवर
नेत्यांचे लक्ष निवडणूक आली की
होतो सोक्षमोक्ष
कार्यकर्ता बेरोजगार आणि
व्यापारी उमेदवार झाला !
तेंव्हापासून राजकारणात
कार्यकर्ता वेठबिगार झाला !

महापालिका ; विधान परिषद ;
विधानसभा
कार्यकर्त्यां आधी तिथे
मंत्र्यांचा पी ए; व्यापारी बिल्डर उभा ;
कार्यकर्ता आणि पक्ष जरी
असला लोकशाही चा गाभा
तरी सभागृहात निवडून जाणाऱ्यांमधून
कार्यकर्ता हद्दपार झाला
कालचा मंत्र्यांचा
पी.ए.आजआमदार झाला
विचार करा का कार्यकर्ता
वेठबिगार झाला!

**-- हेमंत रणपिसे**

# गर्भार स्वप्ने

मातीला उकळी यावी
तशी माती तापली आहे
आंर्तबाह्य...
कधीतरी स्वप्नं पडत
असतील
माझ्या शेतातील
ढेकळानांही..
भरलेल्या ढगांची,
गर्भार कणसांची,
चळचळत्या विजेची
अवखळ सरींचीही..
ही निद्रिस्त ढेकळं
नुसतीच झोपून राहतात
आपला,
वंश वाढवायचा सोडून..
उद्या जेव्हा पावसाच्या
टपोर्या थेंबातून
ओघळ वाहतील
धरतीच्या अंगाखांद्यावर
तेव्हा ती ही नटेल
नव्या नवरीसारखी..
तेव्हा ढेकळांनो,
सावध असा
कधी ढग जमतील
याचा नेम नाही....

**आबासाहेब निर्मळे.**
**९०२८०९०२६६.**

# गाव

डोळ्यांमध्ये मेघ अचानक दाटून गेले
एक पाखरू आभाळाला चाटून गेले
वेल वाढला झाडावरती इतकाही कीं
झाड लटकले वेलीला का ? वाटून गेले
दगड टाकूनी रांजण भरला इच्छेचा मी
तहानलेले आले पाणी आटून गेले
वारा होता वहात तेव्हा जसे फेकले
पतंग उडले नभात आणि फाटून गेले
इतक्या वेळा वाहून गेला तरी नव्याने
मनासारखा गाव दिवाने थाटून गेले

**समीरसिंह व्दा. साळवे**
**उपविभागीय पोलिस अधिकारी, इचलकरंजी**
**वडगाव निंबाळकर ( ता. बारामती)**



# गौतमी पाटील

सुख दुःखात देईन
सुख दुःखात देईन मी साथ गं..।
गौतमी पाटील तुझं नाव कोरलंय मी काळजात गं.. ।।
ध्यानी मनी तुच तुच गं..
तुख स्वप्नात गं...
रात्रभर नाही झोप, दचकून उठतोय मी अथरुनात गं...
गौतमी पाटील तुझं नाव कोरलंय मी काळजात गं..
पाहुण नृत्य तुझं पाहुण तुझी कला
आई जावाई भेटलाय तुला
सांग तु माझ्या सांसुला
हात पिवळे करुन तुला देईण घराच्या आतगं...
गौतमी पाटील तुझं नाव कोरल मी काळजात गं...
होशील का ग माझी अर्धांगीनी
गोष्ट सांगतो तुझ्या काणी, ठेवही धयानी मनी..
आता नाही सहन होत गं..
गौतमी पाटील तुझं नाव कोरलं मी काळजात गं.. ।

**- विनोद लक्ष्मण कदम मो.८२६३८१८०७२**

# शेतकरी

घाम गाळूनी काम करी
खातो कष्टाची भाकरी
भलं मोठ कर्ज डोक्यावरी
परिस्थितीवर मात करुनी
जगतो आमचा शेतकरी
सातबाऱ्यावर शेतकऱ्याचे नावं
दुष्काळात पडलं माझ गावं
किती सोसावं आम्ही घाव
कधीच नाही मिळाला
पिकाला चांगला भाव
उन्हाचे चटके सोसत
कुटबांचे पोट भरतो
दिवस रात्र मेहनत करतो
उद्याचे स्वप्न उराशी धरून
गरिबीत दिवस काढून स्वाभिमानाने जगतो
नसली जरी खिशात दमडी
जमिनीवर टाकतो घोगडी
सोबत आमच्या चिंद्याची गोधडी
लाखापेक्षा कमी नाही
आमच्या गरिबाची झोपडी
नाही कोणती चिंता
नाही कोणता मनी ध्यास
अभिमानानं जगतोय
चटणी, भाकर खाऊन
घेतोय मोकळा श्र्वास
राब, राब राबून
बापाची चप्पल झिजली
उन्हाचे चटके सोसत
पाठ घामाने भिजली
आयुष्याची ओंजळ मात्र कर्जाने सजली
पायाला भेगा पडून
डोळ्यातलं पाणी पुसून
सर्वांशी इमानदारी टिकवतो
उद्याचं स्वप्न रंगवतो
शेती बरोबरच आम्ही माणुसकी पिकवतो

**मिलिंद सुरेश जाधव**
**मो. ८६५५५६९४३६**



सूर्यकांत लक्कप्पा
गायकवाड

# भाषावार प्रांत रचना : तत्व आणि व्यवहार

प्रस्तावना : स्वातंत्र्यानंतर भाषिक अस्मिता तीव्र झाल्या आणि भाषिक आधारावर राज्याची मागणी होऊ लागली. पण ही मागणी अचानकपणे उदयास आलेली नाही, तर त्याला काही ऐतिहासिक पार्श्र्वभूमी आहे. प्राचीन काळामध्ये भाषा, धर्म व राजा ही सत्तेची केंद्रे होती इंग्रजाच्या अमलानंतर त्यात बदल होऊन भाषा, संस्कृती व राज्य ही केंद्रे मानून त्याच्या भोवती विचार होऊ लागला, परंतु भाषेचे महत्त्व पूर्वी सारखे राहिले. राजा आणि धर्मसंस्था यांच्या नियंत्रक सत्तेच्या अभावामुळे भाषेला महत्त्व आले त्यामुळे केवळ समूहजीवन व संस्कृती जपण्यासाठी बोलीभाषा हेच एकमेव साधन राहिले म्हणून भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. आधुनिक काळामध्ये प्रबोधन युगास सुरुवात झाली. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. त्यातून पुन्हा भाषा हा महत्त्वाचा घटक बनून राहिला. बंगालच्या फाळणीनंतर जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात भाषेच्या आधारावर भाषिक समूह एकत्र येऊ लागले. त्यामुळे भाषिक समूहाच्या भाषिक अस्मिता तीव्र होऊ लागल्या, आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या कालखंडात भाषिक अस्मितेची जाणीव झालेल्या भाषिक समूहांकडून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती व्हावी अशी मागणी होऊ लागली.

भाषावार प्रांतरचनेचा अर्थ : भाषावर प्रातंरचना म्हणजे सर्वसाधारणपणे भाषेच्या आधारावर प्रांताची (राज्याची) रचना किंवा पुनर्रचना करणे होय. एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचा एक राज्य निर्माण करावे कारण एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचे एक राज्य असेल तर त्या राज्यातील लोकांना आपल्या संस्कृतीचा विकास करण्यासाठी आणि सामाजिक एकता टिकविण्यासाठी सोयीस्कर होते. विशिष्ट भाषा ही त्या त्या समाजाच्या संस्कृतीची वाहक असते. समान भाषेतून त्या समूहाला एक सामूहिक अस्मिता प्राप्त होते. त्यामुळे हे भाषिक समूह भाषिक अस्मितेतून स्वतंत्र राज्याची मागणी करतात.

भाषावर राज्ये अस्तित्वात आली तर देशातील एकजिनसीपणा व राज्यव्यवस्थेमध्ये स्थैर्य निर्माण होईल .असे भाषिक समूहाना वाटते म्हणून भाषिक आधारावर राज्याची मागणी करतात. अशारीतीने भाषेच्या आधारावर प्रत्येक भाषिक समूहांचे स्वतंत्र राज्य स्थापन करणे म्हणजेच भाषावार प्रातंरचना होय. भारतात इंग्रजाचे राज्य स्थापन झाल्यानंतर भारतातील अनेक विचारवंताना व समाज सुधारकाना ..नव्या स्वरूपात राष्ट्र, राज्य स्थापन झाले पाहिजे याची जाणीव झाली परंतु ते कशाच्या आधारावर करावे हे सांगताना प्रत्येकाची वेगवेगळी मते मांडली. त्याच्यामध्ये भाषा हा घटक नव्हता. परंतु 'फोडा आणि राज्य करा' या तत्त्वाने इंग्रजांनी भारतातील जनतेत फूट पाडण्याचे ..कार्य केले. कारण इंग्रज सरकारने १९०५ साली बंगालच्या विरुद्ध अनेक ठिकाणी आंदोलने करण्यात आली. बंगालच्या फाळणी विरुद्ध झालेल्या लढ्यात भाषिक राष्ट्रवादाचा स्पष्ट आविष्कार दिसतो. असे मत प्रा. दि. के. बेडेकरानी मांडले आहे. त्यामुळे बंगालच्या फाळणी पासून भारतातील जनतेमध्ये भाषिक अस्मितेची जाणीव वाढत गेली. कारण पूर्वीसारखा विशाल बंगाल न ठेवता बंगाली

भाषिकांचा सिल्हेट जिल्हा वगळता बंगाल निर्माण करण्यात आला. त्याचबरोबर बिहार व ओरीसा हे प्रांत बंगालमधून वेगळे करण्यात आले आणि सिल्हेट जिल्ह्याचा समावेश करून आसाम हा नवा प्रांत निर्माण करण्यात आला. अशाप्रकारे बंगालच्या फाळणीमधून बिहार, ओरिसा, आसाम हे नवे प्रांत निर्माण करताना भाषेचा आधार घेतला गेला. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेची सुरुवात ही बंगालच्या फाळणीमधूनच झाल्याचे दिसून येते. भाषेबद्दल जी अभिमताची किंवा अस्मितेची भावना हे स्वभाषेचा आदर, परभाषांचा द्वेष आणि इतर भाषा दडपून आपली भाषा त्या ठिकाणी लादण्याचा आग्रह या तीन मार्गाने निर्माण होते. यातून आपल्या भाषेवरचे प्रेम व्यक्त करीत असतात. या प्रेमापोटी भाषिक अस्मिता भाषिक समूहामध्ये निर्माण होते. भाषावार प्रांतरचनेची सुरुवात बंगालच्या फाळणीमधून झाली असली तरी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी सुरुवातीला केलेली प्रांतरचना ही प्रशासनाच्या सोयीसाठी केली होती. परंतु काही ब्रिटिश राज्यकर्त्यांना यात बदल करून भाषा विचारात घ्यावी आणि प्रांताची निर्मिती करावे असे वाटू लागले. मॉंटेग्यू चेम्सफोर्ड रिपोर्टमध्ये भाषावार प्रांतरचनेचे महत्त्व पुढील शब्दात स्पष्ट केले आहे. राज्यकारभारासाठी पाडलेले विभाग आकाराने लहान व एकभाषिकाचे व एका वंशाच्या लोकांचे असे जर बनविण्यात आले असते तर राज्यकारभाराच्या दृष्टीने सरकारचे काम बरेच सुलभ झाले असते ही गोष्ट नि:संशय खरी आहे. '

अशारीतीने ब्रिटीश राज्यकर्त्यांमध्ये भाषेच्या आधारावर राज्य निर्मितीची इच्छा होती आणि त्यामुळेच बंगालच्या फाळणीमध्ये उघडपणे भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती झाली नसली तरी प्रत्यक्षात भाषिक लोकाचेच राज्य निर्माण केले गेले.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील भाषावर प्रांतरचनेबद्दलची कॉंग्रेसची भूमिका

डिसेंबर १९२० च्या नागपूर कॉंग्रेसच्या अधिवेशनात भाषावार प्रांतरचनेला विरोध करणाऱ्या गांधीजींनी स्वत: भाषावार प्रांतरचनेच्या ठराव मांडला व यास मान्यता मिळाली. त्याचवेळी कॉंग्रेस संघटनेची रचना ही भाषिक तत्त्वावर करण्यात आली. कॉंग्रेस वर्किंग कमिट्या आणि इतर समित्या स्थापन झाल्या, त्या सर्व भाषिक आधारावर करण्यात आलेल्या होत्या. उदा. महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटी, गुजरात कॉंग्रेस कमिटी, मुंबई कॉंग्रेस कमिटी इ. १९२८ साली स्थापन झालेल्या नेहरू कमिशनने भाषावार प्रांताचा जोरदार पुरस्कार केला. हे प्रांत म्हणजे कॉंग्रेसच्या प्रचारासाठी पाडलेले विभाग नसून राज्यकारभाराचे घटक आहेत अशा शब्दात या अहवालात मांडणी केली गेली. कमिशनने भारतीय घटनेचा आराखडा तयार करून त्याचे घटक म्हणून भाषिक प्रांताचा त्यात समावेश केला गेला होता.

१९३५ साली जाहीर झालेल्या प्रांतिक स्वाय्यततेच्या कायद्यानुसार भारतामध्ये संघराज्याची सुरुवात झाली. या कायद्यानुसार मुंबई, मद्रास, बंगाल, संयुक्त प्रांत (उ.प्र.) पंजाब, बिहार मध्यप्रांत वऱ्हाड, वायव्य सरहद्द प्रांत, ओरिसा, सिंध अशा ११ प्रांताची पुर्नरचना करण्यात आली. दोन वर्षानंतर १९३७ साली निवडणूका झाल्या. कॉंग्रेसने या निवडणूकींच्या जाहीरनाम्यात भाषावार प्रांतरचना करणे या मुद्याचा उल्लेख केला. एवढेच नव्हे तर १९४५ साली सर तेज बहादुर सप्रु, सर इमाम अली आणि सुभाषचंद्र बोस हे इतर प्रमुख सदस्य असणाऱ्या समितीने प्रथमच अत्यंत नि:संदिग्धपणे भाषावार प्रांरचनेची मागणी केली. ८ डिसेंबर १९४६ रोजी आपल्या अध्यक्षीय भाषणात कॉंग्रेसने नेते पट्टाभी सीतारामय्या यानी घटना परिषदेने भाषावार प्रांतरचना करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करावी अशी मागणी केली. घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना १७ एप्रिल १९४७ रोजी ऑल इंडिया लिंग ऑफ लिंग्वेस्टीक प्रोव्हिन्सेसचे जनरल सेक्रेटरी जी. व्ही. सुब्बराव यांनी एक पत्र पाठविले. त्यानी पत्रात सध्या असलेल्य प्रांताची पूर्नविभागणी करावी व त्यासाठी सांस्कृतिक आणि भाषिक तत्त्वाचा अवलंब करावा. असे सूचविले.

स्वातंत्र्योत्तर भारतीय संघराज्याची स्थिती : -

भौगोलिक आकार, लोकसंख्या, आर्थिक, भाषिक, प्रादेशिक अशी विविधता असलेल्या आणि प्राचीन काळापासून त्या विविधतेमध्ये एकात्मता निर्मितीचे सूत्र व संमिश्र संस्कृतीचा वारसा यामुळे भारतात संघराज्य व्यवस्था स्विकारणे योग्य होते. म्हणून स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनाकारांनी संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार केला. परंतु भारतीय राज्यघटनेमध्ये संघराज्य असा स्पष्ट उल्लेख कोठेही नाही. भारत हा राज्यांचा एक संघ होईल या कलमाने घटनेचा प्रारंभ होतो. त्यामुळे भारतीय संघराज्याला सहकारी संघराज्य, सादृश संघराज्य, अर्धसंघराज्य अशा नवनवीन संज्ञा वापरल्या जातात. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संस्थानांचे विलनीकरण करण्यात आले राज्यघटनेच्या सुरुवातीला भारतीय संघराज्यक्षेत्र अ ब क आणि ड या चार गटामध्ये राज्ये विभागली गेली होती. त्यासाठी भाषावार प्रांतरचना करून प्रांताची निर्मिती करावी ही स्वातंत्र्यपूर्व काळापासून राहिलेली मागणी कॉंग्रेस पक्ष पूर्ण करील आणि भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती करेल अशी अपेक्षा होती. परंतु तसे झाले नाही.

भाषावार प्रांतरचनेची भावना भारतीयांच्यात निर्माण होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वातंत्र्यपूर्वकाळापासून जो भारतीय राजकारणात मध्यवर्ती असलेल्या कॉंग्रेस पक्षाने वेळोवेळी भाषावार प्रांतरचना करण्याचे आश्र्वासन दिले.

२) इंग्रजानी १९०५ पासून वेळोवेळी अनेक प्रांताची निर्मिती भाषिक आधारावरच केली होती. भाषावार प्रांतरचना करण्याची गरज होती कारण प्रशासन शासन हे संघराज्यीय स्वरूपाचे स्वीकारल्यामुळे घटकराज्याची निर्मिती करणे आवश्यक होते.

३) भाषा हा संस्कृतीचा घटक असल्यामुळे एकभाषिक लोक एकसारखे बोलतात, एकसारखे विचार करतात त्याच्या या एकसारखेपणामुळे तेथील लोकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी भाषा ही

एक चांगली भूमिका बजावत असते.

भारतीय सरकारने निर्माण केलेल्या समित्या

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेची निर्मिती करण्यास सुरुवात झाली घटनेचा कच्चा मसुदा संविधानसभेच्या अध्यक्षाचे सल्लागार बी. एन. राव यांनी तयार केली. बी.एन. राव यांच्या मते, भाषावार प्रांतरचनेची मागणी आणि त्या स्वरूपाच्या अन्य मागण्या मान्य करणाऱ्यांना समाधान होईल. कारण संविधान तयार करण्याच्या मार्गातील भाषावार प्रांतरचना ही एक महत्त्वाची अडचण होती. परंतु भारत-पाक फाळणीचा प्रश्न जसा पुढे आला. तसतसे भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न गरजेचा नसून तो पाचदहा वर्षे लांबणीवर टाकावा असे जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, राजाजी या कॉंग्रेसश्रेष्ठींना वाटू लागले. परंतु सरकारच्या या भूमिकेवर अनेक लोकांनी व काही कॉंग्रेस नेत्यांनी टिका करण्यास सुरुवात केली त्यामुळे भाषावार प्रांतरचना निर्माण करण्यासाठी पुढील समित्या नेमण्यात आले.

अ) दार आयोग दार कमिशनने असे ही सांगितले की, कॉंग्रेसने पूर्वी भाषावर प्रांतरचनेबाबत दिलेली अभिवचने बंधनकारक मानू नयेत बदलेल्या परिस्थितीत नव्याने निर्णय घेण्याचा कॉंग्रेसला अधिकार आहे व ते कॉंग्रेसचे कर्तव्य ही आहे. यावरून नेहरू व पटेल हे दोघे . भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न पाच दहा वर्षे लांबणीवर टाकावा असे म्हणत होत पण दार आयोगांनी कालमर्यादा न घालता हा प्रश्न बेमुदत लांबणीवर टाकावा असे सुचविले.

ब) जे. व्ही. पी. समिती : दार समितीच्या अहवालाचा भारतात सर्वत्र कडकडून निषेध झाला. भाषावार प्रांतरचनेचे समर्थन करणारी जनता तर ाहोच खुद्द कॉंग्रेस श्रेष्ठींना व भारत सरकारला ही दार कमिशनचा अहवाल मान्य नव्हता. त्यामुळे कॉंग्रेस वर्किंग कमिटीने पट्टाभी सीतारामय्या, जवाहरलाल नेहरू- आणि वल्लभभाई पटेल या तिघाची समिती नेमण्यात आली. तिघा नेत्याच्या नावातील आद्याक्षरावरून ही समिती जे. व्ही. पी. समिती म्हणून ओळखली गेली. या समितीने तीन महिने अभ्यास करून आपला अहवाल ५ एप्रिल १९४९ रोजी प्रसिद्ध केला. अहवालामध्ये भाषावार राज्यरचनेसंबंधीचे कॉंग्रेसचे धोरण व स्वातंयप्राप्तीनंतरच्या काळात उत्पन्न झालेल्या बिकट समस्यांचा विचार करताना सध्याची अवस्था ताबडतोबीने प्रांताची पुर्नरचना करण्यास अनुकूल नाही कोणती ही गोष्ट करायची झाली तर भारताचे म्हणून संरक्षण, त्याची एकता व आर्थिक स्थैर्याला बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. असे नमूद करण्यात आले आहे.

आंध्र राज्याची निर्मिती : तेलगू भाषिकांच्या मागणीचा ठराव १९१३ साली आंध्र महासभेने पारित केला. तेव्हापासून अनेकवेळा स्वतंत्र राज्याची मागणी तेलगू भाषिक करीत होते. जे. व्ही. पी. समितीच्या अहवालातून त्याना आधार मिळाला परंत त्यांनी स्वातंत्र्याची चळवळ चालूच ठेवली पुढे हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतर हैद्राबाद शहरासकट तेलंगण संकल्पित प्रदेश आंध्र राज्यात समाविष्ट करावे आणि तेलगू भाषिकांचे विशाल आंध्र राज्य अस्तित्वात यावे असे अनेक तेलगू भाषिकाना वाटू लागले. पोट्टी रामूलू, या गांधीवादी कार्यकर्त्यांने १९ ऑक्टोबर १९५२ रोजी त्यांनी उपोषण सुरू केले आणि ५८ दिवसाच्या उपोषणानंतर १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांनी प्राणार्पण केले. त्यांच्या बलिदानानंतर तेलगू भाषिक इतके आक्रमक झाले की त्यांनी हिसांचाराचे थैमान घालण्यास सुरुवात केली. तेलगू भाषिकांचा असंतोष पाहून आंध्र राज्य निर्माण करण्याची घोषणा करण्याखेरीज नेहरूना पर्याय राहीला नाही. शेवटी आंध्र जनतेपुढे केंद्र सरकार शरण येऊन १ ऑक्टोबर १९५३ रोजी मद्रासमधून वेगळे होऊन आंध्र राष्ट्र स्थापन झाले. अशारीतीने पोट्टी रामूलूच्या बलिदान हे आंध्र राज्याच्या निर्मितीचे कारण बनले.

क) राज्यपुनर्रचना आयोग : २२ डिसेंबर १९५३ रोजी राज्यपुनर्रचना आयोग नेमण्याची घोषणा पंडित नेहरूंनी संसदेत केली या आयोगाने राज्याच्या पुर्नरचनेचा प्रश्न ऐतिहासिक पार्श्र्वभूमी, वर्तमान परिस्थिती आणि सर्व संबंधीत घटक याचा विचार करून अभ्यासावा अशी जबाबदारी त्या आयोगावर सोपण्यात आली. या आयोगामध्ये न्या. फाजल अली अध्यक्ष व के. एम. पण्णीकर आणि हृदयनाथ कुंझरू हे सदस्य होते या आयोगाने ३० सप्टेंबर १९५५ रोजी आपला अहवाल सादर केला. घटक राज्याचे क, ख, ग, घ हे वर्गीकरण रद्द करण्यात यावे आणि १६ राज्ये व ३ संघशासित प्रदेश असे नवे प्रकार केले जावेत. ही मुख्य शिफारस केली. आयोगाने प्रांतवाद तसेच भाषावेड याचा निषेध केला असला तरी भाषा हेच राज्यांच्या पुर्नरचनेचे मुख्य अधिष्ठान मानले आहे.

’ राज्य पुनर्रचना कायदा (१९५६) : भारत सरकारने आयोगाच्या जवळपास सर्व शिफारशी स्वीकारल्या मात्र हैद्राबाद व विदर्भ यांना स्वतंत्र राज्याचा दर्जा द्यावा ही शिफारस मात्र सरकारने अमान्य केली. आयोगाच्या शिफारशींवरून राज्यपुनर्रचनेचे विधेयक ११ ऑगस्ट १९५६ रोजी संमत करण्यात आले. त्यानुसार हैद्राबाद राज्य न ठेवता हैद्राबादसहित तेलगू भाषिकांचे विशाल आंध्र राज्य तयार करण्यात आले तर महाविदर्भ राज्याचा समावेश मुंबई द्विभाषिक राज्यात करण्यात आला. राज्य पुनर्रचना कायद्यानुसार १४ घटकराज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती करण्यात आली. परंतु या राज्याच्या पुनर्रचनेत महाराष्ट्रावर व गुजरातवर अन्याय झाला होता. सर्व राज्ये भाषेच्या आधारावर असली तरी मुंबई हे द्वैभाषिक राज्य निर्माण केले होते. त्यामुळे गुजरात व मराठी भाषिक लोक सरकारच्या या निर्णयावर नाराज होते. सरकारच्या विरोधात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ १९५५ सालच्या अंतापासून विलक्षण झंझावाती वेगाने फोफावत गेली अखेरीस १ मे १९६० रोजी गुजराथ स्वतंत्र व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाली. परंतु ारतीय राजकारणात १९६२ नंतर विविधतेपेक्षा एकतेवर जास्त भर देण्यात येऊ लागला. पुढे पंजाब

राज्य हे पंजाबीचा व हिंदी भाषिकाचा मिळून निर्माण करण्यात आला होता. त्यानंतर १९६५ झाली संत फत्तेसिंग हे अकाली दलचे अध्यक्ष झाल्यानंतर अकाली दलाच्या नेत्यांनी स्वतंत्र पंजाबची मागणी करू लागले, कारण हरियाणा व पंजाब यांच्यात सामाजिक, भाषिकदृष्ट्या कोणतेही साम्य नव्हते त्यामुळे त्याच्यात संघर्ष निर्माण झाला त्यातून शेवटी पंजाब पुनर्रचना अधिनियम १९६६ नुसार पंजाब व हरियाणा ही दोन वेगळी राज्य निर्माण करण्यात आली. मात्र चंदीगड हे शहर दोहांची राजधानी बनले.

ईशान्यकडील राज्यानी स्वतंत्र राज्याची मागणी करण्यात सुरुवात केली कारण ईशान्यकडील राज्यात वांशिक, सांस्कृतिक व भाषिक विविधता आहे. ऑक्टोबर १९६० मध्ये. सरकारने आसामी या एकमेव भाषेला. सरकारी भाषेचा दर्जा दिला. याच्या विरोधात बंगाली भाषिकानी जोरदार निदर्शने केली. या घटनेमुळे त्याच्यात संघर्ष सुरू झाला आणि मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झाली. त्यामुळे केंद्र सरकारने आसामी व बंगाली भाषांना राजभाषा म्हणून मान्यता दिली. पुढे मिझो टेकड्यावरील मिझो नेत्यांनी आसाम आणि भारतातून बाहेर पडून स्वतंत्र मिझो राज्य स्थापण्याची मागणी केली. एवढेच नव्हे तर त्यासाठी मिझो बंडखोरांनी हिंसक कारवाया करून दहशत निर्माण करायला सुरुवात केली होती. त्याच दरम्यान १९६० साली काही नागा बंडखोराच्या मागण्या पूर्व करण्यासाठी एक धोरणात्मक उपाय योजना म्हणून नागालँड राज्याची निर्मिती केली गेली असली, तरी नागाची विभागणी वेगवेगळ्या प्रदेशामध्ये झाल्यामुळे त्याच्यात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. त्यामुळे नागा व मिझो दहशतवादी हे बर्मा व चीन यांच्याशी संबध जुळवून होते म्हणून भारताच्या संरक्षणाचा दृष्टिकोणातून त्यांच्यावर उपाय योजना करण्यासाठी १९६३ साली नागालँड त्यानंतर १९७२ च्या आसाम पुर्नरचना कायद्यान्वये २१ जानेवारी १९७२ रोजी मेघालय, मणिपूर, त्रिपूरा ही राज्ये अस्तित्वात आली. २६ एप्रिल १९७५ रोजी सिक्कीमचा राजा भारतीय राज्याच्या संघात सामील झाला. २५ जानेवारी १९७१ रोजी हिमाचल प्रदेश निर्माण झाले. मिझोराम, अरूणाचल प्रदेश यांना केंद्रशासित प्रदेश दर्जा मिळाला. पुढे २० फेब्रुवारी १९८७ रोजी या प्रदेशांनाही स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला त्याचबरोबर गोवा राज्याला १९८७ साली स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला. त्यानंतरच्या काळात सामाजिक, आर्थिक विकासाच्या व प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर पुन्हा स्वतंत्र राज्याची मागणी होऊ लागली असताना आर्थिक विकासाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. भाषिक आधारावर राज्य निर्माण झाल्यानंतर त्याचा आधाराने विकास होईल अशी आशा होती. परंतु एक भाषिक राज्यामध्ये प्रादेक्षिक विकासाच्या प्रश्र्नावरून राज्याची मागणी होत आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर मध्यप्रदेशाची नवी रचना करण्यात आली. छत्तीसगडच्या रायपूर आणि रतनपूर क्षेत्रातील भागाकडे मध्यप्रदेश सरकारने वेळोवेळी दुर्लक्ष केले आहे. या भागात नैसर्गिक साधनसंपत्ती व जलसंपत्ती मोठ्याप्रमाणात असूनही या प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे येथील विमुक्त जमातीनी छत्तीसगड या स्वतंत्र राज्याची मागणी केली. भारतीय जनता पक्षाच्या सरकारने ३१ ऑक्टोबर २००० रोजी छत्तीसगड या २६ व्या घटक राज्याची. निर्मिती केली. तसेच उत्तरप्रदेशामधील कमुन आणि गारवाल या दोन जिल्ह्याच्या विभागाकडे उत्तरप्रदेश सरकारने दुर्लक्षित केले आणि तेथे कोणत्याही विकासाच्या योजना पोहचविला नाही. त्यामुळे उत्तरप्रदेशाच्या पश्र्चिम भागातील जनतेने उत्तराखंड या स्वतंत्र राज्याची मागणी केली. त्याला येथील भारतीय जनता पक्ष व डाव्या पक्षांनी सकारात्मक दृष्टीने पाठिंबा दिला आणि २००० साली भाजप सरकारने उत्तराखंड राज्याची निर्मिती ९ नोव्हेबर २००० रोजी २७ घटकराज्य म्हणून मान्यता दिली.

झारखंड हे राज्य दक्षिण बिहार मधल्याविमुक्त जमातीचा आहे. हा प्रदेश स्वायत्त आणि स्वतंत्र प्रांत व्हावा ही मागणी ब्रिटीशाच्या काळात २० व्या शतकाच्या सुरुवातीलाच होऊ लागली होती. विमुक्त जमातीची अस्मिता लक्षात घेऊन त्यांचा विकास व कल्याण साधणे व त्यासाठी प्रदेशाच्या परिघावरील एक स्वतंत्र भूभाग मिळवणे हे या काळातील उपराष्ट्रवादी चळवळीचे उद्दीष्ट बनले.. कारण विमुक्त जमातीचे 'दिकू'कडून व इतरांकडून होणारे शोषणामुळे झारखंड लोकांची राष्ट्रवादी अस्मिता वाढली आणि ते स्वतंत्र राज्याची मागणी झारखंड पक्षाच्या माध्यमातून करीत होते. झारखंड पक्षाने राज्य पुनर्रचना आयोगाला एक निवेदन सादर केले. त्यात झारखंडचे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक असे खास वैशिष्ट्य आहे. म्हणून झारखंड . हे एक नवीन स्वतंत्र राज्य व्हावे. भाषा, संस्कृती आणि. वांशिकता या बाबतीत मुक्त जमाती इतर लोकांहून भिन्न आहेत त्यामुळे भौगोलिक सानिध्यात व त्यासोबत बिहार राज्यापासून शासकीय स्वतंत्रता मिळण्याची गरज आहे. असे स्पष्टपणे मांडले. पुढे झारखंडच्या स्वतंत्र राज्याची मागणी ही झारखंड पक्षाने व झारखंड मुक्ति मोर्चा पक्षाने सातत्याने केले. त्याचा परिणाम म्हणून बिहार राज्याचा दक्षिणेकडील भाग अलग करून झारखंड राज्याचा ठराव भारतीय संसदेने २००० मध्ये समंत केला त्यानुसार घटकराज्यातील २८ वे राज्य म्हणून १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड अस्तित्वात आले. अशारीतीने २००० साली चौऱ्याऐंशीवी घटनादुरुस्ती करून आर्थिक विकासाच्या आधारावर अविकसित प्रदेशाच्या म्हणून बिहार मधून झारखंड, मध्यप्रदेश मधून छत्तीसगढ व उत्तरप्रदेशमधून उत्तरांचल ही राज्य निर्माण करण्यात आली. आजही अनेक राज्याची मागणी आर्थिक मुद्यावरून होत आहे. २०१४ माळी तेलंगना हे नवीन राज्य स्थापन झाले.

समारोपः आज भारतीय संघराज्यात २८ घटकराज्य व केंद्रशासित प्रदेश असून प्रादेशिक विकासामधून पश्चिम बंगालमधूनं गोरखलँड, गुजरातमधून सौराष्ट्र, बिहार मधून मिथिलाचल, कर्नाटकातून कूर्ग, मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशमधून बुदेलखंड आणि महाराष्ट्रातून विदर्भ,

कोकण इत्यादी अनेक राज्याची मागणी होत आहे.

संदर्भ सूची :१. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाडय गृह, मुंबई, २०१० २. देव शंकरराव (प्रकाशक), संयुक्त महाराष्ट्राची माहिती, संयुक्त महाराष्ट्र परिषद प्रकाशन, १९४८, ३... देव शंकरदेव, देव देते कर्म नेते, सासवड आश्रम विश्र्वस्त मंडळ, पुणे, १९७६, ४. दहिवले स्मरण (अनु.), भाषावार राज्य मिमांसा, पर. १९७८, सुगत प्रकाशन, नागपूर, १९७८, ५. फडके य. दि.. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००७, ६. गाडगीळ काका, समग्र काव्यखंड २, पथिक भाग २, अमेय, पुणे, १९९६ ७. पळशीकर सुहास, भारतातील प्रादेशिक पक्षाचे राजकारण, साधना प्रकाशन, पुणे, २००९ ८. नवभारत, ऑक्टोबर नोव्हेंबर १९५६, ९. प्रबोधन प्रकाशन ज्योती, फेब्रुवारी २०१०

**समाप्त * * ***





**अनिल (आण्णा) बनसोडे**
मो.७०२०३ ४४३५९

# मिरचीच्या खळ्यावर.. येताव का..?

९०च्या दशकात बॉलीवूड सिनेमात एक हमखास शिन असायचा ज्यात हिरो पोलीस स्टेशनला गुन्हेगारांच्या विरोधात तक्रार करायला गेलाय आन पोलिसांनी हिरोलाच आत मध्ये टाकलाय.. म्या हिरो बिरो काय नाय पण माझ्या सोबत सुध्दा खऱ्या आयुष्यात असा शेम टू शेम् शिन घडलाय बरका मंडळी..

३१ मे च्या रात्री मी दहा वाजता पोलीस स्टेशनात गावातील मटका वाल्यांच्या विरोधात तक्रार करायला गेलोय आणि तिथं जाऊन मीच पुढच्या दोन रात्री जेल ची मस्त हवा खाल्लीय..

तर ३१ मे च्या अगोदर काही दिवसांपूर्वी मी गावातील मटका व्यवसायाचे व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर शेअर केले आणि त्यात कर्तव्यदक्ष आमदार राम सातपुते यांना टॅग केले. आमदार साहेबांनी त्या प्रकाराची तात्काळ दखल घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या ती गोष्ट निदर्शनास आणून देऊन तात्काळ कारवाई करण्यास सांगितली. दुसऱ्या दिवशी गावातील मटका टपऱ्या सुतराम बंद झालेल्या मला दिसल्या, ते सुध्दा मी सोशल मीडियावर शेअर केले. १५ दिवस गेल्यानंतर पुन्हा गावात मटका सुरू झाला. यावेळी मी मटका ज्याच्या घरातून चालवला जातो त्या घरात रात्रीच्या साडे आठ वाजता जाऊन ते सर्व चित्रीकरण माझ्या मोबाईल मध्ये केले आणि परत आलो.

रात्री १०च्या दरम्यान मला समजले की, मटका वाले त्यांच्या घरातील महिलांना घेऊन पोलीस स्टेशनला माझ्या विरोधात तक्रार करायला गेलेत. मी मग माझ्याजवळ असलेला व्हिडिओ पोलिसांना दाखवायला आणि त्यांच्यावर तक्रार करायला साडे दहा वाजता पोलीस स्टेशनला गेलो. ठाणे अंमलदार साहेब आणि इतर दोनतीन पोलीस बसले होते, संगणकावर काहीतरी टायपिंग सुरू होते. मी तो व्हिडिओ दाखवला आणि माझी तक्रार घ्या म्हंटले, त्यांनी घेतो थांब इकडे बस असे सांगितले. बसल्यानंतर माझी नजर संगणकावर गेली आणि तिथं माझच नाव मला टाईप होताना दिसले, आरोपीला अटक केल्यानंतर मेडिकल साठी जेव्हा घेऊन जातात त्यासाठी सरकारी दवाखान्याला पत्र लिहावे लागते, त्याचेच टायपिंग सुरू होते. माझ्या लक्षात आल की आपला करेक्ट कार्यक्रम झालेला आहे याठिकाणी..

११ वाजले होते, मी माझ्या दोन तीन मित्रांना फोन करायला सुरुवात केली, कुणी फोन उचलला नाही. पोलिसांना दिसले की मी कोणाला तरी फोन करतोय, त्यांनी माझा मोबाईल माझ्याकडुन दम देऊन हिसकावून घेतला. मला साडे अकरा वाजता वेळापूरच्या सरकारी दवाखान्यात मेडिकल साठी नेले, मी मला माझ्या घरी फोन करून सांगू द्या म्हणून विनंती केली. पण पोलिसांनी मला १२ वाजेपर्यंत मोबाईल दिला नाही, शेवटी मला अकलूज ला लॉकअप मध्ये टाकण्यासाठी घेऊन जाताना गाडीत असताना तुझ्या भावाचा नंबर सांग आम्ही डायल करून लाऊडस्पिकर करतो तू बोल असे सांगितले.

अकलूज जेल मध्ये मे च्या वैशाख वणव्यात रात्र काढावी लागणार या धास्तीने मी खचायला लागलो होतो. आलीया भोगासी असावे सादर म्हणत मी जेल मधे एक कोपरा धरला आणि शांत बसून राहिलो. रात्रीचे

दीड वाजले होते, दिवसभर जेवलो नव्हतो, पोटात काहीच नव्हते, माझा बी पी लो होतोय असं मला जाणवले.. गार्ड ड्युटीवर असणाऱ्या पोलिसाला मी मला काहीतरी खायला द्या, मला त्रास होतोय असं सांगितलं. त्यांनी कालवा सुरू केला, आता काय आणू तुला? किती वाजलेत? तुला इथ येऊन येणाऱ्या वेळापूर पोलिसांनी तुला जेवायला का नाही दिले.? मी म्हंटले मला काही माहित नाही..

माझा बी पी लो व्हायला लागला आहे, मला काहीतरी खायला द्या, हा गोंधळ ऐकून एक वयस्कर २ स्टार पोलीस अधिकारी माझ्या जवळ आले आणि त्या गार्ड ला गुन्हा कोणता आहे असं विचारलं, ३५४ असं त्यांनी सांगितले, माझ्याजवळ ते सद्गृहस्थ आले आणि विचारले काय करता? मी म्हंटले पत्रकार आहे. अरे अरे.. आल माझ्या लक्षात.. अस म्हणत ते गेले आणि अर्ध्या तासानंतर २ बिस्कीट पुडे आणि पाणी बॉटल मला आणून दिली आणि एवढच एका मेडिकल मध्ये मिळाले.. सगळ अकलूज शोधले बाळा.. पण काही नाही मिळाले. ते दोन बिस्कीट पुडे मला तेव्हा जगातील सर्वात महागडी वस्तू वाटले.. मी पोटात ओढून घेतले..

सलाखो के पीछेवाले को बाहर की दुनिया कूछ खास हीं हसीन लगती हैं..! हे १ हजार टक्के खरं हाव बर का, ज्यानं कुणी अनुभवलं आसल त्याला ईचारून बगा.. अंदाजे पहाटे साडेतीन चारच्या सुमारास दिवसभराच्या त्रासाने वैतागून शरीर थकल्याने डोळे ही आता म्हणले आण्णा लेट जाव अब.. मी ज्या जेल खोली मध्ये होतो त्याच्या अगदी शेजारी समोरच गार्ड ड्युटीला असणाऱ्या पोलिसांना टेबल खुर्च्याची सोय लावलेली होती, माय नशीब ईजे बलवत्तर तिथं एक फॅन फुल स्पीड ने फिरत होता. गजांजवळ हवा येतेय याचा इचाक शोध लावून, मी अगोदर जेलची वारी केलेल्या कुण्या एका कैद्याची चादर उचलली आणि सलाखो पे ही अपना मस्तिष्क डाल के सो गया, हवा अच्छी आ रे ली थी.. ! सकाळी १० वाजता जाग आली, एक मावशी झाडलोट करायला आली होती आणि पोलिसांना म्या किती कीलेर काम करती ते मोठमोठ्याने सांगत हुती. उठल्या उठल्या टाईम विचारला म्हणून ही वेळ कळली बरका नायतर घड्याळ नावाची गोष्ट वर्जित अस्तिया जेल मधी. बाहेर ठेवलेल्या पाण्याच्या हांड्यात मी गजाडूनच अर्ध्या कापलेल्या प्लास्टिक बाटलीच्या मदतीने हात घातला आणि घोटभर पाणी पिऊन घेतले. एक एक सेकंद माझा, महाभयंकर जीव खात होता, गुन्हा केलाच नव्हता त्यामुळे मेंदू आणि मन कसलाच पश्चाताप वगैरे करत आहे, असा काय विषय नव्हता. ११ वाजता वेळापूरहून पोलीस पार्टी आली मला चला म्हणून साद घातली. गाडीत बसण्यापूर्वी मला हातात बेड्या चढवल्या, मी म्हंटले साहेब.. स्वतः हलाल झालेला मी बोकुड कशाला फरार हुतूय राव.. त्यावर ते फक्त हसले आणि आम्ही वेळापूरकडे लाल निळ्या दिव्याच्या गाडीत प्रस्थान ठेवले.

पोलीस ठाण्यात येताच मला पोलीस उपनिरीक्षक सायबासमोर उभ करण्यात आलं, सायबाने याअगोदर आण्णा बनसोडे नावाचा मनुक्षी कोण हाय ह्ये पाहिलं नव्हतं फक्त नाव ऐकल होतं. आण्णा बनसोडे.. लय मजा वाटते ना तुला मोबाईल मध्ये शूटिंग करून फेसबुकवर टाकायला, आज तुझाच व्हिडिओ काढून टाकतो आता मी म्हणत, मी बेड्या घालून उभं असलेल्या अवस्थेत त्यांनी त्यांचा मोबाईल काढून फोटो किंवा व्हिडीओ काढल्या सारखे केले. तेवढ्यात बीट अंमलदार सायब तावातावाने का रे चोद्या.. गावचा मालक झाला का तू असं म्हणत माझ्या समोर उभा झाले. पोलीस उपनिरीक्षक सायबांनी पुन्हा आरोळी दिली, घ्या रे याला आतल्या खोलीत, याला भोंगळे करा आणि याच्या शेंड्यावर मेणबत्तीचा चटका द्या.. मी आपल शांतपणे त्यांच्याकडे पाहत सगळ ऐकत होतो, हातात बेड्या होत्या, मनात म्हणत होतो, या बेड्या जास्त काळ नसणार आहेत आण्णा तुझ्या हातात, त्या जातील आणि तुझं ब्रम्हास्त्र असलेलं पेन हातात येईल तेव्हा शांत उभा रहा.. बाहेरच्या दुनियेत.. माझा जेमतेम सातवी शिकलेला भाऊ, जो शाळा सोडल्याच्या दुसऱ्या दिवसापासून गवंडी कामाला जुंपलेला होता तो माझ्या जामिनासाठी सिस्टीम नावाच्या संकटाशी संघर्ष करत होता. ६ महिन्यांपूर्वीच वडिलांचे निधन झाले होते, दवाखाना नशिबी आल्याने आर्थिकदृष्ट्या जेरबंद झालेल्या माझ्या कुटुंबाला माझ्या जामीनाचे आव्हाहन जेरीस आणणार होते, कुटुंबात एकमेव जास्त शिकलेल्या मला कायद्याच्या कचाट्यात अडकवून आत बसवले गेले होते. जवळचे, रक्ताचे नातेवाईक, मित्रमंडळी, समाज आणि त्यातील पुढारी सर्वांनी आण्णाकडे स्पेशल पाठ फिरवली होती, का ग जिरली का आता असं म्हणत जागोजागी बैठका रंगल्या होत्या, एकदोन मंडळी होती फक्त माझ्यासोबत, ज्यांना मला काही होऊ नये असं वाटत होतं. कोर्ट कचेरी आणि वकील याचा आजवरच्या हयातीत कसलाच संबंध न आलेला माझा लहान भाऊ बाहेर वणवण भटकत होता. कोर्टात आल्या बरोबर मला काही वकिलांनी आणि पोलिसांनी ओळखले, कारण मी चांडाळ चौकडीच्या करामती या वेब सिरीज मुळे थोडाफार पॉप्युलर होतो, पण हातात बेड्या असल्याने मला त्यांना ओळख देताना आणि बोलताना, मेल्याहून मेल्यासारखे वाटत होते. दुपारी अडीच वाजता मला कोर्टात जज साहेबांसमोर हजर केले, त्यादिवशी माझ्या भावाला मला कुणी जामीनदार मिळाला नाही म्हणून वकीलानेच मुद्दाम पी सी वरती आक्षेप घेतला नाही कारण मी अकलूज जेल मधेच एक दिवस राहील, एम सी आर झाला तर माझी रवानगी सोलापूरच्या जिल्हा कारागृहात करावी लागणार होती आणि ती रवानगी त्या परिस्थितीत मला आणि माझ्या बाहेर असलेल्या भावाला झेपणार ही नव्हती.

चलो ये भी ठीक है..अजून एक रात्र जेल मध्ये काढावी लागणार होती, आता मला त्याची अजिबात भीती वाटत नव्हती, कारण.. गार्ड टेबल वरील फॅन आणि त्याची येणारी थोडी हवा मला पोलीस गाडीत बसतानाच जाणवायला लागली होती..

२ जूनच्या दुपारी मा. कोर्टाने २५ हजारांच्या जातमुचलक्यावर आणि प्रत्येक मंगळवारी सकाळी ११ ते १ या दरम्यान पोलीस स्टेशनला येऊन हाजरी देण्यात यावी या अटी शर्तीवर माझी त्या न केलेल्या

गुन्ह्यातून जामिनावर सुटका केली. तुम्हाला एक गोष्ट सांगितली तर धक्का बसेल ती म्हणजे माझ्या जामिनाला एक ही नातेवाईक पुढे आला नाही, मराठा समाजातील एका व्यक्तीने माझा जामीनदार म्हणून कोर्टात स्वतःचा सातबारा दिला, जे माझ्या दिवंगत वडिलांचे मित्र होते. मग तिथून मी डायरेक्ट पोलीस स्टेशनला आलो, आल्यावर समजले की माझी दुचाकी सुद्धा या गुन्ह्यात दाखवून ती मुद्देमाल म्हणून जप्त करण्यात आली आहे. माझा मोबाईल, वॉलेट आणि घड्याळ द्या म्हणून मी पोलिसांना विनवणी केली. पण ज्याच्याकडे माझ्या वस्तू आहेत ते पोलीस आज त्यांची साप्ताहिक सुट्टी असल्याने आले नाहीत असं सांगून मला उद्या येऊन तुझ्या वस्तू घेऊन जा असं सांगण्यात आले, दोन दिवस मोबाईल शिवाय जगणे आजच्या युगात किती सोप्पं आहे हे तुम्हाला ठाऊक आहेच की, चला म्हटलं अजून एका रात्रीने मोबाईल नसला म्हणून काय फरक पडतो ?

३ जूनला सकाळी ११ वाजता मस्त नहा धोके इ्याक कपडे चढवून पायपीट करत मी महिनाभरापूर्वीच नवीन घेतलेला मोबाईल पदरात पाडून घ्यावा म्हणून पोलीस स्टेशन गाठले, अर्थातच चालत असताना त्यादिवशी वरून सूर्यदेव बर्फाचा वर्षाव करत होते, गेली १४ वर्षे झालं मी टू व्हीलर शिवाय कुठ गेलोय का असं आठवून पण त्यादिवशी काही आठवत नव्हतं. तिथं गेल्यावर कळलं की त्ये सायब जवळच कुठं तरी अपघात झालाय म्हणून तिकडे गेल्यात, येतील दुपार नंतर तू ४ वाजता ये असा नकोसा असलेला आदेश मिळाला. मला मात्र मोबाईल हातात घेऊन कवा एकदा थहर्टी-ि अिन ऋलशलेङ्ग बघतोय अस झालं होतं, पण काय करणार पर्याय नव्हता, चलो.. ये भी ठीक है.. उन्ह उतरल्यावर परत येऊ म्हणत मी थंडीने कुडकुडण्या अगोदर आपलं घर गाठले. ४ वाजता मोठ्या मोठ्या ढांगा टाकतच म्या परत पोलीस स्टेशनला गेलाव, माझा मोबाईल आणि इतर वस्तू ज्याच्या कपाटात ठेवण्यात आल्या होत्या त्ये सायेब आले हुते. माझा मोबाईल द्या म्हणत मी त्यांच्यापाशी गेलावं तर मोठे सायेब आल्यावर ये असं त्यांनी दरडावून सांगितले. आता काय मी हेलपाटे घालत नसताव म्हणत मी तिथच एका बाकावर बसून राहिलो. ६ वाजता मोठे साहेब आले, म्या लगेच आत नाही गेलाव, म्हणलं आल्या आल्या आपल्यावर बॉम्ब पडायचा. १० मिनिटांनी माझा मोबाईल पाहिजे म्हणून सायबाकडे गेलो. मोठ्या सायबांनी त्या पोलिसाला एकांतात काहीतरी सांगितले आणि त्या पोलिसाने केबीनच्या बाहेर येऊन मला मोबाईलचा पासवर्ड विचारला, मी म्हंटले पासवर्ड कशाला? त्यावर त्याच त्यांच्या थाटात मोबाईल पाहिजे की नाही सांग..? असं उत्तर आले. अगोदरच या मानसिक त्रासाला मी भयंकर वैतागून गेलो होतो आणि माझ्या सोबत माझी बाजू घेऊन कोणीही माझ्या त्या बेकार वेळेत येत नसल्याने मला मोबाईल कधी हातात पडतो असं झालं होतं म्हणून मी पासवर्ड सांगून टाकला. १५ मिनिटांनी मोबाईल हातात मिळाला, मोबाईल उघडुन पाहतो तर मोबाईल मधील सर्व फोटो अन् व्हिडिओ डिलीट केले गेलेले दिसले, थहर्टी-ि खिर्पीर ऋलशलेङ्ग एवढच काय तर माझी गुगल ड्राईव्ह सुद्धा अगदी वॉशिंग पावडर निरमा लावून धुण्यात आली होती. गेल्या १४ वर्षांचा डेटा, कॉंटॅक्ट, माझ्या मुलांचे लहानाचे मोठे होताना चे फोटो, फॅमिली फोटो, खूप साऱ्या हृदयातील आठवणी सर्व काही निर्दयीपणे पुसून टाकण्यात आले होते. राग द्वेष मत्सर या मानवी भावनांचा मनात ज्वालामुखी सारखा उद्रेक झाला होता पण ज्याची सर्वांनी मुद्दाम साथ सोडलीय, झालेल्या अन्यायाची सर्वांनी मजा घेतलीय असा माणूस करून करून तरी काय करणार? शांत बसणार ना.. मी पण शांत झालो आणि डोळ्यातील आसवं टिपत घरी आलो.

त्यानंतर मी दोन महिने वणवण चालत फिरलो, सराईत गुन्हेगार असल्या सारखे प्रत्येक मंगळवारी पोलीस स्टेशनला हाजरी द्यायला गेलो. दुचाकी कोर्टातून सोडवण्यासाठी खूप अडचणी आल्या, आर्थिक कोंडी झाल्याने कोणतीच गोष्ट सोप्पी झालीय असं झालच नाही. पण आता मात्र मनात खूणगाठ बांधली होती की जे भोग आलेत ते भोगायचे आणि नवीन वाट शोधायची. सोलापूर येथील यश सिध्दी या रजिस्टर न्युज इंडिया रजिस्टर दैनिकात पत्रकार म्हणून काम करू लागलो, गावातील अवैध धंदे आणि विशेषतः मटका या बेकायदेशीर व्यवसायांवर लिहायला लागलो, आजही लिहतोय उद्या सुद्धा लिहणार आहे. गावच्या ग्रामसभेत सुध्दा दारू मटका बंदीचा ठराव मंजूर व्हावा म्हणून अर्ज ही दिला आहे. आजही त्याचा पाठपुरावा सुरू आहे.

मित्रांनो, तुम्हाला हे वाचून काय वाटेल मला माहित नाही पण माझ्यावर ज्या महिलेने विनयभंगासारख्या गंभीर गुन्ह्याची फिर्याद नोंदवली आहे, ती महिला गावच्या मटका चालक व्यक्तीची पत्नी आहे, त्या माऊलीने फिर्यादीत असं लिहून दिलं की, मी तिच्या घरात घुसलो, तिचा हात पकडुन तिला विचारलं की, कुठ गेला आहे तुझा नवरा..? तिला धमकी दिली, तिच्याकडे अशा नजरेने पाहिले की तिला लज्जा वाटेल.. कल्पनेच्या पलीकडील मजेशीर गोष्ट म्हणजे ती बिचारी भगिनी कशी दिसते हे आज सुद्धा मला माहित नाही.

दुर्दैव.. आजपण गावात मटका तेजीत सुरू आहे आणि त्या मटका बहाद्दर वर कसलीच कायदेशीर कारवाई अजून पण करण्यात आलेली नाही, उलट तो आता तर माझ्याच नातेवाईकांना घोटभर दारू पाजून माझ्या विरुध्द करत आहे, माझं ज्यांच्या सोबत अजिबात जमत नाही अशा लोकांना तर माझ्या पुढं उभा करून नाव न घेता आई बहिणीवरून शिव्या सुद्धा द्यायला लावतो.. माझ्यावर खोटी केस करून मला हे दिवस दाखवणारा तो हरामखोर मटका चालक माझ्या समोरूनच मुद्दाम कागदावर कमावलेल्या पैश्याच्या मस्तीत हिंडत असतो. पण मी लढतोय.. कारण अजून मी हरलो नाही आणि हरेल हा विचार मनाला शिवून सुद्धा जात नाही..

**समाप्त * * ***

खुल्या आज आकाशात
किती मोजावे चांदणे
नक्षत्रात आज बहरले
तुझ्या प्रीतीचे गाणे !!

**– गजानन चिंचमलातपुरे**



**सुरेखा पैठणे**
मो.७७०९००४३३१

# सामाजिक चळवळी आणि स्त्रियांचे योगदान

एखाद्या समाजाची प्रगती झाली आहे वा नाही याचे मापन मी त्या समाजातील स्त्रियांची किती प्रगती झाली आहे यावरून करतो - डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे हे विधान समाजातील स्त्रियांच्या स्थितीवर आणि समाजाच्या समाजिक स्थितीवरही भाष्य करणारे आहे. लौकिकर्थाने, स्त्रिया ह्या देशाची अर्धी जनसंख्या आहेत तर मग त्यांची सामाजिक व्यवहारातही भागीदारी तेवढीच असायला हवी. मुळात सामाजिक चळवळ (ीलळरश्र ोींशाशपीं) म्हणजे समाजातील कुरीती, अनिष्ट प्रथा-परंपरा यांविरोधात उभारलेला लढा होय. ह्या सामाजिक कुप्रथांचे सर्वाधिक बळी ह्या स्त्रिया ठरत असतात हे ओळखून याविरोधात अनेक चळवळी भारतात झाल्या. सतीप्रथा, बालविवाह, बाल-जरठ विवाह, केशवपन अशा एक ना अनेक रूढी परंपरांनी इथली स्त्री ग्रासलेली होती. त्यातही उच्चवर्गातील स्त्री यात अधिक जखडलेली होती. एकूणच स्त्रियांच्या दुःखाला पारावार उरला नव्हता. तिची माणूस म्हणून नोंद घेतली जात नव्हती.

अशात भारतात ब्रिटिश राजवट आली आणि त्यायोगे भारताला अपरिहार्यपणे का होईना पण बाहेरच्या जगाची कवाडे खुली झाली. १८१८ मध्ये पेशवाईचा पाडाव झाला आणि महाराष्ट्रात ब्रिटिश सरकार स्थिरावले तेव्हा शिक्षणाच्या निमित्ताने इथल्या नवतरुण वर्गाला बाहेर जाण्याची संधी मिळाली. परदेशातील मुक्त लोकशाहीचे वातावरण, स्त्री पुरुष समता हे पाहून हे मंडळी भारतातल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवू लागली. स्त्रियांवरच्या अन्यायाविरोधात, स्त्रियांचा सामाजिक स्थितीवर बोलूं लागलेस्त्रियाही आपला सामाजिक आणि राजकीय सहभाग नोंवू लागल्या.

भारतीय सांस्कृतिक इतिहास तपासताना सिंधू संस्कृती स्त्रीपुरुष समता मानणारी प्रगत संस्कृती होती असे मानायला बरेच पुरावे सापडतात. भारत हा मातृसत्ताक देश होता हे ही ह्याच संस्कृतीच्या उत्खननातून सिद्ध होते. स्त्रीला सन्मानाचे स्थान होते. आर्यांच्या आक्रमणाने पितृसत्ताक समाजपद्धती लादली गेली आणि भारतात स्त्रियांच्या वाट्याला आदराचे स्थान राहिलेच नाही. तिच्या वाट्याला अवहेलना आली. गार्गी, मैत्रेयी यांनी कर्तृत्व गाजवले ते या संस्कृतीच्या सुरुवातीच्या काळात. तिथेही गार्गीला ,'तुझे मस्तक गळून पडेल' अशा धमकीवजा स्वरात गप्प बसविले गेले. त्यांनतर मात्र स्त्रीच्या दास्यात्वाचा इतिहास सुरू झालाबुद्धांच्या काळात पुन्हा स्त्रीच्या सन्मानाला सामाजिक चौकट मिळाली. सिद्धार्थ गौतमाची आई प्रजापती गौतमी हिने आपल्यासोबत ५००स्त्रियाना घेऊन भिक्खूनीसंघ स्थापन करून स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त करविला. जगाच्या इतिहातील स्त्रियांचा हा पहिलाच लढा आहे. 'त्रिपीटक' ह्या ग्रंथांतील 'थेरिगाथा' ह्या प्रकरणात समाविष्ट ७३ थेरींच्या म्हणजे भिख्खूनिंच्या गाथा ह्या स्त्रियांनी प्राप्त केलेल्या सामाजिक, कौटुंबिक उन्नतीच्या कहाण्याचं आहेत.

स्त्रीपुरुष समतेचा हा काळ सोडला तर पुन्हा स्त्रीवर मनुस्मृतीची बंधने आवळली गेलेली दिसतात. अगदी सतराव्या शतकापर्यंत ही बंधने करकचून स्त्रीच्या जगण्याभोवती फास बनली होती..तिला तिचे

अस्तीत्वच उरले नव्हते. मधल्या बाराव्या ते चौदाव्या शतकात संतचळवळीने जातीभेद, वर्णभेद, अस्पृश्यता यांविरोधात भक्तीचळवळ उभी केली त्यात स्त्री संतांनी आपल्या अभंगातून इथल्या धर्मसत्तेला आव्हाने दिली. ह्यात संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई आदींनी आपल्या अभंगातून इथल्या धर्मपरंपरांचे बुरखे फाडले.

जनाबाई लिहितात;

'डोईचा पदर आला खांद्यावरी
भरल्या बाजारी जाईन'

ह्या अभंगात त्या विठोबाला म्हणजेच पर्यायाने समाजाला धुडकावून लावतात. तर सोयराबाई आपल्या अभंगातून स्त्रीच्या मासिकधर्मावरून तिला जी हीन वागणूक दिली जाते त्यावर समाजाच्या धार्मिकतेचे ढोंग उघडे पाडले, त्या लिहितात,

आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध
देहीचा विटाळ देहीच जन्मला
सोवळा तो झाला कवण धर्म

अक्कममहादेवी, महदंबा यांसारख्या अनेक स्त्री संतांनी आपल्यावर लादलेल्या कौटुंबिक, सामाजिक बेड्या तोडत अन्याय रूढीविरोधात बंड पुकारले होते.

अर्वाचीन कालखंडात येतायेता स्त्रियांची स्थिती आणखीनच दयनीय झालेली होती. अठराव्या शतकात जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी इथल्या सनातनी धार्मिक व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले होते. स्त्रिला शिक्षण देणे, केशवपन थांबविण्यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणणे, अत्याचारित विधवा स्त्रियांसाठी सुतिकागृह चालवणे आणि सत्यशोधक समाजाची स्थापना करून बहुजन स्त्री पुरुषांना शोषणमुक्त व्यवस्था देण्याचा प्रयत्न करणे. ह्यामुळे अनेक स्त्रीमुलक प्रश्र्नांना वाचा फुटली. जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख ह्यांचा ह्या लढ्याने आधुनिक काळातील स्त्रीसाठी नवी वाट तयार झाली. ह्यातून मुक्ता साळवे सारखी त्यांची विद्यार्थिनीने 'महारामांगांच्या दुःखविषयी' हा निबंध लिहून, अस्पृश्य समाजातील स्त्रीचे खरे जगणे सर्वांसमोर मांडले. ताराबाई शिंदे यांनी भ्रूणहत्या हा विषय घेऊन पौराणिक नायकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत, 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक भारतातील स्त्रीवादाची मांडणी करणारे ठरले. पंडिता रमाबाई, डॉ रखमाबाई राऊत, काशीबाई कानिटकर आदी स्त्री समाजसुधारकांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी आपले आयुष्य व्यतित केले.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात विविध आंदोलनात स्त्रिया सहभागी होत होत्या. हा तोच काळ होता जेव्हा युरोपमध्ये महिला आंदोलने सुरू होती. १९२०च्या आसपास भारतात गांधी नेतृत्व उदयास आले होते. सामाजिक चळवळ की राजकीय चळवळ असे वाद सुरू असताना महात्मा गांधी यांनी पुकारलेल्या लढ्यात, पडद्यात राहणाऱ्या स्त्रिया आणि सर्वसामान्य घरातील स्त्रियाही सहभागी होत होत्या. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह, चले जावं चळवळ ह्या सगळ्यांत हिरीरीने महिलांनी सहभाग घेतला. गावकुसाबाहेर मात्र जातीय अत्याचाराच्या अमानुष घटनांनी थैमान मांडले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक क्रांतीने प्रेरित होऊन अस्पृश्य समाजात शिक्षणाचा ओघ वाढत होता आणि तेवढाच ह्या सामाजिक, धार्मिक अव्यवस्थेविरोधात संताप ही. अशात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने एक आश्र्वासक व निग्रही चेहरा मिळाला. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सामाजिक लढ्यात गावकुसाबाहेरच्या स्त्रिया मोठ्या संख्येने सामील होत होत्या.

महाड चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर सत्याग्रह हे लढे खरेतर मानवमुक्तीसाठी चाललेले लढे होते आणि स्वयंप्रेरणेने स्त्रिया यात उतरल्या होत्या, धर्मव्यवस्थेला आव्हान देत होत्या. शांताबाई दाणी, सुलोचना डोंगरे यासारख्या लढाऊ स्त्रियांनी मोठे योगदान दिलं आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मूलभूत प्रश्र्नांना घेऊन अनेक आंदोलने, मोर्चे झाले. गिरणी कामगारांचे प्रश्र्न, रेल्वे कामगारांचे प्रश्र्न, पाणी प्रश्र्न, महागाई यासाठी अनेक महिला रस्त्यावर उतरल्या. ताराबाई रेड्डी, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे सारख्या महिलांनी 'महागाई प्रतिकार संयुक्त महिला आंदोलन' ची स्थापना करून सर्वसामान्य महिलांचा लढा उभारला. १९७५ हे वर्ष तर युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केलंच होते, त्याचेही पडसाद भारतात उमटत होते आणि त्याअनुषंगाने देखील ह्या चळवळीला धार आली.

ही आंदोलने सूरू असताना जातीभेदाच्या प्रश्र्नही ज्वलंत होता. नामांतर आंदोलन ते खैरलांजी आंदोलन ही धार अजूनही ग्रामीण पातळीवर तीव्र आहे. महाडच्या सत्याग्रहात आलेल्या महिलांना त्यांच्या गुलामीची जाणीव बाबासाहेबांनी करून दिली, अगदी आपले राहणीमान कसे असावे हे त्यांनी सांगितले. 'शिक्षणाची कास धरून आपल्या लेकरांना शिकवा' बाबासाहेबांचा हा विचार घेऊन वस्तीत परतलेली स्त्री आता नव्या जाणिवा घेऊन उभी राहिली होती. बाबासाहेबांनी प्रथमच तिचा माणूस म्हणून केलेला विचार तिच्यात ऊर्जा भरणारा होता. हाच विचार घेऊन जातीय अत्याचाराच्याविरोधात आंबेडकरी स्त्री आजही सजगतेने लढते आहे. खैरलांजी प्रश्र्नांवर नागपूरची संबुद्ध संघटना, मुंबईतील आंबेडकरी स्त्री संघटना, छायाताई खोब्रागडे, उर्मिलाताई पवार विमल थोरात, प्रा आशालताताई कांबळे अशा कितीतरी स्त्रिया कसलीही पर्वा न करता सरकार विरोधात उभ्या ठाकल्या.

२१ व्या शतकात आपण आधुनिक ग्लोबल विश्र्वात जगत असतानाच्या काळात प्रश्र्न बदलले असले तरी कायम आहेत. जगभरात होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या बातम्या आजही आपल्या कानावर आदळत राहतात. भारतात अन्यायकारक रीत्या लागू केलेल्या कृषीकायद्याविरोधात दिल्लीत झालेले शेतकऱ्यांचे आंदोलन आणि त्यात स्त्रियांनी घेतलेला सहभाग हा मोठा लक्षणीय होता. सलग १ वर्षे चाललेला हा लढा आंदोलनाची ताकद वाढवत होता. त्यानंतर झालेलं शाहीनबाग आंदोलन तर जगभर गाजले. एन आर सी कायद्याविरोधात मुस्लिम महिला रस्त्यावर आल्या होत्या. आणि आता महिला कुस्तीगीर

आपल्यावर झालेल्या शोषणाविरोधात न डगमगता न्याय मागताना दिसल्या. महिलांचे सामाजिक चळवळीत योगदानाचा आढावा घेत असताना आता रोज इथल्या स्त्रीवर अन्याय होतोच आहे, लैंगिक अत्याचार तर दर दुसऱ्या तिसऱ्या जिल्ह्यात घडतो. नुकतेच घडलेलेमणिपूर नग्न धिंड प्रकरण तर आपण कोणत्या युगात वावरतो यावर प्रश्न निर्माण करणारे होते आणि त्यावर तेथील मंत्रीचे विधान जणू काही बलात्काराच्या घटनांना सामान्य रूप देणारे होते. बाईकडे आजही भोगवस्तू म्हणून पाहिले जाते. एकीकडे तिला देव्हाऱ्यात बसवून पुजायचे तर दुसरीकडे तिची अस्मिता पायदळी तुडवायची. यामधला मार्ग म्हणजे तिला माणूस म्हणून वागवा. पण ते जमत नाही इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीला. तिला धार्मिक गुलामगिरीत अडकवून पुन्हा एकवार १७ व्या शतकाकडे वाटचाल सुरु झाली असे वाटायला लागणारे वातावरण ह्या उन्मादी काळात सर्रास सुरू आहे. आता पुन्हा नव्याने आंदोलनाची दिशा ठरवावी लागणार अशा परिस्थितीत स्त्री वावरते आहे.

संदर्भ सूची :

१) स्त्रियांच्या उन्नतीसाठी : प्रा.आशालता कांबळे

२) जब स्त्रियोने इतिहास रचा :कुसुम त्रिपाठी


**समाप्त * * ***

---




माणूस जन्माला येतो आणि स्वतः च अस्तित्व ठरवू पाहतो. पण ह्या अस्तित्वाची सुरुवात कुठून होते माहीत आहे का ? स्वतः ला ओळखण्यापासूनच ! कसं ओळखायचं स्वतः ला? मी उंच आहे, मी छान आहे, मी सशक्त आहे की अजून काही ?? उत्तरे अनेक मिळतील. पण स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर सतत कार्यशील आणि कृतीशील असणं आवश्यक आहे. माणूस हा मुळातच समाजशील प्राणी आहे. तो समूहाने रहायचं शिकला तेंव्हा स्वतः ला अधिकतम तपासू लागला कारण आपण कसे वागतो,कसे बोलतो, कसे चालतो आणि एकूणच आपला वावर हा आपल्यापेक्षा समोरचे अधिक न्याहाळत असतात. समूहात राहिल्याने तो सर्वसमावेशक अनुभव घेऊ लागला.

माणसांच्या एकत्रित राहण्याला ग्रहण लागलं ते अनेक जातींच! मी उच्च, मी कनिष्ठ, मी सवर्ण, मी असवर्ण, वगैरे वगैरे माणूस बोलू लागला आणि मग भेद जन्माला येऊ घातला. माणसाच्या उत्क्रांती मध्ये सगळ्यात वाईट काय घडलं असेल तर माणसानेच निर्मिलेल्या जाती धर्माच्या भिंती. (ज्या आजही मजबूत आहेत.) पहिल्या परिच्छेदात नमूद केल्यानुसार माणसाचं अस्तित्व त्याच्या जातीनुसार निश्रि्चत करण्याचा मग पायंडाच पडला. साधारणतः सातव्या दशकापासून सुरु झालेली वर्ण व्यवस्था, जात व्यवस्था, वर्ग व्यवस्था आजच्या एकविसाव्या युगातही आपले पाय खोलवर रुतवून बसलेली दिसत आहे.




माणूसपणाच्या सर्व बाबी नेस्तनाभूत करून अराजकता माजलेली दिसून येते आणि अशा भयाण वास्तवतेचे आपण साक्षीदार आहोत यासारखी गंभीर बाब दुसरी कोणतीच असू शकत नाही.

देशात अनेक जाती धर्म आहेत. प्रत्येकाला आपले जीवन जगण्याचा अधिकार आहे. जगण्याच्या पद्धती निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु संपूर्ण मानवजातीला आणि विशेषतः स्त्रियांना जर कोणाचं भक्कम पाठबळ असेल तर ते भारतीय संविधानाच. हया संविधानाच्याच आधारे स्त्रियांना विशेष अधिकार आणि सन्मानाची वागणूक मिळत आहे. प्रसूतीनंतरची हक्काची रजा, वडिलोपार्जित संपत्तीचा अधिकार, घटस्फोटानंतर मिळणाऱ्या पोटगीचा अधिकार, स्त्री - पुरुष समान वेतन हक्क, कोळसा - खनिजे - खाणी मध्ये स्त्रीयांना अवजडीच्या कामाच्या ठिकाणी मुभा , अनुकंपा तत्वावर नोकरीचा हक्क, इत्यादी सर्व हक्क आणि अधिकार केवळ एका जात- समुदाय - पंथ - वर्ण यातील स्त्रियांना बहाल केलेले नसून समस्त स्त्री वर्गाला प्रदान केलेले आहेत. मग लेकी हो! ह्याच संविधानकर्त्याच्या कार्याबद्दल जाणून घ्यायला अडसर का? अडचण कुठली? संसदेत हिंदू कोड बिल मान्य नाही झाले म्हणून मंत्री पदाचा राजीनामा देणारे कोण? ज्या समाजातील स्त्रिया उच्चशिक्षित तो समाज सर्वात प्रगत, हे ठामपणे सिद्ध करू पाहणारे कोण? मनुस्मृती मधल्या असमान वागणुकीला तिलांजली देणारे कोण? चूल आणि मूल ह्या प्रथेचा धिक्कार करून माणूस म्हणून स्त्रियांना शिक्षणाचा आणि संधीचा समान अधिकार देणारे कोण? यासारख्या अनेक प्रश्नांच्या उत्तरेच्या अपेक्षेत लेखनाला पूर्णविराम देताना एकच नमूद करावेसे वाटते.

नही जानते है हम सूरज और चांद की रोशनाई को

क्यूँ की हमे स्वाभिमान का सूरज दिखाने वाले बाबासाहब है


मानवता और हक्क - अधिकार का सुंदर मिलाप

हमारा संविधान है हमारा संविधान है !!!

(उपकाराच्या जाणिवेतून केलेले शब्दांकन)

**लेखिका - वैभवी अडसुळे (८६५२६०४८२०)**


दीपावली शुभचिंतन
तालुक्यातील तमाम जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
सरपंच
भाजपा युवा मोर्चा
मा.बसवराज कोळी
मा.धोंडूराज बनसोडे
शुभेच्छुक : बसवराज कोळी,
सरपंच उडगी ता.अक्कलकोट जि.सोलापूर.



तालुक्यातील तमाम जनतेला दिवाळीच्या आरोग्यमय शुभेच्छा..!!
शुभेच्छुक : डॉ.लिंगराज नडगेरी
आरोग्य उपकेंद्र गोगांव ता.अक्कलकोट




तमाम जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.!!
ADVOCATE
शुभेच्छुक : ॲड.अमोल बनसोडे मो.९६३७१८४३९८
मु.पो.कोन्हाळी, ता.अक्कलकोट जि.सोलापूर




धनाची पूजा, यशाचा प्रकाश,
कीर्तीचे अभ्यंगस्नान, मनाचे लक्ष्मीपूजन,
संबंधाचा फराळ, समृद्धीचा पाडवा,
प्रेमाची भाऊबीज अशा या
दिपावली
निमित्त सर्वांना
मन:पूर्वक शुभेच्छा..!
: शुभेच्छुक :
नवनाथ धस, सचिव
गोपीनाथ मुंडे, प्रतिष्ठान,
अक्कलकोट




शुभ दीपावली
निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...
: शुभेच्छुक : चंद्रकांत सोनटक्के
आरोग्य सेवक, गोगांव ता.अक्कलकोट जि.सोलापूर.




दिपावली
सना निमित्त सर्वांना
सोनेरी शुभेच्छा..!
शुभेच्छुक : अल्सम मुल्ला
साई टेलर, वागदरी
ता.अक्कलकोट




। अंगण सजले फुल आणि रांगोळ्यांनी, स्वागत करण्यास दिवाळीसणाची ।
।। तोरणे आकाश कंदिल लागले दारी, आली दिवाळी आपुल्या घरी ।।
शुभ दिपावली
निमित्त आपणांस व आपल्या परिवारास
मंगलमय शुभेच्छा..!
शुभेच्छुक : चंद्रशेखर भांगे (पत्रकार)
लोकशाही न्युज चॅनेल,पुणे विभाग प्रमुख




दिवाळीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!!
शिका ।
संघटित व्हा ।।
संघर्ष करा ।।
(राष्ट्रीय अध्यक्ष)
मा.राजरत्न आंबेडकर
भारतीय बौद्ध महासभा
दत्ताभाऊ कांबळे
(अध्यक्ष-अक्कलकोट तालुका)
* संपर्क - 8010152158 7798836047
मु.पो.बोरोटी ता.अक्कलकोट जि.सोलापूर-413216




शुभ दिपावली
पहिला दिवा आज लागे दारी सुखाचा किरण
येई तुमच्या घरी पूर्ण होवोत तुमच्या
सर्व इच्छा तुम्हा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...




स्थापना : १९८९
रजि.नं.MAH/2272/SHO 1989
'' शिक्षण हेच जीवन ''
आझाद शिक्षण प्रसारक व संशोधन संस्था नागणसुर (दुधनी) संचलित
मातोश्री लक्ष्मीबाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशाला व
श्री.गुरूशांतलिंगेश्वर कनिष्ठ महाविद्यालय
दुधनी,ता.अक्कलकोट जि.सोलापूर


Lalit Nursing care
ललित नर्सिंग केअर
डॉ.भाग्यश्री मद्री-बनासोडे
M.B.B.S.D.G.O
स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र तज्ञ
तमाम जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
सुविधा
वंध्यत्व निवारण केंद्र
स्त्रीरोग चिकित्सा व शस्त्रक्रिया
प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात तपासणी
सुलभ प्रसुती
कुंटूब कल्याण केंद्र
सोनोग्राफीद्वारे तपासणी
दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
कारंजे चौक
युनियन बँक
ललित नर्सिंग केअर
विजय चौक
हॉस्पिटलकडे
मंगरुळे पेट्रोल पंप
एस.टी स्टॅन्ड
सोलापूर
OPD Time
11.30 am to 3.30 pm
4.30 pm to 6.30 pm
पहिला मजला, धोंगडे कॉम्प्लेक्स, युनियन बँकेच्या वर, स्टेशन रोड, अक्कलकोट
फोन : ०२१८१-२२०२२५ मो.९८६०३२७२२५



शुभदीपावली...
उपाध्यक्ष
पुणे उद्योगपती
उपसरपंच
मा.प्रदीप जगताप
अक्कलकोट भाजपा
मा.मधुकर सुरवसे
मा.कमलाकर सोनकांबळे
गोगाव ग्रामपंचायत ता.अक्कलकोट
तमाम जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक : सरपंच परिषद मुंबई, सोलापूर
जिल्हा समन्वयक, ग्रामपंचायत गोगांव ता.अक्कलकोट
सौ.वनिता सुरवसे
सरपंच, गोगांव, जिल्हा समन्वय
सरपंच परिषद मुंबई




सर्व जनतेला दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा.!
दयानंद कुंभार
विवेकानंद कुंभार
शुभेच्छुक : दयानंद कन्ट्रक्शन, शिरवळ ता. अक्कलकोट




तमाम जनतेला
दिवाळीच्या लाख लाख
शुभेच्छा..!!
शुभेच्छा
शुभेच्छुक : जगदीश विराजदार सरपंच बासलेगांव




शुभ दीपावली
बसवराज मंटगी
: शुभेच्छुक :
स्नेहकुंज बहुउद्देशिय संस्था, नागणसूर, भारतीय जनता पार्टी नागणसूर
बसवराज मंटगी मित्र परिवार, नागणसूर ता.अक्कलकोट जि.सोलापूर




तमाम जनतेला दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
: शुभेच्छुक : बसवराज म.शेळके,
चेअरमन श्री.एस.एस.शेळके प्रशाला ज्यु.कॉलेज
वागदरी, ता.अक्कलकोट जि.सोलापूर.




तालुक्यातील तमाम जनतेला
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
भाजपा तालुका उपाध्यक्ष
भाजपा जिल्हा कमिटी सदस्य
सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच अक्कलकोट तालुका
: शुभेच्छुक :
सागर(दादा) कल्याणशेट्टी
युवा मंच अक्कलकोट तालुका
मा.प्रदिप जगताप
मा.श्रीशैल ठोंबरे
मा.श्याम बाबर




सौ.महानंदा कणमुसे
सरपंच किरनळी,
ता.अक्कलकोट
तमाम जनतेला
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
: शुभेच्छुक : सतिश कणमुसे मित्र परिवार व भारतीय
जनता पार्टी किरनळी, ता.अक्कलकोट जि.सोलापूर
युवा नेते
मा.सतिश कणमुसे



जनता दल
(यूनाइटेड)
ईडा
पीडा टळो
बळीचं
राज्य येवो !
दिवाळीच्या
सर्वांना शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
ॲड.सचिन बनसोडे
महासचिव, जदयू मुंबई



# आमच्या असंख्य हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!

दैनिक **यश सिद्धि न्यूज**
RNI NO. MAHMAR/2023/84162
संपादक : कमलाकर सोनकांबळे

AKKALKOT | SOLAPUR | PUNE | MUMBAI

Daily Newspepar & News Channel







## REGISTRATION

**SHIDHARTH SOCIAL FOUNDATION** is registered under Societies reg. act, 21 of 1860 (Reg. no.- MAHARASHTRA/206/2017; Dated 28th Feb. 2017) **F28000/2017**

## TAX EXEMPTION

All Donation to **SHIDHARTH SOCIAL FOUNDATION** is FOUNDATION is exempted U/s 80G (income tax Act 1961): 50 % tax exemption.

| | |
|---|---|
| Bank details | IDBI Bank, Akkalkot [IFSC code – IBKL0001583 ]<br>A/c number - 1583102000002820 |
| 12A registration no.<br>80G registration no. | AAVTS3017JE20217<br>AAVTS3017JF20221 |
| PAN | AAVTS3017J |
| NGO Darpan Unique id | MH/2018/0219153 |
| Contact no.- | 09921988358, 7385319358 |
| Email - | Shidharthsocialngo358@gmail.com |
| Facebook URL - | https://www.facebook.com/shidharthsocialngo358/ |
| CSR Reg no. - | CSR00031816 |
| UDYAM Reg no. - | UDYAM - MH - 32- 0107819 |

## BOARD OF DIRECTORS

PRESIDENT



**MR. KAMALAKAR DAYNDEV SONAKAMBLE**
Akkalkot,Solapur

VICE PRESIDENT



**MR. RAHUL SIDRAM RUHI**
Akkalkot,Solapur

SECRETARY



**MR.NIJAPPA MHALAPPA GAIKWAD**
Akkalkot,Solapur

JOINT SECRETARY



**Dr. RAVINDRA MALLIKARJUN BANSODE**
Akkalkot,Solapur

TREASURER



**MR. BASAVNAPPA GANPATI SONAKAMBLE**
Ambedkar nagar,Solapur

DIRECTOR



**MR.CHANDRASHEKAR VASANT BHANGE**
Malwadi Hadapsar,Pune

DIRECTOR



**MR.SUNIL CHANDRASHA GAIKWAD**
Bibevadi, Pune

SAMYAK HOSPITAL

*Be the change... you want to see in the world...*

# SHIDHARTH SOCIAL FOUNDATION

www.samyakhospital.com, www.yashsiddhinews.com

Mo : 9921988358, 7385319358 Email : Shidharthsocialngo358@gmail.com

**Registered Address : 352/B, At. Gogaon, Tal. Akkalkot, Dist Solapur 413218**

Corporate office : **YASH SIDDHI NEWS, S.No.520/4 Kondhawa, BK Sukhsagar Nagar No 2 Pune 411046**

● A non- government organization regd. Under Societies reg. act,1860

सम्यक पब्लिकेशन अँड मिडीया
RNI NO. MAHMAR/2023/84162

दैनिक **यश सिद्धि न्यूज**
संपादक : कमलाकर सोनकांबळे
9921988358 yashsiddhinews@gmail.com

वेबसाईट http://www.yashsiddhinews.com ईपेपर https://epaper.yashsiddhinews.com
टेलिग्राम https://t.me/yashsiddhinews ट्विटर https://twitter.com/yashsiddhinews
व्हॉट्स ग्रुप https://chat.whatsapp.com/GZ4koK2r3NFJ2jUrtipYI6
फेसबुक https://www.facebook.com/yashsiddhinews/
युट्युब : http://youtube.com/yashsiddhinews
इंस्टाग्राम https://www.instagram.com/invites/contact/?i=12inaifo8v8oiutmšcontent=p56nkal
शेरचार्ट : https://sharechat.com/profile/yashsiddhinews?d=n
WhatsApp channel : https://whatsapp.com/channel/0029Va-SZZL7dmeXhulFdB0A